परंपरा आणि नवतेचा संगम

# नव शक्ति

मुंबई, पुणे, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, कोकण, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर, मराठवाडा ● वर्ष ९२ ● अंक ३४० ● सोमवार ● २६ ऑक्टोबर २०२६ ● पाने ● १४ ● किंमत ₹ ५ ● पुणे किंमत ₹ ७ फक्त ● marathi.freepressjournal.i RNI No.1691/57






**११४ पदकांसह सायोनारा जपान** पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेचे पाचवे पर्व उत्साहात संपन्न; भारत चौथ्या स्थानी **क्रीडा पानावर**

**अग्रलेख : सीमेवर स्पष्टता हवी**
रोहित पवार, मफलरवाले गेले कुठे?
ये बॉम्बे शहर हादसों का शहर है...
**संपादकीय पानावर**

**ताज्या म्हावऱ्यावर खवय्ये मारणार ताव...** 'सी फूड प्लाझा' पुन्हा एकदा मुंबईकरांच्या सेवेत **महामुंबई पानावर**

**'मेक इन इंडिया'कडून आता 'डेव्हलप इन इंडिया'** कृषिप्रधान भारताने गेल्या दीड दशकात औद्योगिक क्षेत्रात भरारी घेण्याचा प्रयत्न केला आहे. **अर्थमंथन पानावर**

कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि. (मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!
कॉसमॉस गृहकर्ज
किफायतशीर व्याजदर
7.80%* पासून पुढे
*अटी लागू (ROI p.a.)
₹ 3 कोटीपर्यंत कर्ज उपलब्ध*
प्रोसेसिंग फी नाही
Toll Free No.: 1800 233 0234

# प्रकल्प पर्यावरणपूरकच

## टोरंटबाबत मुख्यमंत्र्यांचे सडेतोड उत्तर; विरोधकांकडून केवळ 'फेक नरेटिव्ह'...

**मुंबई :** रायगड जिल्ह्यात कर्जत तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या टोरंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप करत विरोधक आणि पर्यावरणप्रेमींनी सरकारवर निशाणा साधला होता. या वादावर आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट प्रतिक्रिया देत विरोधकांचा आरोप खोडून काढला आहे. 'कर्जत पंप स्टोरेज हा संपूर्णपणे पर्यावरण पूरक प्रकल्प असून विरोधकांकडून केवळ फेक नरेटिव्ह पसरवण्याचे काम सुरू आहे, असा जोरदार हल्लाबोल मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

कर्जत तालुक्यातील सायडोंगर-१ आणि परिसरात टोरंट पॉवरच्या प्रस्तावित ३,००० मेगावॉटच्या जलविद्युत प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू आहे. याप्रकरणी स्थानिक ग्रामस्थ, पर्यावरणप्रेमी आणि विरोधकांनी संताप व्यक्त केला आहे. मात्र आता देवेंद्र फडणवीस यांनी प्रकल्प किती फायद्याचा आहे, याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. फडणवीस म्हणाले की, "खोटा नरेटिव्ह तयार करणे हे महाराष्ट्रविरोधी कृत्य आहे. या प्रकल्पामुळे कोणाचीही उपजीविका नष्ट होणार नाही आणि जर तशी परिस्थिती निर्माण झाली तर त्यांच्या पुनर्वसनाचा योग्य विचार केला जाईल. हा संपूर्ण प्रकल्प कायद्याच्या चौकटीत राहूनच पूर्ण केला जाईल."



### स्वार्थापोटी विकासकामांना विरोध अयोग्य

'समाजातील सर्व घटकांचा विचार करूनच या प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. परंतु, केवळ राजकीय स्वार्थापोटी या विकासात्मक प्रकल्पाला विरोध केला जात असेल, तर ते अत्यंत अयोग्य आहे. राजकीय स्वार्थापोटी विकासकामांना विरोध करणे योग्य नाही. समाजातील विविध घटकांचे हित लक्षात घेऊनच प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांवर प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि पर्यावरणीय उपाययोजनांच्या आधारेच अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे," असेही फडणवीस म्हणाले.

### निसर्गाचा भयानक विनाश - रोहित पवार

सायडोंगर वनक्षेत्रात सध्या विकासाच्या नावाखाली निसर्गाचा भयानक विनाश सुरू आहे. तब्बल ३२ हजारांहून अधिक झाडांची अक्षरशः कत्तल सुरु झालीय.हे होत असताना जीवाच्या आकांताने ओरडणाऱ्या तेथील हजारो-लाखो पक्ष्यांचा आकांत कुणालाही ऐकू येत नाही, हे दुर्दैव आहे, अशी टीका आमदार रोहित पवार यांनी केली.

### प्रकल्प भीमाशंकरपासून १६ किमीवर

प्रकल्पाच्या स्थानाबाबतही सरकारने स्पष्टीकरण दिले आहे. सरकारच्या माहितीनुसार, प्रस्तावित प्रकल्प भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून १६ किमी, तर ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किमी अंतरावर आहे. हा प्रकल्प इको-सेन्सिटिव्ह झोनच्या बाहेर असल्याचा दावाही करण्यात आला आहे.

**सरकारचा पर्यायी वृक्षारोपणाचा दावा**

या प्रकल्पासाठी २३३ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. त्यासाठी कंपनीने वन विभागाला २५३ हेक्टर जमीन सुपूर्द केली आहे. संमिश्र पानावर



# 'नैना'त १५ लाख रोजगार निर्मिती

## भूमिपुत्रांना प्राधान्य; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**पनवेल :** नैना (नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र) परिसराच्या नियोजनबद्ध विकासातून सुमारे १५ लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी पाच लाख रोजगार गलेलठ्ठ वेतनाच्या असतील. या विकासातून निर्माण होणाऱ्या संधींमध्ये भूमिपुत्रांना प्राधान्य देण्यात येईल. शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करून त्यांना विकासाचे भागीदार बनविण्यासह आधुनिक पायाभूत सुविधा आणि सक्षम कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातून 'तिसरी मुंबई' महाराष्ट्राच्या विकासाचे नवे ग्रोथ इंजिन ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

### महाराष्ट्राचे नवे ग्रोथ इंजिन - एकनाथ शिंदे

नैना क्षेत्रातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावून या परिसराच्या विकासाला गती देण्याच्या दृष्टीने आजचा दिवस ऐतिहासिक आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि अटल सेतूमुळे पनवेल, उरण, नवी मुंबई आणि रायगड परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळाली असून, हा परिसर महाराष्ट्राचे नवे ग्रोथ इंजिन म्हणून उदयास येत असून विमानतळाला जोडणाऱ्या महत्त्वपूर्ण कनेक्टिव्हिटी प्रकल्पांच्या लोकार्पणामुळे मुंबई-पुणे महामार्ग आणि राष्ट्रीय महामार्गांशी जोडणी अधिक सक्षम होणार आहे.

पनवेल तालुक्यातील शिरढोण येथे नैना परिसरातील विकासकामांचे भूमिपूजन, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पूर्वेकडील जोडणीसाठी विकसित करण्यात आलेल्या एसबीआर-९, बीआर-४, बीआर-५ आणि उरण बायपास पूल या महत्त्वपूर्ण कनेक्टिव्हिटी प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी भूधारकांना मालमत्ता पत्रकांचे वाटपही फडणवीस यांनी केले, त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा केवळ विमानतळ नसून संमिश्र पानावर

## निवडक

### मुंबई, ठाण्याला उष्णतेचा 'यलो अलर्ट'

**मुंबई :** मुंबईसह ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांत भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) 'यलो अलर्ट' जारी केला आहे. मुंबईत आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याचा अंदाज असून, कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २६ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीसही मुंबईकरांना उष्ण आणि दमट हवामानाचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या तापमानातही तुलनेने वाढ नोंदविण्यात आली.

### राहुल यांचा १ नोव्हेंबरला 'चलो दिल्ली'चा नारा

**नवी दिल्ली :** निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमिततेच्या मुद्द्यावरून काँग्रेसने केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाला लक्ष्य करत 'चलो दिल्ली'चा नारा दिला आहे. येत्या १ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर होणाऱ्या इंडिया ब्लॉकच्या सभेला विद्यार्थी, शेतकरी, मजूर, महिला, तरुण आणि व्यावसायिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टद्वारे केले संमिश्र पानावर



# हवाई दलाच्या प्रात्यक्षिकांचा थरार

**वाराणसी :** भारतीय हवाई दलाच्या 'विंग्ज ओव्हर गंगा' या हवाई दलाच्या प्रात्यक्षिकांच्या कार्यक्रमाला रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थिती लावली. वाराणसीत 'नमो घाट' येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमात हवाई दलाच्या प्रमुख प्रात्यक्षिक पथकांनी गंगेच्या आकाशात विविध हवाई कसरती सादर केल्या.

### वाराणसीत 'विंग्ज ओव्हर गंगा'ला मोदींची उपस्थिती

लढाऊ विमानांच्या गर्जनेने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मोदी यांच्यासमवेत संमिश्र पानावर

### 'सारंग' हेलिकॉप्टर पथकाने प्रेक्षकांना केले मंत्रमुग्ध

'ओंकार फॉर्मेशन' दरम्यान एमआय-१७ या हेलिकॉप्टरमधून राष्ट्रीय ध्वज घेऊन आकाशात उड्डाण करण्यात आले. राफेल, सुखोई, मिराज-२०००, तेजस, मिग-२९ आणि जग्वार या लढाऊ विमानांसह वाहतूक विमाने व हेलिकॉप्टरनी भारतीय हवाई दलाच्या कार्यक्षमतेचे आणि सामर्थ्याचे दर्शन घडवले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# स्थानिकांच्या उत्पादनांना प्राधान्य द्या!

## 'मन की बात'मधून पंतप्रधानांचे नागरिकांना आवाहन

**नवी दिल्ली :** नागरिकांना सणासुदीच्या खरेदीदरम्यान स्थानिक कारागिरांची उत्पादने खरेदी करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. अशा कृतीमुळे 'व्होकल फॉर लोकल' मोहिमेला चालना मिळेल आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार होण्यास मदत होईल.

'मन की बात'मध्ये ते म्हणाले की, 'व्होकल फॉर लोकल'ची भावना भारतीय उत्पादनांना जगभरातील बाजारपेठांमध्ये पोहोचवत आहे. उदाहरणार्थ, बिहारमधील 'मखाना' हा ग्रीसपर्यंत पोहोचत आहे, तर कर्नाटकातील 'तूर डाळ' मालदीवला निर्यात केली जात आहे, ज्यामुळे भारतीय शेतकऱ्यांसाठी नवीन जागतिक बाजारपेठा खुल्या होत आहेत.

पंतप्रधानांनी नमूद केले की, 'सणासुदीच्या काळात लोक आपल्या कुटुंबासाठी आणि प्रियजनांसाठी अनेक गोष्टी खरेदी करतात. यावेळीही खरेदी करताना, कृपया स्थानिक कारागिरांच्या उत्पादनांना प्राधान्य द्या. संमिश्र पानावर

# 'एसआयआर'साठी वापरलेल्या सॉफ्टवेअरची माहिती देणे अशक्य

## ट्रेड सिक्रेट असल्याचे निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**नवी दिल्ली :** भारतीय निवडणूक आयोगाने विशेष सखोल पुनर्विलोकलन (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान मतदार याद्यांमधील त्रुटी आणि विसंगती ओळखण्यासाठी वापरलेल्या सॉफ्टवेअरचे नाव आणि आवृत्ती उघड करण्यास नकार दिला आहे. ही माहिती 'व्यावसायिक गोपनीयता, व्यापार रहस्ये आणि बौद्धिक संपदा' यांच्याशी संबंधित



असून माहिती अधिकार कायद्यांतर्गत याला सूट असल्याचे आयोगाने म्हटले आहे.

'एसआयआर प्रक्रियेसाठी कोणतेही नवीन सॉफ्टवेअर विकसित किंवा खरेदी केलेले नाही. मतदार नोंदणी अधिकारी (ईआरओ) एखाद्या मतदाराचा समावेश करायचा की वगळायचा, याचा निर्णय 'तथ्ये आणि नोंदींच्या आधारावर' घेतले जातात.

संबंधित मतदारसंघाची मतदार यादी तयार करणे आणि त्यात सुधारणा संमिश्र पानावर

### आंतरराष्ट्रीय विमानांचे नवी मुंबईतून उड्डाण

**मुंबई :** देशाची आर्थिक राजधानी मुंबईतील 'छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या' टर्मिनल १ च्या पुनर्विकासासाठी जागा मोकळी करण्यासाठी आणि दुहेरी विमानतळ प्रणालीचा मार्ग सुकर करण्यासाठी इंडिगो आणि एअर इंडिया समूह डिसेंबरपासून मुंबईच्या विद्यमान विमानतळावरील विमाने टप्प्याटप्प्याने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर हलवणार आहेत.

२०२७ च्या उन्हाळी विमान वाहतूक संमिश्र पानावर

# माजी सरन्यायाधीश चंद्रचूड सरकारपुढे जास्तच नम्र राहिले

**नवी दिल्ली :** माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड हे सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियममध्ये औपचारिक विचारविनिमय होण्यापूर्वी न्यायिक नियुक्तीसाठी प्रस्तावित नावांवर सरकारच्या मतावर चर्चा करत असत. तसेच न्यायिक नियुक्तीच्या बाबतीत, न्यायमूर्ती चंद्रचूड हे सरकारशी आवश्यकतेपेक्षा जास्त नम्रपणे वागले आणि सरकारसोबत आवश्यकतेपेक्षा जास्त प्रशासकीय



**सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश एस. के. कौल यांचा आरोप**

मुद्द्यांवर चर्चा केली, असा आरोप सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती संमिश्र पानावर

# राष्ट्रवादीला अर्थखाते?

## फडणवीस यांचा सकारात्मक प्रतिसाद

### हिवाळी अधिवेशनापूर्वी निर्णय होण्याची शक्यता

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट)वरिष्ठ नेत्यांनी रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन अर्थखाते पुन्हा पक्षाला मिळावे अशी मागणी केली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या नेत्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यावेळी झालेल्या बैठकीत अर्थखात्याच्या हस्तांतरणासंदर्भात चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी अर्थखाते राष्ट्रवादीकडे परत येईल, अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी व्यक्त केली.

बैठकीनंतर संमिश्र पानावर

## पॉवरलाईन

संजय मिस्त्री




**काय म्हणता, तुमच्याकडे वरच्या मजल्यावरून पाणी गळतं? कसं शक्य आहे. शहरात कुठेच पाण्याचा थेंब नाही!**

### फायनान्स कंपनी कार्यालयातच शेतकऱ्याने घेतला गळफास

# माय, मला लय मारायलेत, तरास सोसंना, पैशे टाक...

**सुजित ताजणे / छत्रपती संभाजीनगर**

दुष्काळाचा सामना करणाऱ्या एका शेतकऱ्याने खासगी फायनान्स कंपनीच्या कार्यालयातच गळफास लावून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना शनिवारी नांदेड शहरात उघडकीस आली. मृताच्या नातेवाईकांनी ही आत्महत्या नसून खासगी सावकाराने केलेला खून असल्याचा आरोप करीत पोलीस ठाण्यात ठिय्या दिला.

चंद्रकांत शिंदे (४०) असे या शेतकऱ्याचे नाव आहे. ते मुदखेड तालुक्याच्या माळकौठा येथील रहिवासी आहेत. केएफ उर्फ खालसा फायनान्स या खासगी कंपनीच्या चिखलवाडी येथील कार्यालयात चंद्रकांत यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. गेल्या महिन्यात चंद्रकांत यांनी या खासगी फायनान्स कंपनीकडून १० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कंपनीने ३ हजार रुपये कापून सात रुपये हातात ठेवले. यावरून व्याजदर ३० टक्के संमिश्र पानावर




**कंपनीचा संचालक, कर्मचारी फरार; कुटुंबीयांचा खुनाचा आरोप**



> कंपनीने त्याला डांबून ठेवून खूनच केला आहे. माझ्या मुलाची आत्महत्या नसून कंपनीच्या दोषींवर खुनाचे गुन्हे दाखल करावे.
> **- सर्जाबाई शिंदे**, मृताची आई

> नातेवाईकांकडून तक्रार प्राप्त करून कार्यवाही केली जाईल. कुणालाही सोडले जाणार नाही. **- डॉ. नीलाभ रोहन**, जिल्हा पोलिस अधीक्षक

### शेतकऱ्याला दोन दिवस ठेवले डांबून

गुरुवारी खालसा फायनान्सचे लोक चंद्रकांत यांच्या गावात गेले होते. तेथून त्यांना गाडीत बसवून नांदेडला आणले. त्यांना दोन दिवस डांबून ठेवले. शनिवारी सकाळी चंद्रकांत यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत फायनान्स कार्यालयात आढळला. मृताच्या आई व मुलीने टाहो फोडत न्यायाची मागणी केली आहे.

# राळेगणसिद्धी, हिवरेबाजारचा धडा

## उत्तर आपल्याच अंगणात






**विजय गायकवाड**
ज्येष्ठ पत्रकार व कृषी अभ्यासक

**मुंबई :** इस्त्रायल, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅलिफोर्निया आणि अलवर. या मालिकेत आपण जगभरातले प्रयोग पाहिले. पण दुष्काळमुक्तीची दोन उत्तम उदाहरणे महाराष्ट्राच्या याच पर्जन्यछायेच्या पट्ट्यात आहेत. एक पारनेर तालुक्यात, तर दुसरं अहिल्यानगर तालुक्यात. राळेगणसिद्धी आणि हिवरेबाजार.

राळेगणसिद्धी हे १९७० च्या दशकात इतर कोरडवाहू गावांसारखंच गाव होतं. पाणी नाही, शेती नाही आणि त्यामुळे दारिद्र्य आणि व्यसनाधीनता. अण्णा हजारे यांच्या पुढाकाराने गावाने पाणलोट विकासाचे काम हाती घेतले. डोंगरावर पावसाचे पाणी अडवण्यासाठी चर, नाल्यांवर बंधारे आणि पाझर तलाव गाळमुक्त करणे, हे काम श्रमदानातून झाले.

पण खरे परिवर्तन नियमांतून आले. संमिश्र पानावर

# ताज्या म्हावऱ्यावर खवय्ये मारणार ताव...

**मुंबई :** पर्यटनाला चालना देण्यासह देश विदेशातील खवय्यांना पुन्हा एकदा ताजा ताजा मासळीचा आस्वाद घेता येणार आहे. माहिम चौपाटी परिसरात पुन्हा एकदा मुंबईकरांच्या सेवेत 'सी फूड प्लाझा' आला आहे. विशेष म्हणजे आठवड्याचा प्रत्येक बुधवार, शुक्रवार, शनिवार आणि रविवार संध्याकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत सी फूड प्लाझा सुरू राहणार आहे.

मुंबईकरांना दर्जेदार, ताज्या आणि चविष्ट अशा माशांच्या मेजवानीचा आस्वाद उपलब्ध करून देण्यासाठी मुंबईतील पहिला सी फूड प्लाझा माहीम चौपाटी परिसरात पुन्हा एकदा सज्ज झाला आहे. शनिवारपासून माहीम सी फूड प्लाझा येथे महिला बचत गटांचे स्टॉल्स कार्यरत झाले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गटनेते तथा जी उत्तर प्रभाग समिती अध्यक्ष यशवंत किल्लेदार, मराठी अभिनेते कमलाकर सातपुते, जी उत्तर विभागाचे





## 'सी फूड प्लाझा' पुन्हा एकदा मुंबईकरांच्या सेवेत

सहाय्यक आयुक्त योगेश देसाई आदींसह पालिका अधिकारी, महिला उपस्थित होत्या. आकर्षक रंगसंगती, सेल्फी पॉइंट, आरामदायी आसन व्यवस्था आणि कोळी गीतांचा आणि पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी सर्वतोपरी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. महिला बचतगट आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासह पर्यटन वृद्धीसाठी मुंबईतील पहिला 'सी फूड प्लाझा' माहीम चौपाटी लगत सुरू करण्यात आला.

## सेल्फी पॉइंट आकर्षक रोषणाई

माहिम चौपाटी स्थित सी फूड प्लाझाच्या ठिकाणी आकर्षक अशा रोषणाई करण्यात आली आहे. नागरिकांना आणि पर्यटकांना सेल्फी पॉइंटच्या ठिकाणी छायाचित्रे घेण्याचीही उत्तम व्यवस्था उपलब्ध आहे. या महिला बचत गटांना मत्स्य उत्पादनावर आधारित प्रशिक्षणही देण्यात आले आहे. व्यवसाय कौशल्य विकसित होतानाच महिलांचे जीवनमान उंचावेल, तसेच स्थानिक अर्थव्यवस्था वाढीस लागण्यासोबतच विकासही होईल, याचा प्रयत्न पालिका प्रशासनाने केला आहे.

## कोळी खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन द्या!

मुंबईतील कोळीवाडे आणि येथील खाद्यसंस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कोळीवाड्यांचे संवर्धन आणि कोळी खाद्यसंस्कृतीला चालना देण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील आहे. नागरिकांनी या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट देऊन कोळी संस्कृती आणि कोळी खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहित करावे, असे आवाहन जी (उत्तर) विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश देसाई यांनी केले आहे.

# पाणीगळती रोखण्यासाठी विदेशी तंत्रज्ञानाचा वापर

## जी-दक्षिण विभागासाठी १० कोटींची निविदा

**मुंबई :** पाणी गळतीमुळे वाया जाणारे पाणी रोखण्यासाठी मुंबई महापालिकेने अद्ययावत विदेशी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रायोगिक तत्त्वावर जी दक्षिण विभागातील पाणी गळती रोखण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून यासाठी १० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. एकूणच २६ विभागीय कार्यालय क्षेत्रातील पाणी गळती रोखण्यासाठी १८० कोटींचा खर्च अपेक्षित असून यासाठी टप्प्याटप्प्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या ब्रिटिशकालीन असून त्या जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे वारंवार पाणी गळतीचे प्रकार घडत आहेत. मुंबईला दररोज ४,१०० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो, त्यापैकी १५ ते २० टक्के पाणी गळतीमुळे वाया जाते. मात्र मुंबईत जलवाहिन्यांचे जाळे जमिनीखालून विस्तारले गेले आहे. त्यामुळे जलवाहिनीला नेमकी



गळती कुठे लागली याचा शोध घेण्यातच वेळ जातो. त्यामुळे जपानी तंत्रज्ञानाचा वापर करून पाणी गळतीचा शोध घेतला जाणार आहे. परंतु ऑगस्ट महिन्यात पालिकेने जपानी फुजीटेकॉम तंत्रज्ञानाची प्रायोगिक चाचणी घेतली होती.

या चाचणीदरम्यान अवघ्या २० मिनिटांत १२ ठिकाणची पाणीगळती शोधण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या तंत्रज्ञानात सोनार प्रणालीचा वापर करून जमिनीखालील जलवाहिन्यांमधील गळतीचे स्थान निश्चित केले जाते.

### गळतीचे अचूक ठिकाण शोधणे शक्य

नव्या तंत्रज्ञानामुळे जलवाहिनीतील गळतीचे अचूक ठिकाण शोधणे शक्य होणार आहे. त्यामुळे दुरुस्तीचे काम जलद गतीने करता येईल आणि विनाकारण रस्ते खोदण्याचे प्रमाणही कमी होईल, असा विश्वास पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले.

### दुरुस्तीच्या कामाला मिळू शकते गती

सध्या पारंपरिक पद्धतीने गळती शोधण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागू शकतो. त्या तुलनेत नव्या तंत्रज्ञानामुळे कमी वेळेत गळतीचे ठिकाण शोधता आल्यास दुरुस्तीच्या कामाला गती मिळू शकते. मात्र, प्रायोगिक चाचणीतील निष्कर्ष प्रत्यक्ष कामात कितपत प्रभावी ठरतात, हे पुढील अंमलबजावणीत स्पष्ट होणार आहे.

## सायबर फसवणुकीप्रकरणी वकिलाला अटक

**आशीष सिंह/मुंबई**

देशव्यापी २८ हजार कोटी रुपयांच्या कथित सायबर फसवणूक आणि 'डिजिटल अरेस्ट' (डिजिटल अटक) रॅकेटशी संबंधित मनी लाँड्रिंग (अवैध आर्थिक व्यवहार)च्या तपासात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) एका वकिलाला अटक केली आहे. या प्रकरणातील ही सातवी अटक आहे.

राजेश उपाध्याय ऊर्फ राजेश शाह असे या वकिलाचे नाव असून तो दिल्लीला जाण्यासाठी मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील बोर्डिंग गेटवर असताना ईडीच्या पणजी युनिटच्या पथकाने त्याला शनिवारी ताब्यात घेतले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईत सीमाशुल्क (कस्टम्स) आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) अधिकाऱ्यांनी ईडीला सहकार्य केले. उपाध्यायला पणजी येथे नेण्यात आले आणि तेथील विशेष पीएमएलए न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

# एकसमान फेरीवाला स्टॉल्स

**मुंबई :** ऐतिहासिक कुलाबा कॉजवे रोडवर पात्र फेरीवाल्यांना ९१ एकसमान स्टॉलचे वाटप करण्यात येणार आहे. यासाठी मुंबई महापालिकेकडून २.२८ कोटींचे कंत्राट मंजूर करण्यात आले आहे. शहरातील फेरीवाले व्यवसाय अधिक सुव्यवस्थित करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलल्याचे भाजप नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी सांगितले.

२०२४ मध्ये कुलाबा कॉजवेच्या विकासाची संकल्पना मांडताना एकसमान स्टॉल्स, दुकानांचे एकसारखे नामफलक आणि रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याचे नियोजन करण्यात आले होते. पालिकेकडून क्यूआर कोड आधारित ओळखपत्रे असलेल्या पात्र फेरीवाल्यांना एकसमान स्टॉल्स उपलब्ध करून देणारा कुलाबा हा मुंबईतील पहिला परिसर ठरणार आहे. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या प्रयत्नांतून हा उपक्रम जिल्हा नियोजन व विकास समिती निधीतून अर्थसहाय्यित करण्यात आला आहे.

## पर्यटनाला चालना आणि पादचाऱ्यांसाठी सुविधा




### ...तर मोठे खरेदी केंद्र म्हणून नावारूपाला येईल

नार्वेकर पुढे म्हणाले की, पात्र फेरीवाल्यांना एकसमान स्टॉल्स उपलब्ध करून दिल्यामुळे मुंबईतील पादचाऱ्यांची ये-जा अधिक सुलभ होईल. कुलाबा कॉजवेसारख्या भागात खरेदीसाठी हजारो नागरिक आणि परदेशी पर्यटक नियमितपणे भेट देतात. या प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी झाल्यास कुलाबा कॉजवे हे जागतिक दर्जाचे खरेदीचे केंद्र म्हणून विकसित होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

### एकसमान आकर्षक स्टॉल्स

स्टॉल्सच्या उभारणीचे कंत्राट मे. पुष्पम इन्फ्राप्रोजेक्ट्स या कंपनीला देण्यात आले आहे. प्रत्येक स्टॉलचा आकार अंदाजे १ x १ मीटर असणार आहे. फेरीवाल्यांना सोयीस्कर व्यवसाय करता यावा आणि रस्त्यावरून पाहताना संपूर्ण परिसराला एकसमान, आकर्षक स्वरूप प्राप्त व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

### कुलाब्यातील पर्यटनाला चालना

एका स्टॉलचा नमुना यापूर्वी कुलाबा कॉजवे येथे ठेवण्यात आला होता. पहिल्या टप्प्यामध्ये विशिष्ट स्टॉल्सची येत्या काही आठवड्यांत उपलब्ध होतील. सर्व स्टॉल्सची रचना एकसमान आणि शिस्तबद्ध ठेवल्यामुळे येथील उत्साही फेरीवाले व्यवसाय आणि पादचाऱ्यांची मुक्त हालचाल यांच्यात योग्य समन्वय साधला जाईल. या उपक्रमामुळे परिसराच्या सौंदर्यात भर पडेल आणि कुलाब्याच्या पर्यटन आकर्षणातही लक्षणीय वाढ होईल, असे मकरंद नार्वेकर यांनी सांगितले.

# कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा देणार नाही!

## गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या पदाधिकारी मेळाव्यात दरेकरांची ग्वाही

**मुंबई :** मुंबईकरांनी जो विश्वास दाखवला आहे त्या मुंबईकरांच्या आणि सहकार चळवळीतील कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तसुभरही तडा देणार नाही, अशी ग्वाही मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी दिली. सहकार पॅनेलतर्फे मुंबईतील गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या जाहीर मेळावा आज आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात दरेकर बोलत होते.




मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, आमदार व संचालक प्रसाद लाड, सहकारातील ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे, मुंबई हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, राज्य सहकारी संघाचे सचिव रामदास मोरे, मुंबई बँकेचे संचालक विठ्ठल भोसले, नितीन बनकर, विष्णू घुमरे, पुरुषोत्तम दळवी, संदीप घनदाट, अनिल गजरे, जिजाबा पवार, संचालिका जयश्री पांचाळ, कविता देशमुख, शिल्पा सरपोतदार, बी. डी. पारले, डॉ. महाजन, भाई सावंत यांसह गृहनिर्माण सोसायट्यांमधील पदाधिकारी, सहकारातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### केंद्रीय पथकाने घेतली दखल

मुंबई बँकेने कर्ज धोरण तयार केले. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विनंती केली की, सवलती द्या. त्यासाठी गृहनिर्माण संस्थांची परिषद घेतली. शासनाच्या सवलती मिळाल्या, जीआर निघाले आणि आज स्वयं पुनर्विकास योजना मुंबईत गतीने आकार घेतेय. १६०० प्रस्ताव आले असून ४६ संस्थांना कर्ज दिले. २१ इमारतीत लोक राहायला गेली. या योजनेला मिळणारा प्रचंड प्रतिसाद बघून केंद्राचे पथक ही योजना समजून घेण्यासाठी आणि देशभर राबवण्यासाठी येथे येऊन गेले, असे दरेकर यांनी सांगितले.

## नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक

**मेघा कुचिक/मुंबई**

परदेशात चांगल्या पगाराच्या हॉटेल नोकरीचे खोटी स्वप्न दाखवून दोन तरुणांना लाओसमध्ये अडकवून त्यांच्या पासपोर्ट जप्त करण्यात आले आणि त्यांना सुमारे तीन महिने ऑनलाइन फसवणुकीच्या (सायबर फ्रॉड) कामात ढकलण्यात आले. या प्रकरणी २२ वर्षीय शेफने मुंबईच्या सहार पोलिसांकडे धाव घेत एका हॉटल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्याविरोधात तक्रार दाखल केली आहे.

गुरुवारी नोंदवण्यात आलेल्या एफआयआरमध्ये ऋषभ सोनकर असे आरोपीचे नाव नमूद करण्यात आले आहे.

# दिवाळीनिमित्त कालनिर्णय सांस्कृतिक भेट

**मुंबई :** मराठी साहित्य, कला आणि संस्कृतीचा समृद्ध वारसा जपणाऱ्या 'कालनिर्णय'तर्फे आयोजित 'कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी २०२६'चा प्रकाशन सोहळा आणि 'पाकनिर्णय स्पर्धा २०२७'चा पारितोषिक वितरण समारंभ माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात उत्साहात झाला. या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरलेल्या 'अपरिचित पु. ल.' या नाट्य-संगीत कार्यक्रमातून साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडण्यात आले.

यावेळी जयराज साळगावकर, समर्थ साळगावकर, शक्ती साळगावकर, चंद्रकांत काळे,




सतीश आळेकर, गिरीश कुलकर्णी, मोहसिना मुकादम, मंजिरी कपडेकर, प्रभाकर वाईरकर उपस्थित होते. 'कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी'चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

पु. ल. देशपांडे यांच्या लोकप्रिय विनोदी साहित्यापलीकडील गंभीर लेखन, चिंतन, कविता, संगीत आणि रंगभूमीवरील योगदानाचा वेध 'अपरिचित पु. ल.' या कार्यक्रमातून घेतला. चंद्रकांत काळे, सतीश आळेकर, गिरीश कुलकर्णी यांच्या सादरीकरणाने रसिकांना पुलंच्या कलाविश्वाची वेगळी ओळख करून दिली. निवेदन कुणाल रेगे यांनी केले. यावेळी 'पाकनिर्णय स्पर्धा'मधील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले.

# महाभारत घडवणाऱ्या क्लिप

**मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी उघड केलेल्या ऑडिओ क्लिपने महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप घडवला आहे. आता संबंधित राजकीय पक्ष परस्परविरोधी दावे करत आहेत. मुख्यमंत्र्यांनी एसआयटी चौकशीचे आदेश दिले असल्याने नेमके दोषी कोण हे उघड होण्यासाठी चौकशी संपण्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे. मात्र अशा खऱ्याखोट्या ऑडिओ क्लिप राजकारणासह कुठल्याही क्षेत्रात धुमाकूळ घालू शकतात, याची खूणगाठ मनाशी बांधावी लागणार आहे.**

ऑडिओ - व्हिडीओ बनावटगिरीची उदाहरणे पायलीला पन्नास आहेत. तीन वर्षांपूर्वी अभिनेत्री रश्मिका मंदाना हिच्या चेहऱ्यावर दुसऱ्याचा चेहरा बसवलेल्या डीपफेक व्हिडीओने देशभर गोंधळ माजवला होता. २०२४ च्या लोकसभा प्रचारात अमित शहा यांच्या भाषणाचा बदललेला व्हिडीओ फिरला. त्याविरोधात गुन्हा दाखल झाला आणि अटकेची कारवाईही झाली. त्याचकाळात बॉलिवूड सिताऱ्यांच्या एआय-प्रतिमांवरूनही पोलिसांकडे तक्रारीही नोंदवल्या गेल्या. २०२० च्या दिल्ली विधानसभेत डीपफेकचा राजकीय प्रचारातील पहिला मोठा प्रयोगही झाला आणि अमेरिकेत, न्यू हॅम्पशायर निवडणुकीत तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या बनावट आवाजाने मतदारांना 'मतदान करू नका' असे फोन गेले. प्रत्येक वादात क्लिप बनावट असल्याचे सिद्धच होतेच असे नाही. परंतु तंत्रज्ञानाच्या गैरवापराने कमालीचे नुकसान घडवले हे सत्य मात्र उरतेच.

व्हॉइस क्लोनिंग तंत्राला एखाद्या व्यक्तीच्या आवाजाचे अवघे काही मिनिटांचे नमुने पुरेसे असतात. टेक्स्ट-टू-स्पीच यंत्रे नंतर हुबेहूब त्याच्याच आवाजात कोणताही



क्राईम अलर्ट

रवींद्र राऊळ

मजकूर वाचू शकतात. खऱ्या आवाजात बदल करून वाक्य पुन्हा जोडणे म्हणजेच स्प्लाइसिंग हा वेगळा प्रकार आहे. संपूर्ण बनावट रेकॉर्डिंग तर त्याहून अधिक घातक. वास्तविक ध्वनिमुद्रणाचा अर्थ हटवणारे अर्धवट एडिटिंग अथवा पूर्ण बनावट रेकॉर्डिंग या दोन्हींमधला फरक ओळखणे जवळपास अशक्य झाले आहे. आवाज जुळणे म्हणजे ओळख पटणे नव्हे. व्हिडीओमध्ये चेहरा आणि ओठांची हालचाल बदलणारे डीपफेक आता मोबाइलवरही करता येतात.

व्हिडीओ आणि ऑडिओ तंत्रज्ञानाचा गैरवापर हा सध्याच्या डिजिटल युगातील एक अत्यंत गंभीर धोका आहे. एआय आणि प्रगत संपादन संधानांमुळे तंत्रज्ञानाचा गैरवापर करणे खूप सोपे झाले आहे. गुन्हेगार एखाद्या व्यक्तीच्या नातेवाईकाचा अथवा त्याच्या मित्राच्या आवाजाची हुबेहूब कॉपी करून 'मी संकटात आहे. मला त्वरित पैशांची गरज आहे' असे सांगून फसवणूक करण्याचे प्रकार घडत आहेत. बनावट व्हिडीओ तयार करून पैशांसाठी धमकावले जात आहे. लोकांचे वैयक्तिक व्हिडीओ आणि ऑडिओ त्यांच्या संमतीशिवाय गोळा करून त्याचा वापर ब्लॅकमेलिंग अथवा चुकीच्या कामांसाठी केला जात आहे.

याहूनही भीतीदायक परिणाम उलटगतीचा आहे. खोटे सहजगत्या घडवणे शक्य झाले आहे आणि खऱ्याला बनावट ठरवणेही सोपे झाले आहे. यालाच 'लायर्स डिविडेंड' म्हणतात. बनावटगिरीच्या शक्यतेमुळे खऱ्या डिजिटल पुराव्यांबाबतही संशय निर्माण होतो, हेही दुर्दैवच.

# मुंबईला प्रदूषणाचा विळखा

**देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईत विकासकामांचा वेग वाढला असला, तरी या विकासाची किंमत मुंबईकरांना प्रदूषणाच्या रूपाने मोजावी लागत आहे. शहरात सर्वत्र सुरू असलेली बांधकामे, रस्त्यांची कामे, रेडीमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्लांटमधून पसरणारी धूळ, वाहनांचा धूर आणि दुसरीकडे सुरू असलेली झाडांची कत्तल यामुळे पर्यावरणाचा समतोल राखणे हे गंभीर आव्हान उभे राहिले आहे. हवेची गुणवत्ता खालावत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांची प्रभावी व दीर्घकालीन अंमलबजावणी होणे काळाची गरज बनली आहे.**

मुंबईत गृहनिर्माण प्रकल्प, पुनर्विकास, मेट्रो, उड्डाणपूल, रस्ते आणि पायाभूत सुविधांची विविध कामे सुरू आहेत. या कामांमुळे शहराच्या विकासाला चालना मिळत असली, तरी बांधकामस्थळांवरून उडणारी धूळ परिसरातील नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. अनेक ठिकाणी बांधकाम साहित्याची उघड्यावर साठवणूक, मातीची वाहतूक करताना योग्य खबरदारीचा अभाव, तसेच रस्त्यांवरील धूळ वेळेवर साफ न होणे यामुळे प्रदूषणात भर पडते. बांधकामस्थळांवर धूळ नियंत्रणासाठी पाण्याची फवारणी, जाळीचे आच्छादन, साहित्य झाकून ठेवणे आणि वाहनांची चाके स्वच्छ करण्यासारख्या उपाययोजना आवश्यक आहेत. मात्र, या नियमांचे पालन केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात होते का, यावर कोणाचाच अंकुश नाही. नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याबरोबरच वारंवार उल्लंघन करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला तर अन् तरच प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

मुंबई महापालिकेतील विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी निवेदनाद्वारे प्रदूषणाचा मुद्दा चर्चेत आणला. किशोरी पेडणेकर यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याला सर्वपक्षीय नगरसेवकांनी समर्थन दिले. मुंबईतील हवेचा दर्जा आज इतका घसरला आहे की, मुंबईकर श्वास घेत नसून रोज विष पित आहेत. मुंबईचा सरासरी एक्यूआय (AQI) १५० ते २०० च्या पुढे गेला आहे, तर काही भागांत तो ३०० च्या पार पोहोचून 'अत्यंत गंभीर' श्रेणीत पोहचला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा असलेला आणि मुंबईचे नाक समजला जाणारा बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स विभाग प्रदूषणाचा मुख्य हॉटस्पॉट बनला आहे याकडे किशोरी पेडणेकर यांनी पालिका प्रशासनाचे लक्ष वेधले. किशोरी पेडणेकर यांनी मांडलेल्या मुद्द्यांवर सर्वपक्षीय नगरसेवकांनी आपली मतं मांडली. मात्र पालिका प्रशासनाने दिलेल्या उत्तरावर दस्तुरखुद्द महापौर



पालिका दर्पण

गिरीश चित्रे

रितू तावडे यांनी सभागृहात नाराजी व्यक्त केली. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणासाठी पालिका प्रशासनाने कडक पाऊल उचलणे गरजेचे आहे. मुंबईच्या विकासाला कोणीच विरोध करणार नाही, मात्र मुंबईच्या मुळावर विकास होत असेल तर तो कोणीच सहन करणार नाही. अन्यथा एक्यूआय वाढतोय त्याप्रमाणे मुंबईकरांचा पारा चढला तर त्याला पालिका प्रशासनच जबाबदार असेल असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

हवेची गुणवत्ता खालावली, प्रदूषणात वाढ हा प्रश्न दोनचार दिवसांपूर्वी चर्चेत आला असे नाही. पालिका सभागृहात अनेकदा यावर चर्चा झाली. मात्र आजही ठोस उपाययोजना कागदावरच. प्रदूषणाचा वाढता विळखा लक्षात घेता अनेक पर्यावरण तज्ज्ञांनी पुढील धोक्याचा इशारा देत मुंबई महापालिकेला सावधही केले. माया नगरी मुंबईत विविध प्राधिकरणाची तब्बल तीन हजारांहून अधिक कामे सु आहेत. बांधकाम ठिकाणी ठोस उपाययोजना करणे संबंधित प्राधिकरणाचे जबाबदारी आहे. बांधकाम ठिकाणी सेन्सर्स बसवणे, पाण्याचा मारा करण्यासाठी स्प्रिंकलर बसवणे, ३० ते ३५ फूट उंच पडदे लावणे अशी २८ प्रकारची नियमावली जारी केली. मात्र प्रत्यक्षात या नियमावलीची किती अंमलबजावणी केली जाते, याची तपासणी करण्यासाठी पालिकेकडे मनुष्यबळाचा अभाव आहे. त्यामुळे विकासाच्या नावाखाली पर्यावरणाशी खेळ मांडला आहे. आपल्या स्वार्थासाठी रोज शेकडो झाडांचा बळी दिला जात आहे. मात्र वाढत्या प्रदूषणामुळे आपणच आपल्या जिवाशी खेळत आहोत याचा विचार करण्याचा वेळ आपल्याकडे नाही, हे आश्चर्यच आहे. वाढत्या प्रदूषणाला रोखण्यासाठी मुंबई महापालिकेने २०२२ मध्ये वातावरण कृती आराखडा निश्चित केला. मात्र आराखड्यात नमूद गोष्टींची अंमलबजावणी कधी होणार, मुंबई प्रदूषणमुक्त होणार का, प्रदूषणमुक्त मुंबईसाठी ठोस आणि कठोर अंमलबजावणी गरज आहे.

शहरातील विविध बांधकामांसाठी वापरल्या जाणाऱ्या रेडीमिक्स काँक्रीट प्लांटमधूनही धूळ आणि सूक्ष्म कण हवेत मिसळण्याचा धोका असतो. त्यामुळे मुंबई महापालिकेने आरएमसी प्लांटची नियमित तपासणी करणे, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे आणि प्रदूषण नियंत्रणाच्या अटींचे पालन होत असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. केवळ नोटिसा बजावून किंवा दंड आकारून प्रश्न सुटणार नाही; तर सातत्यपूर्ण देखरेखही तितकीच महत्त्वाची आहे.

## निवडक

### दिवाळीपूर्वी वेतन द्या!

**मुंबई :** राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एसटी) सुमारे ८३ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, यासाठी नोव्हेंबर महिन्याचे वेतन दिवाळीपूर्वी अदा करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. यामुळे एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी होणार आहे.

### मुंबई विद्यापीठाची मोठी झेप

**मुंबई :** कार्बन समस्थानिकांच्या चाचण्यांसाठी परदेशातील प्रयोगशाळांवर अवलंबून राहण्याची गरज कमी करण्याच्या दृष्टीने मुंबई विद्यापीठाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. विद्यापीठाच्या मुंबई युनिव्हर्सिटी एक्सलरेटर सेंटर (एमयूएसी) अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कार्बन समस्थानिकांच्या चाचण्या करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या सुविधेमुळे विशेषतः सुगंध आणि स्वाद उद्योगातील उत्पादनांची अस्सलता तपासण्यास मदत होणार असून, संशोधन आणि उद्योग क्षेत्रालाही त्याचा लाभ मिळणार आहे.

### १.५ कोटी रुपयांचे चरस जप्त, एक अटक

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय बाजारात सुमारे १.५ कोटी रुपये किमतीचे चरस बाळगल्याप्रकरणी आणि त्याची विक्री केल्याप्रकरणी मुंबई गुन्हे शाखेने ४० वर्षीय व्यक्तीला अटक केली आहे. २४ ऑक्टोबर रोजी वांद्रे (पश्चिम) येथील त्याच्या निवासस्थानावर टाकण्यात आलेल्या छाप्यात पोलिसांनी १.५०५ किलो चरस जप्त केले. मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट ९ ला एका व्यक्तीकडून वांद्रे (पश्चिम) येथील त्याच्या घरातून अंमली पदार्थांची विक्री केली जात असल्याची अत्यंत गोपनीय माहिती मिळाली होती. या गुप्त माहितीच्या आधारे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट ९ च्या पथकाने पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत या घरावर छापा टाकला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी घरातून १.५०५ किलो चरस जप्त केले.

### सुरक्षा चाचणी यशस्वी

**मुंबई :** रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित करण्याच्या दृष्टीने मध्य रेल्वेने महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. नागपूर विभागातील आमला–छिंदवाडा या १०४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गावर स्वदेशी विकसित 'कवच ४.०' या स्वयंचलित रेल्वे सुरक्षा प्रणालीचे स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकन यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे. नागपूर विभागात याचे स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकन पूर्ण झालेला हा पहिलाच रेल्वेमार्ग आहे.

# कचरा वाहतुकीच्या कंत्राटात ३८ कोटींची वाढ

### के.एम.एस. कंपनीला पुन्हा मुदतवाढ

### मूळ १२२ कोटींचे कंत्राट १६१ कोटींवर

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या एल विभागातील घनकचरा संकलन आणि वाहतुकीच्या कंत्राटाच्या रकमेत वारंवार वाढ करण्यात आली असून आता हे कंत्राट तब्बल १६१ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. मे. के.एम.एस. (जेव्ही) या कंत्राटदाराला कचरा संकलन आणि क्षेपणभूमीपर्यंत वाहतूक करण्यासाठी जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. विशेष म्हणजे या मूळ कंत्राटाची रक्कम १२२.४९ कोटी रुपये असताना ती वाढून आता १६१.०१ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. म्हणजेच मूळ कंत्राटाच्या तुलनेत सुमारे ३८.५२ कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

एल विभागातील कचरा संकलन आणि वाहतुकीचे काम मे. के.एम.एस. (जेव्ही) या कंत्राटदाराला देण्यात आले होते. स्थायी समितीच्या १८ जुलै २०१८ रोजीच्या ठरावानुसार या कंत्राटाला मंजुरी देण्यात आली. त्यानंतर २० जुलै २०१८ रोजी कंत्राटदाराला स्वीकृतीपत्र देण्यात आले. सहा महिन्यांचा सुसज्जता कालावधी संपल्यानंतर २० जानेवारी २०१९ पासून सात वर्षांसाठी हे कंत्राट कार्यान्वित झाले. मूळ कंत्राटाची रक्कम ११७.७८ कोटी रुपये होती. त्यावर चार टक्के सादिलवार खर्च धरून एकूण रक्कम १२२.४९ कोटी रुपये झाली. मात्र, पुढे कंत्राटाच्या रकमेत वाढ करण्यात आली. स्थायी समितीच्या ५ ऑगस्ट २०२५ रोजीच्या ठरावानुसार ८.०३ कोटी रुपयांची वाढ मंजूर करण्यात आली. त्यामुळे कंत्राटाची रक्कम १३०.५३ कोटी रुपयांवर पोहोचली. त्यानंतर २ जानेवारी २०२६ रोजीच्या प्रशासकीय ठरावानुसार आणखी २०.१४ कोटी रुपयांची वाढ मंजूर करण्यात आली. परिणामी, कंत्राटाची सुधारित रक्कम १५०.६७ कोटी रुपये झाली. आता पुन्हा १०.३३ कोटी रुपयांची वाढ प्रस्तावित करण्यात आली असून, त्यामुळे कंत्राटाची एकूण रक्कम १६१.०१ कोटी रुपये होणार आहे.




### सहा महिन्यांच्या मुदतवाढीसाठी १०.३३ कोटी

विद्यमान कंत्राटाची मुदत १७ जुलै २०२६ रोजी संपत असल्याने कचरा संकलन आणि वाहतुकीच्या कामात खंड पडू नये, यासाठी १३ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव आहे. या कालावधीसाठी १० कोटी ३३ लाख ८७ हजार ४५ रुपये अतिरिक्त खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे.

### ...म्हणून जुन्याच कंत्राटदाराला काम

नव्या कंत्राटातील वाहनांची उपलब्धता आणि आवश्यक सुसज्जतेसाठी नऊ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. कचरा वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने विशेष प्रकारची असल्याने अल्प कालावधीत नवीन वाहने उपलब्ध करणे शक्य नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नवीन कंत्राट सुरू होईपर्यंत विद्यमान कंत्राटदाराकडूनच काम सुरू ठेवण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे.

# भगवती रुग्णालयाचा कारभार खासगी संस्थेकडे

- ४९० खाटांसाठी निविदा प्रक्रिया
- ५० टक्के खाटा पालिका रुग्णांसाठी राखीव

**मुंबई :** बोरिवली पश्चिम येथील श्री हरीलाल भगवती रुग्णालयाची पुनर्रचना करून उभारण्यात आलेले ४९० खाटांचे अत्याधुनिक मल्टी-स्पेशालिटी रुग्णालय आता सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर चालविण्यात येणार आहे. या रुग्णालयाच्या संचालनासाठी मुंबई महानगरपालिकेने ३० वर्षांच्या करारासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. रुग्णालयातील एकूण खाटांपैकी ५० टक्के खाटा पालिकेच्या रुग्णांसाठी आणि सरकारी आरोग्य योजनांच्या लाभार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. खासगी भागीदाराकडून किमान १५० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून पालिकेला दरवर्षी किमान ६.५६ कोटी रुपये भाडे मिळणार आहे.

भगवती रुग्णालयात ९० अतिदक्षता विभागातील (आयसीयू) खाटा, नऊ आधुनिक ऑपरेशन थिएटर्स, कॅथ लॅब, एमआरआय आणि सीटी स्कॅन यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. रुग्णालयाचा दर्जा आधुनिक वैद्यकीय मानकांनुसार राखतानाच पालिकेच्या तिजोरीवर अतिरिक्त आर्थिक भार पडू नये, या उद्देशाने पीपीपी मॉडेलचा अवलंब करण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.




### सर्वांना समान दर्जाच्या उपचारांची सुविधा

सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना उपचार मिळावेत, यासाठी रुग्णालयातील किमान ५० टक्के खाटा पालिका रुग्ण तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत यांसारख्या सरकारी आरोग्य योजनांच्या लाभार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. पालिकेचे व खासगी रुग्ण असा भेदभाव न करता सर्वांना समान दर्जाच्या उपचारांची सुविधा देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

### देखरेखीसाठी विशेष अधिकारी; नियमभंग केल्यास कारवाई

रुग्णालयाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी पालिका आयुक्तांकडून विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) नियुक्त केला जाणार आहे. रुग्णालय व्यवस्थापन प्रणालीतील (एचएमआयएस) माहितीचा या अधिकाऱ्याला प्रवेश असेल. त्यामुळे रुग्णांवरील उपचार, खाटांची उपलब्धता आणि बिलांची तपासणी करणे शक्य होणार आहे. रुग्णांच्या तक्रारींचे १५ दिवसांच्या आत निवारण करण्यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण कक्षही कार्यरत ठेवण्याची तरतूद आहे. करारातील अटींचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

# तुर्की बनावटीची पिस्तूल जाम झाल्याने टायगर बचावला

## गोळीबार तपास प्रकरणात माहिती उघड

**पूनम अपराज/मुंबई**

जमनाबाई नरसी इंटरनॅशनल स्कूलच्या क्रीडांगणाच्या प्रवेशद्वाराजवळ लॉरेन्स बिश्नोई गँगच्या सदस्यांनी केलेल्या गोळीबारादरम्यान तुर्की बनावटीची 'झिगाना' पिस्तूल जाम झाल्यामुळे अभिनेता टायगर श्रॉफ १८ ऑक्टोबरला एका संभाव्य प्राणघातक हल्ल्यातून थोडक्यात बचावला. अभिनेता त्याच्या बीएमडब्ल्यू कारमधून परतत असताना शूटर्सनी त्याच्यावर गोळीबार केला होता.

रेहान आणि फूल सिंह या शूटर्सनी टायगरच्या कारवर गोळीबार केला. रेहानकडे तुर्की बनावटीची झिगाना पिस्तूल होती, तर फूल सिंहकडे देशी कट्टा होता. सिंहने कट्ट्यातून ५ राऊंड फायर केले. पळून जात असताना रेहानने झिगाना पिस्तूलमधून आणखी दोन राऊंड झाडण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोन्ही राऊंड फायर होऊ शकले नाहीत व काडतुसे फायर न होताच खाली पडली.

### कबुतरखान्यावर ॲक्रेलिकचे आवरण



दादर कबुतरखान्यावरील तात्पुरते ताडपत्रीचे आवरण बदलण्यात आले असून आता पालिकेने त्यावर हवामानरोधक ॲक्रेलिक शीट्सचे आवरण बसवले आहे. (छायाचित्र : विजय गोहिल)

# 'त्या' कर्मचाऱ्यांना उच्च पेन्शन द्या!

## उच्च न्यायालयाचे ईपीएफओला निर्देश




**उर्वी महाजनी/मुंबई**

खासगी भविष्य निर्वाह निधी ट्रस्टचे नियम वैधानिक पेन्शन लाभांपेक्षा वरचढ ठरू शकत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निकाल देत मुंबई उच्च न्यायालयाने सूट मिळालेल्या आस्थापनांच्या कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांनी उच्च पेन्शनसाठी केलेले अर्ज मंजूर करून ते निकाली काढण्याचे निर्देश 'कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेला' दिले आहेत.

न्यायमूर्ती संदीप मार्ने यांनी १९ ऑक्टोबर रोजी दिलेल्या एका सामायिक निकालात, बेस्ट, ॲबॉट इंडिया आणि टाटा कम्युनिकेशन्ससह विविध आस्थापनांशी संबंधित कर्मचाऱ्यांचे उच्च पेन्शनचे अर्ज फेटाळून लावणारे आदेश रद्दबातल ठरवले आहेत. ईपीएफओला हे सर्व अर्ज पुढील आठ आठवड्यांत प्रक्रिया करून मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**हे कारण असू शकत नाही**

मालकाच्या भविष्य निर्वाह निधी ट्रस्टच्या नियमांमध्ये वेतनाची मर्यादा घातली गेली आहे, अंशदानावरील मर्यादा आहेत किंवा उच्च वेतनावर पेन्शनचा दावा करण्यासाठी संयुक्त पर्यायाची तरतूद स्पष्टपणे केलेली नाही, या केवळ कारणावरून कर्मचाऱ्यांना उच्च पेन्शन नाकारले जाऊ शकत नाही, असे स्पष्ट केले. सूट मिळालेल्या आस्थापनांच्या ट्रस्टचे नियम/करार हे भविष्य निर्वाह निधीपुरतेच मर्यादित असतात, असे निरीक्षण नोंदवले.

### ईपीएफओचे काय म्हणणे आहे?

काही नियोक्त्यांनी पात्रता ठरवण्यासाठी आवश्यक असलेले संबंधित ट्रस्टचे नियम, फॉर्म आणि इतर कागदपत्रे सादर केली नाहीत, असा युक्तिवाद करत ईपीएफओने याचिकांना विरोध केला होता तसेच सूट मिळालेल्या आस्थापनांच्या कर्मचाऱ्यांच्या उच्च पेन्शन दाव्यांचे मूल्यांकन लागू ट्रस्टच्या नियमांच्या संदर्भाने करावे, असे निर्देश देणाऱ्या जानेवारी २०२५ च्या परिपत्रकावरही त्यांनी हवाला दिला होता. मात्र, हे सर्व दावे न्यायालयाने फेटाळले.

### याचिकेची पार्श्वभूमी

कर्मचारी पेन्शन योजना (ईपीएस), १९९५ अंतर्गत दाखल केलेले अर्ज फेटाळणाऱ्या ईपीएफओच्या आदेशांना या सहा याचिकांमध्ये आव्हान देण्यात आले होते. कर्मचाऱ्यांनी असा युक्तिवाद केला होता की, जेव्हा त्यांनी वैधानिक वेतन मर्यादेपेक्षा जास्त असलेल्या प्रत्यक्ष वेतनावर भविष्य निर्वाह निधीचे अंशदान दिले होते, तेव्हा त्यांच्या उच्च पेन्शनचा हक्क अंतर्गत ट्रस्टच्या नियमांद्वारे मर्यादित केला जाऊ शकत नाही.

# टँकरद्वारे मिळणार पुनर्वापराचे पाणी

**शेफाली परब-पंडित/मुंबई**

मुंबईचे सात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी), जे २०२६ ते २०२८ या काळात पूर्ण होणे अपेक्षित आहेत, ते शहराच्या पर्यायी पाणीपुरवठ्याला मोठी चालना देतील अशी अपेक्षा आहे. परंतु, पुनर्वापराच्या पाण्यासाठी शहरात कोणतेही स्वतंत्र वितरण जाळे उपलब्ध नसल्यामुळे, पिण्याव्यतिरिक्त इतर कामांसाठी मोठ्या आस्थापनांना प्रक्रिया केलेले सांडपाणी पुरवण्यासाठी बीएमसीची मदार टँकर-फिलिंग हायड्रंट्सवर असणार आहे.

अनियमित मान्सूनमुळे पावसावर अवलंबून असलेल्या धरणांमधील पाण्याचा धोका समोर आल्यानंतर पालिकेने 'मुंबई सांडपाणी विल्हेवाट प्रकल्पा'अंतर्गत या प्रकल्पांचे काम वेगाने सुरू आहे. पर्यायी जलस्रोत प्रत्यक्षात येण्यासाठी आणखी तीन ते चार वर्षे लागण्याची शक्यता असताना हे सात एसटीपी पुनर्वापर केलेल्या पाण्याचा एक मोठा स्रोत उपलब्ध करून देतील. हे प्रकल्प दररोज २,४६४ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर तीन टप्प्यात प्रक्रिया करता येणार आहे.

# एअर क्वॉलिटी आकडेवारी दिशाभूल करणारी

## डिस्प्ले मॉनिटर्सवर आवाज फाऊंडेशनचा आक्षेप

**मनोज रामकृष्णन/मुंबई**

मुंबईवर प्रदूषणाचा थर साचत चालला असतानाच प्रदूषणविरोधी मोहीम राबवणाऱ्या 'आवाज फाऊंडेशन' या संस्थेच्या एका अभ्यासानुसार बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणच्या हवेची गुणवत्ता दर्शवणाऱ्या डिस्प्लेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सदोष किंवा दिशाभूल करणाऱ्या आकडेवारीमुळे नागरिकांना सुरक्षेचा खोटा आभास निर्माण होऊ शकतो, असा इशारा या संस्थेने दिला आहे.

देवेंद्र फडणवीस आणि पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना २५ ऑक्टोबरला पाठवलेल्या पत्रात फाऊंडेशनने म्हटले आहे की, वांद्रे आणि खार येथील बांधकाम साइटवरील मॉनिटर्सच्या अभ्यासात अनेक ठिकाणी हवेची पातळी शून्य किंवा अत्यंत कमी असल्याचे निदर्शनाला आले आहे, ज्यामुळे त्यांच्या अचूकतेबद्दल शंका निर्माण झाली आहे. दरम्यान, आवाज फाऊंडेशनच्या निष्कर्षांची पडताळणी केली जाणार आहे.




### रविवारी सर्वात वाईट हवा

पावसानंतर मुंबईत हवेची गुणवत्ता ढासळली आहे. रविवारी संध्याकाळी ७:१० वाजता 'एक्यूआय डॉट इन' नुसार मुंबईचा सरासरी एअर क्वालिटी इंडेक्स (एक्यूआय) १७१ होता, ज्याला 'अस्वास्थ्यकर' (Unhealthy) श्रेणीत मोजले जाते. त्या वेळी पीएम २.५ हे ८४ ग्रॅम आणि पीएम १० हे ११४ ग्रॅम होते, जे दोन्ही 'वाईट' श्रेणीत मोडतात.

### फाऊंडेशनकडून पडताळणी

फाऊंडेशनने मार्च ते मे आणि सप्टेंबर ते ऑक्टोबर २०२६ दरम्यान ३८ दिवसांत हवेच्या गुणवत्तेच्या डिस्प्लेचे २३० वेळा फोटोग्राफ्स काढले. २३ मार्च ते ५ मे या कालावधीतील २६ दिवसांसाठी त्यांनी बांधकाम साइटवरील डिस्प्लेवरील नोंदींची, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या 'समीर' ॲपवर उपलब्ध असलेल्या खेरवाडी आणि बीकेसी येथील सरकारी मॉनिटरिंग स्टेशनवरील नोंदींशी तुलना केली. ही ठिकाणे सर्वेक्षणासाठी निवडलेल्या साइट्सच्या सर्वात जवळची सरकारी स्टेशन्स होती.

### प्रमुख मागण्या

बांधकाम साइटवरील प्रत्येक मॉनिटरचे ऑडिट आणि कॅलिब्रेशन करावे, पीएम २.५ चा रिअल-टाइम, टाइम-स्टॅम्प केलेला डेटा ऑनलाइन प्रकाशित करावा, सदोष, बंद किंवा दिशाभूल करणारे डिस्प्ले असलेल्या साइट्सवर कारवाई करावी.

### एक रुपयापासून पणत्या उपलब्ध; देशासह विदेशातही निर्यात

# धारावीच्या कुंभारवाड्यात पणत्यांचा झगमगाट

**मुंबई :** दिवाळीचा सण जवळ येताच मुंबईतील धारावीच्या कुंभारवाड्यात पणत्यांचा बाजार सजला आहे. कुंभारांच्या हातातून आकार घेतलेल्या मातीच्या पणत्यांनी बाजारपेठेत रंगत आणली असून, खरेदीसाठी ग्राहकांची लगबग सुरू झाली आहे. यंदा महागाईमुळे पणत्यांच्या किमतीत काही प्रमाणात वाढ झाली असली, तरी एक रुपयापासून पणत्या उपलब्ध असल्याने ग्राहकांना आपल्या बजेटनुसार खरेदी करता येत आहे. धारावीतील पणत्यांना मुंबई देशातील विविध शहरांबरोबरच विदेशातही मोठी मागणी आहे.



दिवाळीच्या सुमारे पंधरा दिवस आधीपासूनच पणत्यांची विक्री सुरू होत असल्याने कुंभारवाड्यात सध्या लगबगीचे वातावरण आहे. दिवाळीत घराच्या उंबरठ्यापासून ते अंगणापर्यंत पणत्या लावण्याची परंपरा आजही कायम आहे. त्यामुळे विद्युत रोषणाईचा वाढता वापर असूनही मातीच्या पणत्यांना विशेष महत्त्व आहे. साध्या पणत्यांपासून आकर्षक रंगांनी सजवलेल्या पणत्यांपर्यंत विविध प्रकार बाजारात उपलब्ध आहेत. घरगुती सजावट, पूजा आणि दिवाळीच्या पारंपरिक प्रथांसाठी ग्राहकांकडून या पणत्यांना पसंती दिली जाते.

### वर्षभर विविध टप्प्यात काम सुरू

धारावीतील कुंभारवाडा हा मातीच्या भांड्यांसह पणत्या तयार करण्यासाठी प्रसिद्ध आहे. येथील कारागीर दिवाळीच्या हंगामासाठी आधीपासूनच पणत्या तयार करण्याच्या कामाला लागतात. माती मिळवणे, पणत्यांना आकार देणे, त्या वाळवणे आणि भाजणे तसेच रंगकाम करणे अशा विविध टप्प्यांतून पणत्या तयार होतात. विविध रंगीबेरंगी आणि मेन असलेल्या आकर्षक पणत्याही धारावीतील होलसेल बाजारात उपलब्ध आहेत.

### मोठ्या प्रमाणात उत्पादन

माती, इंधन, वाहतूक आणि उत्पादनासाठी लागणाऱ्या अन्य साहित्याच्या खर्चात वाढ झाल्याने यंदा पणत्यांच्या किमतीत काही प्रमाणात वाढ झाली आहे. तरीही पारंपरिक व्यवसाय टिकवण्यासाठी कुंभार बांधव दिवाळीच्या हंगामात मोठ्या प्रमाणावर उत्पादन करत आहेत. विशेष म्हणजे धारावीच्या कुंभारवाड्यात तयार होणाऱ्या पणत्यांची मागणी केवळ मुंबई किंवा महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून देशातील विविध भागांसह विदेशातही त्यांची निर्यात केली जाते.

> पणत्या बनवण्याची तयारी दोन महिने अगोदर सुरू होते. दिवाळीच्या पंधरा दिवसांपूर्वी कुंभारवाड्यातील पणती बाजार सुरू होतो. इथे एक रुपयांपासून पणती मिळते. येथील पणत्या चेन्नई, बंगळूरू, सुरत अशा देशातील विविध ठिकाणी जातात. तर विदेशात मलेशिया, दुबई, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, साऊथ आफ्रिका अशा विविध देशातही निर्यात होतात. दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल कुंभारवाड्यातून होते. महागाईमुळे कलर आणि मोठ्या पणत्याच्या किमतीमध्ये वाढ झाली आहे.
>
> – **चांद शेख** – पणती विक्रेते

# जिम ट्रेनरला अटक

**मुंबई :** प्रतिस्पर्ध्याला धमकावण्यासाठी स्वतःचे पिस्तुलासोबतचे व्हिडीओ शूट करून ते इन्स्टाग्रामवर अपलोड करणाऱ्या जिम ट्रेनरला चुनाभट्टी पोलिसांनी अटक केली आहे. सुमित साळुंखे असे या अटक करण्यात आलेल्या जिम ट्रेनरचे नाव आहे. चुनाभट्टी पोलीस ठाण्याच्या पोलीस नाईक विश्वजित पाटील यांनी त्याला अटक केली.

For Publishing Advertisements in
FREE PRESS JOURNAL & NAVSHAKTI
-: Contact :-
7777061799, 022-69028000
-: Email :-
ad@fpj.co.in, mail@fpj.co.in

## निवडक

### श्रमदानातून वनराई बंधाऱ्यांची उभारणी



**कर्जत :** कर्जत तालुक्यातील अंजप ग्रामपंचायतीच्या धारेवाडी येथे श्रमदानातून वनराई बंधारे उभारण्यात आले. मुख्यमंत्री पंचायतराज अभियान २.० अंतर्गत 'सेवा संकल्प अभियान' राबवून जलसंधारणाचा हा उपक्रम हाती घेण्यात आला.पालकमंत्री आणि स्थानिक आमदारांच्या आवाहनानुसार तालुक्यात वनराई बंधाऱ्यांची उभारणी केली जात आहे. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून जमिनीत जिरवणे आणि भूजलपातळी वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या कामात अंजप, अंत्राट नीड आणि धारेवाडी येथील ग्रामस्थांनी सहभाग घेतला. बंधारा उभारण्यासाठी भालचंद्र थोरवे यांनी चार ब्रास माती उपलब्ध करून दिली. लोकसहभागातून राबविण्यात आलेला हा उपक्रम जलसंधारण आणि पाणी बचतीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

### 'नशामुक्त भारत'साठी दुचाकी रॅली



**भाईंदर :** राष्ट्रीय एकता दिनाच्या पार्श्वभूमीवर 'नशामुक्त भारत'चा संदेश देण्यासाठी मीरा-भाईंदर पोलीस परिमंडळ-१ तर्फे जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गुजरातमधील केवडिया येथे जाणाऱ्या आंतरराज्यीय पोलीस दुचाकी रॅलीच्या निमित्ताने मीरारोड येथील भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृहात हा कार्यक्रम झाला.यावेळी विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी पथनाट्ये आणि नृत्यांतून व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम सादर केले. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमाला मीरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलीस आयुक्त निकेत कौशिक, महापौर डिंपल मेहता, आमदार नरेंद्र मेहता, पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण यांच्यासह पोलीस अधिकारी, नगरसेवक आणि भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेची पाणी बचतीच्या दिशेने वाटचाल!

## ८५ लाख रुपये खर्चून योजना कार्यान्वित





**सिंधुदुर्गनगरी :** भविष्यातील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे संकलन करून त्याचा पुनर्वापर करण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे जिल्हा परिषद भवन आणि परिसरातील पाण्याची गरज भागविण्यास मदत होणार आहे. जिल्हा परिषद भवनाशेजारी असलेल्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयालाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.

सुमारे ८५ लाख रुपये खर्चून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत प्रशासकीय इमारतीच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी संकलित करून त्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. त्यानंतर हे पाणी जिल्हा परिषद संकुलातील मोठ्या टाकीत साठविण्यात येणार आहे. या टाकीची क्षमता तब्बल १० लाख लिटर इतकी आहे.

योजनेनुसार, छतावरून संकलित होणारे पावसाचे पाणी प्रथम छोट्या टाकीत जमा केले जाईल. त्यानंतर त्याचे शुद्धीकरण करून ते मोठ्या टाकीत साठवले जाईल.

### जलसंधारणाच्या प्रयत्नांना बळ

वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शासकीय इमारतींमध्ये अशा प्रकारच्या योजना राबविण्याची गरज अधोरेखित होत आहे. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या या उपक्रमामुळे इतर शासकीय कार्यालयांनाही पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पुनर्वापर करण्यासाठी प्रेरणा मिळू शकते. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि नियमित देखभाल केल्यास जलसंधारणाच्या प्रयत्नांना बळ मिळण्यासोबतच भविष्यातील पाण्याच्या गरजांचे नियोजन करण्यासही मदत होणार आहे.

# उल्हासनगरच्या श्वासाची चिंता वाढली

## सलग चार आठवडे हवेचा दर्जा खालावलेलाच

**नवनीत बऱ्हाटे/ उल्हासनगर**

उल्हासनगरच्या हवेत वाढणाऱ्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याची चिंता वाढली आहे. ऑक्टोबर महिन्यात सलग चार आठवडे हवेचा दर्जा खालावलेला असल्याचे खासगी हवा मापन यंत्रणांच्या नोंदींवरून समोर आले आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) २०७ पर्यंत पोहोचला आहे. हवेतील सूक्ष्म धूलिकणांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, शहरातील वायुप्रदूषणाची स्थिती तपासून त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

उल्हासनगर शहरातील हवेची गुणवत्ता ऑक्टोबरच्या सलग चार आठवड्यांत खालावलेली राहिल्याचे खासगी हवा मापन यंत्रणा आणि अभ्यासकांच्या नोंदींतून दिसून येते. उपलब्ध आकडेवारीनुसार, या कालावधीत शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक १२५ ते २०७ दरम्यान नोंदवण्यात आला. सातत्याने समोर येणाऱ्या या नोंदींमुळे शहरातील वायुप्रदूषणाच्या परिस्थितीची सखोल तपासणी करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे.

२४ ऑक्टोबर रोजी उल्हासनगरचा हवा गुणवत्ता निर्देशांक २०७ इतका नोंदवण्यात आला. संबंधित माहितीनुसार, हवेतील पीएम २.५ कणांची पातळी ९६, तर पीएम १० कणांची पातळी १२० इतकी होती. सूक्ष्म धूलिकणांचे वाढते प्रमाण हवेच्या गुणवत्तेवर परिणाम करत असल्याने या नोंदींकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

मापनाची ठिकाणे, वेळा, धूलिकणांच्या प्रमाणाची एकके आणि हवा गुणवत्ता निर्देशांक मोजण्यासाठी वापरलेले निकष स्पष्ट होणे आवश्यक आहे. त्यामुळे अधिकृत मापन यंत्रणांकडून या आकडेवारीची पडताळणी केल्यानंतरच शहरातील प्रदूषणाची नेमकी श्रेणी आणि तीव्रता निश्चित करता येणार आहे.

उल्हासनगरची हवा सुधारण्यासाठी सातत्यपूर्ण देखरेख, अधिकृत मोजमाप आणि ठोस कृती यांची आवश्यकता आहे. केवळ एका दिवसाच्या आकडेवारीवर अवलंबून न राहता दीर्घकालीन नोंदींचे विश्लेषण केल्यास हवेच्या गुणवत्तेतील बदल अधिक स्पष्ट होतील. त्यानुसार प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांची व्याप्ती निश्चित करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य होईल.




### वस्तुस्थितीची पडताळणी करणे आवश्यक

उल्हासनगरच्या विविध भागांतील हवेच्या गुणवत्तेचा तुलनात्मक अभ्यास केल्यास प्रदूषणाचे स्थानिक स्वरूप स्पष्ट होऊ शकते. वर्दळीचे रस्ते, निवासी परिसर आणि बांधकामे सुरू असलेल्या भागांमध्ये नियमित मोजमाप केल्यास प्रदूषणाचे संभाव्य स्रोत ओळखण्यास मदत होईल. त्याचबरोबर धुळीचे प्रमाण आणि प्रदूषणातील दैनंदिन बदलांचा अभ्यास करून संबंधित यंत्रणांना प्रभावी उपाययोजना आखता येतील. सलग चार आठवडे हवेचा दर्जा खालावल्याच्या नोंदींच्या पार्श्वभूमीवर महापालिका आणि संबंधित प्रदूषण नियंत्रण यंत्रणांनी समन्वय साधून वस्तुस्थितीची पडताळणी करणे आवश्यक आहे.

# मीरा-भाईंदरची हवा प्रदूषित

## कनकिया, इंद्रलोकमध्ये प्रदूषणाची तीव्रता अधिक




**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरातील हवेची गुणवत्ता खालावल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) १९२ वर पोहोचला असून, मीरारोडमधील कनकिया आणि इंद्रलोक परिसरात प्रदूषणाचे प्रमाण अधिक असल्याचे सांगण्यात येत आहे. बांधकामांची धूळ, वाहनांचा धूर, मेट्रोची कामे, डेब्रिज आणि मातीची वाहतूक तसेच भराव यांमुळे वायुप्रदूषणात भर पडत असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

उपलब्ध माहितीनुसार, हवेतील पीएम २.५ कणांचे प्रमाण ११४, तर पीएम १० कणांचे प्रमाण १४१ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर नोंदवण्यात आले आहे. मात्र, या आकडेवारीची अधिकृत पडताळणी आणि परिसरनिहाय प्रदूषणाची प्रमाणित माहिती सार्वजनिक होणे आवश्यक आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले इमारत बांधकाम प्रकल्प, रस्ते खोदाई, वाहनांची वर्दळ, वातानुकूलित यंत्रणांचा वापर तसेच लाकूड आणि कचरा जाळण्यासारख्या प्रकारांमुळे प्रदूषण वाढत असल्याचे सांगितले जाते. सुमारे १५० बांधकाम प्रकल्पांना नोटिसा बजावल्याची माहितीही समोर आली आहे.

पीएम २.५ सारखे सूक्ष्म प्रदूषक कण फुफ्फुसांच्या खोल भागापर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे खोकला, घशात खवखव, डोळ्यांची जळजळ आणि श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांची व्याप्ती निश्चित करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### प्रदूषणात आणखी वाढ होण्याची भीती

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांमुळे प्रदूषणात आणखी वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे बांधकामांची धूळ आणि वाहनांच्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यासह फटाक्यांच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी होत आहे. हवेच्या गुणवत्तेची नियमित आकडेवारी सार्वजनिक करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी आणि जागरूक नागरिकांकडून केली जात आहे.

# भिवंडीतील प्रभाग ५ आणि ६ मध्ये पाणीबाणी

## जनआंदोलन छेडण्याचा अशोक जैन यांचा इशारा

**भिवंडी :** भिवंडी महापालिकेच्या प्रभाग समिती क्रमांक ५ आणि ६ मध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना करून नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी मुंबई उच्च न्यायालय समितीचे सदस्य अशोक जैन यांनी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास जनआंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

या दोन्ही प्रभागांमध्ये पाणीटंचाईबरोबरच पथदिवे, स्वच्छता आणि योग्य गटारव्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता, शुक्रवारी, २३ ऑक्टोबर रोजी पहाटे ३ वाजता महापौर नारायण चौधरी, नगरसेवक ॲड. वैभव भोईर, नगरसेविका रोमा आल्शी आणि नगरसेवक बाबा बाउद्दीन यांना नागरिकांच्या उपस्थितीत प्रभागात जावे लागले. यावेळी महापौरांनी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप पटणावर यांच्याकडे पाणीपुरवठ्यासाठी विनंती केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

या पार्श्वभूमीवर, बेकायदेशीर नळजोडण्या करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून पाणीटंचाई दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जैन यांनी केली आहे.

## दापचरी येथे ३०.८८ लाखांचा मद्यसाठा जप्त; एकाला अटक

**पालघर :** दापचरी सीमा तपासणी नाक्यावरील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने २३ ऑक्टोबर रोजी विदेशी मद्याचे ४१ बॉक्स जप्त केले. या कारवाईत वाहनासह एकूण ३० लाख ८८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एकाला अटक करण्यात आली आहे. कासा-सायवन रस्त्यावर वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यात विदेशी मद्याचे ४१ बॉक्स आढळून आले. जप्त केलेल्या मद्याची किंमत ५ लाख ८८ हजार ३०० रुपये असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिकारीच्या उद्देशाने आलेल्या दोघांना शस्त्रांसह अटक

## मुरूड पोलिसांची कारवाई; दोन रायफल, १०४ जिवंत काडतुसे जप्त

**मुरूड-जंजिरा :** मुरूड तालुक्यातील तेलवडे ग्रामपंचायत हद्दीतील टक्का आदिवासी वाडीलगतच्या जंगल परिसरात शिकारीच्या उद्देशाने आलेल्या दोघांना मुरूड पोलिसांनी शस्त्रांसह ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन रायफल, १०४ जिवंत काडतुसे आणि वन्यजीवांची शिकार करण्यासाठी वापरली जाणारी हत्यारे जप्त करण्यात आली आहेत.



या परिसरात काही व्यक्ती शिकारीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. यावेळी पांढऱ्या रंगाची गाडी संशयास्पदरीत्या दिसल्याने तिची तपासणी करण्यात आली.

त्यात एक सिंगल बोअर आणि एक डबल बोअर रायफल, जिवंत काडतुसे तसेच शिकारीची हत्यारे आढळली. या प्रकरणी चेंबूर, मुंबई येथील क्रेसेन्ट लुकस डिमेलो (५९) आणि ग्राफिक क्रेसेन्ट डिमेलो (२३) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आदिवासींच्या हक्कांसाठी मुंबईत संघर्ष मोर्चा

**ठाणे :** आदिवासी आणि वंचितांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी श्रमजीवी संघटनेच्या वतीने मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी मुंबईत 'संविधान हक्क संघर्ष मोर्चा' काढण्यात येणार आहे. या मोर्चात एक लाखाहून अधिक आदिवासी सहभागी होतील, असा दावा संघटनेने केला आहे.

सकाळी ११ वाजता भिवंडीजवळील चवठा हिरवा मैदान येथून मोर्चाला सुरुवात होणार असून, ठाणेमार्गे मंत्रालयापर्यंत पायी कूच करण्यात येणार आहे. ठाणे, पालघर, नाशिक, पुणे आणि रायगड जिल्ह्यांत संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून मोर्चासाठी जनजागृती सुरू आहे. संस्थापक विवेक पंडित, संस्थापिका विद्युल्लता पंडित आणि अध्यक्ष सीता घाटाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या मोर्चाचे नियोजन करण्यात आले आहे.

'हा लढा आदिवासींच्या हक्कांचा आणि मुलांच्या उज्ज्वल भविष्याचा आहे,' असे अध्यक्ष सीता घाटाळ यांनी सांगितले. मोर्चात एकजुटीने सहभागी होण्याचे आवाहन सरचिटणीस विजय जाधव यांनी केले आहे.

# आरएमसी मिक्सरने नवविवाहितेचे दोन्ही पाय चिरडले

**भाईंदर :** काशीगाव दर्गा रोड परिसरात भरधाव रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) मिक्सरच्या धडकेत २३ वर्षीय नवविवाहित तरुणीचे दोन्ही पाय चिरडल्याची घटना शनिवारी सकाळी आठच्या सुमारास घडली. ग्रीन व्हिलेजसमोर झालेल्या या अपघातात तरुणी गंभीर जखमी झाली असून, अपघातानंतर चालक फरार झाल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तरुणी पतीसोबत पायी जात असताना मागून आलेल्या आरएमसी मिक्सरने तिला धडक दिली. जखमी तरुणीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

काशीगाव परिसरातील अवजड वाहनांच्या वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. ११ सप्टेंबर २०२५ रोजी नीलकमल नाक्याजवळ आरएमसी वाहनाच्या धडकेत दहा वर्षीय मुलाचा मृत्यू झाला होता. त्यानंतरही परिस्थितीत ठोस बदल झाला नसल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

नीलकमल नाका ते दर्गा रोडदरम्यान शाळा असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. रस्त्यावरील अतिक्रमणे आणि आरएमसी मिक्सर, टँकर व डंपरची वर्दळ यामुळे अपघातांचा धोका वाढत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.अवजड वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रण, वेगमर्यादेची अंमलबजावणी आणि अतिक्रमणे हटविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# महागाईच्या धुक्यात हरवली दिवाळी!

**ठाणे दर्पण**

✍ अतुल जाधव



'दिवाळी सण मोठा, नाही आनंदाचा तोटा,' असे म्हटले जाते. अज्ञान आणि अंधाराचा नायनाट करून सुख-समृद्धी घेऊन येणारा सण म्हणजे दिवाळी, अशी आपली धारणा आहे. परंतु यंदाच्या दिवाळीने या संकल्पनेलाच जणू खोटे ठरवले आहे. दिवाळीचे स्वागत करताना एकमेकांना शुभेच्छा देतानाही आपण स्वतःचीच फसवणूक करत आहोत, अशी तीव्र भावना यंदा जाणवत आहे. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या दीपावलीचे स्वागत आनंदाचे उसने अवसान आणून करावे लागणार आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे महागाईच्या धुक्यात हरवलेली दिवाळी!




सर्वसामान्यच नव्हे, तर मध्यमवर्गीय माणूसही बाजारात गेल्यानंतर काय खरेदी करावे आणि कशाला मुरड घालावी, याच विवंचनेत सापडल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सणासुदीच्या काळात बाजारपेठा गजबजलेल्या दिसत असल्या, तरी प्रत्येकाच्या मनात खरेदीच्या आनंदापेक्षा आर्थिक बस्तानाची भीती अधिक आहे. वाढत्या महागाईने सामान्य माणसाच्या आनंदावरच विरजण घातले आहे. दिवसाची सुरुवात भ्रष्टाचार, लांडीलबाडी, घोटाळे, खून आणि अत्याचारांच्या बातम्यांनी होत आहे. सर्वत्र कौरवांचे राज्य असल्यासारखी परिस्थिती असताना रामराज्य आणल्याच्या वल्गना केल्या जातात. हीच रामराज्याची संकल्पना आहे का? प्रत्येक क्षेत्रात महिलेला अग्निपरीक्षा द्यावी लागत आहे. आज गृहलक्ष्मी स्वतःला जाळून घेत आहे किंवा तिला जाळले जात आहे. देशातील बेरोजगार तरुणांची संख्या वाढत असून, त्यांच्या वाट्याला आलेले जगणे म्हणजे जणू वनवासच! दोन हातांना काम नाही. वनवासात कंदमुळे खाण्यासाठी उपलब्ध होती; मात्र आज वडापावही पंचवीस रुपयांना झाल्यामुळे तोसुद्धा परवडेनासा झाला आहे.

दुसरीकडे, लाखोंचा पोशिंदा असलेला शेतकरी निसर्गाच्या चक्रात अडकला आहे. पिकवलेल्या भाजीपाल्याला योग्य भाव मिळत नाही, तर पावसानेही ओढ दिली आहे. चार दिवसांचे पोट भरेल की नाही, याचीही शाश्वती नाही. एका बाजूला उपासमारीने त्रस्त असलेला शेतकरी आणि दुसऱ्या बाजूला दुष्काळावरील बैठकीत मंत्र्यांच्या ताटात काजू-बदामांची रेलचेल! हा चंगळवाद मनाला अस्वस्थ करणारा आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा होत असताना त्यांच्या वेदनांची जाणीव सत्ताधाऱ्यांना आहे का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. पुढच्या वर्षी येताना महागाईचे धुके बाजूला सारून, भरपूर पाऊस आणि धनधान्याची समृद्धी घेऊन ये, अशीच यंदाच्या दिवाळीकडून अपेक्षा आहे.

### औद्योगिक शहराचे उद्योगच आज अडचणीत

पूर्वी भ्रष्टाचाराचे आकडे काही हजार किंवा लाखांमध्ये असायचे; आता कोट्यवधी आणि खोक्यांशिवाय बात होत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सत्तेचे अपहरण करून लोकशाहीचे वस्त्रहरण केले जात आहे. एकेकाळी औद्योगिक शहर म्हणून ओळख असलेल्या ठाणे शहरातील उद्योग आज अडचणीत सापडले आहेत. उद्योग अडचणीत आल्याने जमिनी बिल्डरांना विकल्या जात आहेत. जिल्ह्यातील कामगार देशोधडीला लागत असून, कामगारविश्वच संपुष्टात येण्याची वेळ आली आहे. कामगारांच्या हाताला काम देणारे उद्योगच कमी होत असतील, तर त्यांच्या कुटुंबांनी जगायचे कसे? हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

### प्रत्यक्ष भेटीपेक्षा डिजिटल शुभेच्छा तेजीत

दिवाळीनंतर महागाई कमी होणार आहे का? शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार आहेत का? बेरोजगारांच्या हातांना काम मिळणार आहे का? भ्रष्टाचाराला आळा बसणार आहे का? या प्रश्नांची उत्तरे आज तरी नकारार्थीच मिळतात. शुभेच्छा या मनातील संवेदनांचे प्रतिबिंब असतात. त्या हृदयातून उमटत असतात. मात्र, ई-मेल, व्हॉट्सॲप आणि एसएमएसच्या जमान्यात शुभेच्छाही डिजिटल झाल्या आहेत. एका क्लिकवर शेकडो लोकांना शुभेच्छा पाठवता येतात; परंतु प्रत्यक्ष भेटीतून मिळणारा जिव्हाळा यांची सर डिजिटल शुभेच्छांना कधीच येऊ शकत नाही.

### आर्थिक अडचणींमुळे दिवाळीच्या आनंदाला ब्रेक

विसरत चाललेले संस्कार, विस्मृतीत गेलेल्या रूढी-परंपरा आणि हरवत चाललेली संस्कृती यांचे जतन होणे आवश्यक आहे. कारण हेच आपल्या आनंदी जीवनाचे प्राणवायू आहेत. सण-उत्सव केवळ दिवे लावण्यापुरते किंवा गोडधोड खाण्यापुरते मर्यादित नसतात. ते नात्यांमधील प्रेम, आपुलकी, माणुसकी आणि सामाजिक सलोखा जपण्याची संधी असतात. मात्र, आज समाजातील प्रत्येक घटक अस्वस्थ आहे. इच्छा असूनही अनेकांना आर्थिक अडचणींमुळे दिवाळीचा आनंद घेता येत नाही. दिवाळी म्हणजे अंधारावर प्रकाशाचा, निराशेवर आशेचा आणि कटुतेवर प्रेमाचा विजय. परंतु या विजयाचा खरा अर्थ तेव्हाच साध्य होईल, जेव्हा सामान्य माणसाच्या आयुष्यातील अंधार दूर होईल, शेतकऱ्याच्या घरात समृद्धी नांदेल, बेरोजगार तरुणांच्या हातांना काम मिळेल आणि प्रत्येक कुटुंबाला सन्मानाने जगता येईल.

## माय, मला लय मारायलेत, तरास सोसंना, पैशे टाक...

असावा, असा अंदाज आहे. १० हजारांच्या कर्जापोटी ७० हजारांची मागणी केली जात होती. या प्रकरणी फायनान्स चालकासह तिघांवर गुन्हा नोंदवून दोघांना ताब्यात घेतले.

**नातेवाईकांचा पोलिस ठाण्यात ठिय्या**

ही घटना उघडकीस येताच नातेवाईकांनी प्रचंड आक्रोश करत गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी वजिराबाद पोलिस ठाण्यात ठिय्या दिला. खालसा फायनान्सचा संचालक व संबंधित कर्मचारी फरार झाले आहेत. चंद्रकांत शिंदे यांना दोन मुले, दोन मुली आहेत. कौटुंबिक कारणासाठी त्यांनी खासगी फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले होते. मात्र या कर्जानेच त्यांचा बळी घेतला.

**अवैध सावकारांचा खुलेआम धुमाकूळ**

अवाजवी व्याजदर, अपहरण, डांबून ठेवणे, मारहाण यासारखे अनेक गुन्हे खालसा फायनान्सच्या यंत्रणेवर दाखल आहेत. अवैध सावकारांचा खुलेआम धुमाकूळ सुरू असताना त्यावर नियंत्रणाची जबाबदारी असलेला सहकार विभाग आहे कुठे? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**मराठवाड्यात दोन महिन्यांत १५० आत्महत्या**

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात दुष्काळाची झळ सर्वाधिक आहे. पावसाअभावी पिके हातून गेल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. सप्टेंबर-ऑक्टोबर या दोन महिन्यांत १५० हून अधिक शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळल्याचे समोर आले आहे.

**शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले...**

कधी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान तर कधी शेतमालाला भाव नाही. या दुष्टचक्रात शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडत आहे. त्यातूनच कर्जबाजारी झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे बोलले जात आहे.

## राळेगणसिद्धी, हिवरेबाजारचा धडा

गावाने कुऱ्हाडबंदी आणि चराईबंदी लागू केली. म्हणजे झाडे तोडायची नाहीत आणि उघड्यावर जनावर चरायला सोडायची नाहीत. त्यामुळे डोंगरावर गवत आणि झाडे वाढली, माती वाहून जाणे थांबले आणि पाणी जमिनीत मुरू लागले. काही वर्षांत विहिरींना पाणी आले आणि गाव सधन झाले. राळेगणसिद्धी पाणलोट विकासाची देशपातळीवरची शाळा बनली.

**हिवरेबाजार : पाण्याचे अंदाजपत्रक**

हिवरेबाजारने यापुढचे पाऊल टाकले. १९९० च्या दशकात पोपटराव पवार हे सरपंच झाल्यानंतर गावाने पाणलोटाची कामे केलीच, पण त्यासोबतच पाण्याचे अंदाजपत्रक, म्हणजे वॉटर बजेट, सुरू केले. दरवर्षी पावसाळा संपला की गावात किती पाणी साठले, याचा हिशेब मांडला जातो. त्यानुसार ग्रामसभा ठरवते की त्या वर्षी कोणती पिकं, किती क्षेत्रावर घ्यायची.

गावाने सिंचनासाठी नव्या बोअरवेलवर बंदी घातली आणि उसासारख्या जास्त पाण्याच्या पिकांवर मर्यादा आणली. पाणी कमी असलेल्या वर्षी कमी पाण्याची पिके घेतली जातात. त्यामुळे दुष्काळी वर्षांतही गावाला पिण्याच्या पाण्यासाठी टँकर लागले नाहीत, आणि गावातून होणारे स्थलांतर उलटे फिरले. गाव सोडून गेलेली कुटुंबे परत आली.

**पाणी अडवले, हिशेब ठेवला, बंधने घातली...**

या दोन्ही गावांनी कोणतेही परदेशी तंत्रज्ञान वापरलेले नाही. त्यांनी तीनच गोष्टी केल्याः पाणी अडवले, पाण्याचा हिशेब ठेवला आणि त्या हिशेबानुसार स्वतःवर बंधने घातली. जगभरातले यशस्वी प्रयोग शेवटी याच तीन गोष्टींवर उभे आहेत.

प्रश्न असा आहे की दोन गावे जे करू शकली,ते महाराष्ट्रातली हजारो गावे का करू शकली नाहीत? उत्तर नेतृत्वात आणि ग्रामसभेच्या ताकदीत आहे. पाण्याचे निर्णय गावाने एकत्र बसून घेतले आणि ते पाळले, तरच हे शक्य होते. यंदा राळेगणसिद्धीच्याच पारनेर तालुक्यातल्या अनेक गावांत जलस्त्रोत सप्टेंबरमध्येच आटले. शेजारच्या गावात उत्तर असूनही आपण ते का स्वीकारले नाही, हा प्रश्न प्रत्येक गावाने स्वतःला विचारायला हवा.

## हवाई दलाच्या प्रात्यक्षिकांचा थरार

या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. भारतीय हवाई दलाच्या ९४ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय हवाई प्रात्यक्षिकांचा रविवारी अखेरचा दिवस होता.

'सूर्यकिरण' या हवाई कसरत पथकाने अचूक उड्डाणे आणि समन्वयाने केलेल्या विविध कसरती सादर केल्या. तर 'सारंग' हेलिकॉप्टर प्रात्यक्षिक पथकाने आकाशातील चित्तथरारक कसरतींनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

**पंतप्रधानांच्या स्वागतासाठी नागरिकांची गर्दी**

पंतप्रधान मोदी यांच्या उपस्थितीमुळे वाराणसीतील नागरिकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. पंतप्रधानांच्या स्वागतासाठी पोलीस लाइन्सपासून नमो घाटापर्यंतच्या मार्गावर मोठ्या संख्येने नागरिक जमले होते.

## स्थानिकांच्या उत्पादनांना प्राधान्य द्या

तुमच्या खरेदीमुळे त्यांचा उत्साह वाढेल,' असे ते म्हणाले.

**पॅकेजिंगवर दिला जातोय अधिक भर**

'बऱ्याचदा, जेव्हा आपण बाजारात एखादी वस्तू पाहतो, तेव्हा चांगले पॅकेजिंग पाहून आपण ती वस्तू उचलण्यास प्रवृत्त होतो आणि आपल्याला त्या उत्पादनाबद्दल अधिक जाणून घेण्याची इच्छा होते. हे लक्षात घेऊन, आता पॅकेजिंगवर अधिक भर दिला जात आहे,' असे ते म्हणाले.

**पंजाबमध्ये सेंद्रिय शेतीला नवसंजीवनी**

पंतप्रधानांनी पंजाबमधील पारंपरिक शेती पद्धतीच्या पुनरुज्जीवनाबद्दल सांगितले आणि नमूद केले की, 'खेती विरासत मिशन' नावाच्या संस्थेने सेंद्रिय शेतीला नवसंजीवनी देण्यास सुरुवात केली आहे. या संघातील लोकांना पंजाबच्या माळवा प्रदेशात नैसर्गिक कापूस शेतीला प्रोत्साहन द्यायचे होते आणि त्यांनी या उपक्रमाला 'नव-त्रिंजन' असे नाव दिले.

प्रसारणादरम्यान, मोदींनी उत्तराखंडच्या टिहरी गढवाल जिल्ह्यातील लोक हेवल नदीला नवसंजीवनी देण्यासाठी एकत्र आल्याबद्दलही सांगितले.

## आंतरराष्ट्रीय विमानांचे नवी मुंबईतून उड्डाण

हंगामापर्यंत टप्प्याटप्प्याने नियोजित केलेल्या या समन्वित स्थलांतरामुळे, विमान कंपन्यांना विमानतळामधील त्यांचे जुने ऑपरेटिंग स्लॉट राखून ठेवता येतील. तर काही निवडक देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय सेवा नवी मुंबईत हलवल्या जातील, असे विमानतळ ऑपरेटर आणि एअरलाइन्सने जाहीर केले.

एअर इंडिया समूहाने म्हटले आहे की, ते जेद्दा, रियाध, दम्मम, दोहा, मस्कत आणि शारजाहसाठीच्या एअर इंडिया एक्सप्रेस सेवा एनएमआयएकडे टप्प्याटप्प्याने वळवतील आणि आयएटीए उत्तर उन्हाळा २०२७ च्या हंगामापर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित आहे.

विमानतळ ऑपरेटरसोबत सुरू असलेल्या सहकार्यात्मक संवादाचा हा परिणाम आहे आणि भारतीय व आंतरराष्ट्रीय एअरलाइन्ससाठीच्या व्यापक विमानतळ संक्रमण कार्यक्रमाशी सुसंगत आहे. यामुळे सीएसएमआयए टर्मिनल १ च्या दीर्घ प्रतिक्षित पुनर्विकासास मदत होईल, असे त्यात नमूद करण्यात आले आहे. टप्प्याटप्प्याने होणारे हे स्थलांतर मुंबईच्या ड्युअल-एअरपोर्ट प्रणालीच्या विकासाला देखील पाठिंबा देते. तर एअर इंडिया समूहाला बाजाराची कार्यक्षमतेने सेवा देणे सुरू ठेवण्यास आणि सीएसएमआयएवरील त्यांच्या विद्यमान ऑपरेटिंग स्लॉट्सचे जतन करण्यास सक्षम करते, असे म्हटले आहे.

सीएसएमआयए आणि एनएमआयए दोन्ही ठिकाणांहून उड्डाण केल्यामुळे मुंबई महानगर प्रदेशातील कनेक्टिव्हिटी मजबूत होईल, प्रवाशांना अधिक पर्याय आणि सोय उपलब्ध होईल आणि या प्रदेशातील विमान वाहतूक पायाभूत सुविधांच्या सततच्या विकासाला हातभार लागेल, असे निवेदनात म्हटले आहे.

अदानी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेडने

पान १ वरून

एनएमआयएमधून ऑपरेशन्स सुरू करण्याच्या एअर इंडिया समूहाच्या योजनांचे स्वागत केले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या प्रदेशाच्या भविष्यातील विमान वाहतूक वाढीस समर्थन देण्यासाठी आणि अखंड प्रवासाचा अनुभव देण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान, मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी आणि स्केलेबल इन्फ्रास्ट्रक्चरसह विकसित केले जात आहे, असे म्हटले आहे.

नवीन विमानतळावर आंतरराष्ट्रीय ट्रान्सफर सुलभ करण्यासाठी इंडिगो देशांतर्गत कनेक्टिव्हिटीदेखील इथे आणेल. एअरलाईन आणि अदानी एअरपोर्ट्स ऑपरेशनल प्लॅनिंगच्या अंतिम टप्प्यात आहेत. यामध्ये अंतिम संक्रमण तारखा प्रकल्प समन्वय आणि ऑपरेटिंग मंजुरीच्या अधीन आहेत.

**इंडिगोची १२ दैनिक उड्डाणे एनएमआयएवरून**

मुंबईतील दोन्ही विमानतळांचे संचालन करणाऱ्या अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड आणि एअरलाइन्स यांच्यात १८ महिने चाललेल्या चर्चांनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे विमानतळावरील क्षमतेचा ताण कमी होण्यास मदत होईल आणि वाढत्या हवाई वाहतुकीचे व्यवस्थापन करणे सोपे होईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## माजी सरन्यायाधीश चंद्रचूड सरकारपुढे जास्तच नम्र राहिले

संजय किशन कौल यांनी केला.

'द वायर'साठी पत्रकार करण थापर यांना दिलेल्या मुलाखतीत न्यायमूर्ती कौल यांनी हा खुलासा केला. त्यांनी त्यांच्या आगामी 'विदाऊट फिअर ऑर फेव्हर' या पुस्तकात वर्णन केलेल्या एका घटनेचा उल्लेख केला. त्यानुसार, कॉलेजियमच्या एका बैठकीदरम्यान न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी त्यांना बाजूला घेऊन विचारले होते की, प्रस्तावित नियुक्त्यांच्या नावांवर सरकारचे मत जाणून घेण्यासाठी फोन करायला हवा का? मात्र, न्यायमूर्ती कौल यांनी याकडे सरकारकडून मंजुरी मिळवण्याची, किंवा 'पूर्व-मंजुरी' घेण्याची प्रक्रिया म्हणून पाहिले आणि आपला विरोध दर्शवला. सरकारशी सल्लामसलत करणे चुकीचे नाही, परंतु कॉलेजियमकडून नावांवर औपचारिक विचारविनिमय होण्यापूर्वी असे करणे योग्य नाही, असे कौल यांनी माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांना सांगितले.

**न्यायिक स्वातंत्र्याचे रक्षण करणे महत्त्वाचे**

न्या. कौल यांनी सांगितले की, न्यायिक स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी कॉलेजियमने सरकारच्या दबावाला विरोध केला पाहिजे. न्यायाचा उद्देश साध्य करण्यासाठी एक न्यायिक बाजू आहे आणि एक प्रशासकीय बाजू आहे. मी न्यायिक बाजूची चिंता करणार नाही. माझा विश्वास आहे की त्यांच्याकडे (माजी सरन्यायाधीश चंद्रचूड) ते पुढे नेण्यासाठी आवश्यक असलेली बौद्धिक खोली, क्षमता आणि कठोर परिश्रम हे सर्व होते'. न्या. कौल म्हणाले की, सरकारशी व्यवहार करताना, विशेषतः न्यायिक नेमणुकांच्या बाबतीत, 'आपण अधिक ठाम असायला हवे होते, आणि हेच माझे मत होते.

## 'एसआयआर'साठी वापरलेल्या सॉफ्टवेअरची माहिती देणे अशक्य

करण्यासाठी संबंधित मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी 'ईआरओ' हे वैधानिक प्राधिकरण जबाबदार आहेत, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

तेलंगणातील करीमनगर येथील सामाजिक कार्यकर्ते एम. ए. मुजीब अय्युब यांनी दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जाला निवडणूक आयोगाने हे उत्तर दिले.

अय्युब यांनी मतदार माहितीमधील त्रुटी किंवा विसंगती शोधण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअर, ॲप्लिकेशन किंवा एआय प्लॅटफॉर्मचे नाव आणि आवृत्ती; अशी प्रणाली पडताळणी, दुरुस्ती किंवा हटवण्यासाठी नोंदींना आपोआप चिन्हांकित करते का, आणि त्यानंतरची कार्यप्रवाह; कोणत्याही टप्प्यावर एआय, मशीन लर्निंग, प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्स किंवा स्वयंचलित निर्णय समर्थन साधनांचा वापर केला गेला का; खोटे सकारात्मक निष्कर्ष आणि खऱ्या मतदारांना चुकीच्या पद्धतीने चिन्हांकित करण्यापासून बचाव करण्यासाठीच्या उपाययोजना आणि मतदाराच्या नोंदीवर कारवाई करण्यापूर्वी चिन्हांकित केलेल्या विसंगतींचे पुनरावलोकन किंवा मंजुरी देणारे प्राधिकरण, याबद्दल माहिती मागितली.

अय्युब यांच्या पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात, निवडणूक आयोगाने माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८(१)(डी) चा आधार घेतला, जे व्यावसायिक गोपनीयता, व्यापार गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांच्याशी संबंधित माहितीला सूट देते, ज्याच्या प्रकटीकरणामुळे तिसऱ्या पक्षाच्या स्पर्धात्मक स्थितीला हानी पोहोचेल.

स्वयंचलितपणे चिन्हांकित करणे, एआय किंवा एमएलचा वापर, आणि चुकीच्या पद्धतीने चिन्हांकित करण्यापासून बचाव करण्याच्या उपाययोजना यासंबंधीच्या प्रश्नांवर, आयोगाने सांगितले की मागितलेली माहिती ही एक 'स्पष्टीकरण' आहे, जी कायद्याच्या कलम २(एफ) अंतर्गत 'माहिती' या व्याख्येत येत नाही.

आयोगाने पुढे सांगितले की, लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५० च्या कलम १३बी(१) आणि १३बी(२) नुसार, संबंधित विधानसभा मतदारसंघाचे ईआरओ हे मतदार यादी तयार करण्यासाठी आणि सुधारण्यासाठी जबाबदार असलेले वैधानिक प्राधिकरण आहेत.

**सक्षम अधिकाऱ्याकडे अपील करावे**

आरटीआयमधील खुलाशांवर प्रतिक्रिया देताना, माजी मुख्य निवडणूक आयुक्त ओ. पी. रावत म्हणाले की, संबंधित कार्यकर्त्याने अपील दाखल केले पाहिजे. 'ही एक कायदेशीर बाब आहे आणि निवडणूक आयोग ज्या प्रश्नांची उत्तरे टाळत आहे, त्यांची उत्तरे मिळवण्यासाठी अर्जदाराने सक्षम अधिकाऱ्यांकडे अपील दाखल केले पाहिजे,' असे रावत म्हणाले.

## 'नैना'त १५ लाख रोजगार निर्मिती

संपूर्ण परिसराच्या आर्थिक विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. विमानतळाच्या प्रभाव क्षेत्राचा नियोजनबद्ध आणि कालबद्ध विकास करण्यासाठी एकात्मिक विकास आराखडा तयार करून नगररचना योजनांच्या माध्यमातून या परिसराचा सर्वसमावेशक विकास करण्यात येत आहे. या नियोजनबद्ध विकासातून रोजगार निर्मितीला अधिक प्रमाणात चालना देण्यात येत असल्याचे ते म्हणाले. भूधारकांच्या हातात जमिनीशी संबंधित कागदपत्रे दिल्यानंतरच विकासकामांचे भूमिपूजन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार गावनिहाय मोजणी, भूखंडांची ओळख, मालकी नोंदी आणि आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया पुढे नेण्यात येत आहे. भूधारकांचे प्रश्न सुटेपर्यंत राज्य सरकार त्यांच्या पाठीशी राहील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

नैना क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला सक्षम कनेक्टिव्हिटी आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या माध्यमातून स्थानिकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, नैना परिसरातील विकासकामे ही पनवेल, उरण, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे.

## प्रकल्प पर्यावरणपूरकच

तसेच, प्रकल्पाशी संबंधित क्षेत्रात टोरेंट कंपनीकडून ६० हजार तर वन विभागाकडून ३० हजार झाडे लावण्याचे नियोजन आहे. अशा प्रकारे एकूण ९० हजार झाडे लावली जाणार असल्याचा दावा सरकारने केला आहे.

## राष्ट्रवादीला अर्थखाते?

भुजबळ यांनी धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ आणि जय पवार यांच्यासह प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसला परत देण्यास बराच कालावधी उलटला असून, आता ते लवकरात लवकर राष्ट्रवादीकडे सोपवावे, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्याचे त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थखाते देण्याबाबत कोणताही वाद नसल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, राज्यातील सध्याची परिस्थिती, दुष्काळी प्रश्न आणि निधीची उपलब्धता यांचा विचार करून निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितल्याचे भुजबळ यांनी नमूद केले.

**राज्याच्या आर्थिक गरजांचा विचार करून निर्णय**

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणावर निधीची व्यवस्था करावी लागणार आहे. कर्जमाफीसंदर्भात सुरू असलेल्या उपाययोजना तसेच पाच हजार रुपयांच्या आगाऊ मदत हप्त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आव्हान सरकारसमोर आहे. त्यामुळे अर्थखाते हस्तांतरित करण्याची वेळ राज्याच्या आर्थिक गरजांचा विचार करून निश्चित केली जाईल, असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील रिक्त मंत्रिपदाबाबत बोलताना भुजबळ म्हणाले की, मंत्रिमंडळ विस्ताराचा निर्णय महायुतीतील घटक पक्ष सामूहिकपणे घेतील. भाजपमधील रिक्त पदांचाही त्यात विचार केला जाईल. मंत्रिमंडळ विस्ताराची वेळ निश्चित करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांकडे असल्याचे त्यांनी सांगितले.

**अमित शहा यांचीही सकारात्मक भूमिका**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विषयावर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मुख्यमंत्री फडणवीस यांना दिल्याचेही भुजबळ यांनी सांगितले. दरम्यान, सुनेत्रा पवार आणि त्यांचे पुत्र पार्थ पवार यांनी काही दिवसांपूर्वी दिल्लीत अमित शहा यांची भेट घेतली होती. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागण्या आणि महायुतीतील राजकीय समीकरणांबाबत चर्चांना उधाण आले होते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत किंवा चार-पाच मंत्र्यांमध्ये बदल करण्याबाबत कोणतीही चर्चा झालेली नसल्याचे भुजबळ यांनी स्पष्ट केले. या वृत्तांमध्ये तथ्य नसल्याचे सांगत त्यांनी या चर्चांचे खंडन केले.

**भेटीतील प्रमुख तपशील**

- राष्ट्रवादी काँग्रेसची अर्थखाते पक्षाकडे परत देण्याची मागणी
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मागणीला सकारात्मक प्रतिसाद
- दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधीची तरतूद हे निर्णयातील महत्त्वाचे कारण
- हिवाळी अधिवेशनापूर्वी खाते मिळण्याची राष्ट्रवादीला अपेक्षा
- खाते हस्तांतरणाची निश्चित तारीख अद्याप जाहीर नाही
- राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चांचे छगन भुजबळ यांच्याकडून खंडन

## राहुल यांचा १ नोव्हेंबरला 'चलो दिल्ली'चा नारा

आहे.

'आमची मते चोरली जात आहेत आणि हे आम्ही कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही,' असा इशारा राहुल गांधी यांनी दिला आहे. राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये प्रश्न उपस्थित करणाऱ्यांवर लाठीमार करण्यात आल्याचा आरोप केला. लोकशाहीत नागरिकांना प्रश्न विचारण्याचा अधिकार असून, त्यांच्या मतांचा आणि आवाजाचा आदर केला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. मतांची कथित चोरी आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या मुद्द्यावर विरोधकांनी एकत्र येऊन आवाज उठवण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

हरियाणा काँग्रेसचे प्रभारी संजय दत्त आणि प्रदेशाध्यक्ष राव नरेंद्र सिंह यांनी रामलीला मैदानावरील सभेला १० लाखांहून अधिक लोक उपस्थित राहतील, असा दावा केला आहे. या सभेच्या माध्यमातून विरोधकांकडून निवडणूक प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांचा मुद्दा देशभरात उपस्थित केला जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्री (सीटीआय) या व्यापारी संघटनेने राहुल गांधी यांना इंडिया ब्लॉकची रॅली पुढे ढकलण्याचे आवाहन केले आहे.

## राशिभविष्य


**मेष** – रोजची दैनंदिन कामे लवकर पूर्ण होतील आरोग्य उत्तम राहील उत्साह व उमेद वाढल्यामुळे आपल्या महत्वाच्या कामांना वेळ देऊ शकाल.


**वृषभ** – नोकरीमध्ये हाताखालील लोकांची तसेच वरिष्ठांचे सहकार्य अपेक्षेप्रमाणे मिळेल केलेल्या नियोजनात काही बदल करावे लागतील वरिष्ठांचे म्हणणे ऐकावे लागेल.


**मिथुन** – कुटुंब परिवारातील विवाहयोग्य तरुण-तरुणींचे विवाह मधील अडथळे दूर होतील तसेच संततीचे असलेले प्रश्न मार्गी लागतील आप्तेष्ट व नातेवाईकांचे सहकार्य मिळेल.


**कर्क** – नियोजनाद्वारे हाती घेतलेल्या कामात सुयश लाभेल परंतु त्यासाठी कार्यमग्न राहणे आवश्यक ठरेल तसेच कोणाबरोबरही वाद-विवाद करू नयेत मतभेदांची शक्यता.


**सिंह** – जिद्द व चिकाटीने आपल्या समोरील कामे पूर्ण कराल नोकरीमध्ये तसेच व्यवसायात नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील.


**कन्या** – कौटुंबिक जीवनात सुसंवाद व समन्वयाने कार्य साधारण व्यवसाय धंद्यातील जुनी येणी वसूल झालेल्या कारणांनी आर्थिक परिस्थिती सुधारेल नवीन उधारी करू नका.


**तुळ** – आत्मविश्वास व मनोबल वाढविणारी एखादी घटना घडेल आरोग्य उत्तम राहून कुटुंब परिवारात एखादी महत्त्वाची सकारात्मक वार्ता मिळेल. नोकरीमध्ये सर्वसामान्य परिस्थिती राहील.


**वृश्चिक** – महत्त्वाचे पत्रव्यवहार पार पडतील. काही कारणास्तव जवळचा तसाच दुरचा प्रवास घडेल प्रवासात वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक राहील तसेच महत्त्वाची कागदपत्रे जपा.


**धनु** – एखादा अप्रिय निर्णय स्वीकारावा लागल्या मुळे मनोबल कमी होईल परंतु नाराज होण्याची गरज नाही काहींचा मनोरंजनाकडे कल राहील. एखादे नवीन नियोजन करू शकाल.


**मकर** – नोकरीमध्ये अथवा व्यवसाय-धंद्यात अनुकूल वातावरण राहील मात्र आपल्या बोलणे, वागण्यावर वरती नियंत्रण आवश्यक आहे. खर्चाच्या प्रमाणात वाढ होईल.


**कुंभ** – स्वतःच्या कार्यक्षेत्रात उत्तम स्थिती राहून आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळेल. निरनिराळ्या नवीन संधींचा लाभ होईल.


**मीन** – कौटुंबिक सुख लाभून जोडीदाराचा सल्ला उपयुक्त ठरेल. कुटुंब परिवारातील तरुण-तरुणींचे प्रश्न संपुष्टात येतील. विद्यार्थ्यांना अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करणे हितकारक ठरेल.

## दिनविशेष

१९९९: राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील (NCL) संशोधक व्ही. व्ही. रानडे यांना केंद्र सरकारतर्फे स्वर्णजयंती फेलोशिप जाहीर.

१९९४: जॉर्डन आणि इस्त्राएल यांनी शांतता करारावर सह्या केल्या.

१९६२: रायगडाला जेव्हा जाग येते या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबई येथील भारतीय विद्याभवन येथे झाला.

१९५८: पॅन अमेरिकन एअरवेज ची पहिले व्यावसायिक विमानसेवा सुरु झाली.

१९४७: जम्मू आणि काश्मीरचे राज्य भारतात विलीन झाले.

१९३६: हूवर धरणांवरील पहिले इलेक्ट्रिक जनरेटर पूर्णपणे सुरु झाले.

१९०५: नॉर्वे स्वीडनपासुन स्वतंत्र झाला.

## पंचांग

**पंचांगकर्ते – ज्योतिष भूषण डॉ. सविता महाडीक, पुणे – ९९२२२६३३९४**

**२६ ऑक्टोबर २०२६**

**पंचांग**
तिथी पौर्णिमा 09:42 AM
नक्षत्र अश्विनी 05:41 PM
करण : भाव 09:42 AM
बालव 09:42 AM
पक्ष शुक्ल
योग वज्र 02:16 PM
दिवस सोमवार

**सूर्य आणि चंद्र गणना**
सूर्योदय 06:36 AM
चंद्रोदय 06:07 PM

चंद्र राशी मेष
सूर्यास्त 06:08 PM
चंद्रास्त चंद्रोस्त नहीं
ऋतु हेमंत

**हिंदू महिना व वर्ष**
शके संवत 1948 पराभव
कली संवत 5128
दिवसाची कालावधी 11:32 AM
विक्रम संवत 2083
अमान्त महिना आश्विन
पूर्णिमान्त महिना आश्विन

## वाढदिवस


प्रज्ञा राणे


मनोहर चौधरी


योगेश सुभाष लाठी


रवीना टंडन
अभिनेत्री


सुजैन खान
अभिनेत्री


प्रिती जैन

**Happy Birthday with 'नवशक्ति'**

आपल्या प्रियजनांना वाढदिवसाच्या शुभेच्छा द्या अगदी मोफत. navshakti.news@gmail.com या ई-मेलवर अथवा ९८६९२६२५४० या व्हॉट्स ॲप नंबरवर वाढदिवसाच्या एक दिवस अगोदर माहिती युनिकोडमध्ये फोटोसह पाठवा.

## शब्दवेध (६७६३)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | भो | व | ती | ■ | स | ■ | पु | ■ | प |
| म | ■ | च | ■ | स | मो | रा | स | मो | र |
| ज | ■ | क | सा | क | सा | ■ | ट | ■ | स्प |
| दा | म | ■ | ■ | ल | ■ | टो | ■ | हे | र |
| र | ग | ■ | नि | ■ | बो | ल | बा | ला | ■ |
| ■ | र | वि | वा | स | र | ■ | हे | ■ | पि |
| ■ | म | ल | ■ | र्व | ■ | सु | र | वा | त |
| ह | स्त | ग | त | ■ | नो | ट | ■ | टा | ळ |
| ल्ली | ■ | ■ | ट | र | क | णे | ■ | ड्या | ■ |

## शब्दवेध (६७६४)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | | ■ | 4 | 5 | 6 | |
| | ■ | 7 | | ■ | 8 | | | | ■ |
| | ■ | | ■ | 9 | | | ■ | 10 | 11 |
| | ■ | 12 | | | | ■ | 13 | | |
| 14 | 15 | ■ | ■ | 16 | | 17 | | ■ | |
| ■ | 18 | 19 | | ■ | ■ | | ■ | 20 | |
| 21 | | | ■ | 22 | 23 | | 24 | | ■ |
| 25 | | ■ | 26 | ■ | | ■ | | ■ | 27 |
| | ■ | 28 | | | | ■ | 29 | | |

**आडवे शब्द** :- १) ऐटबाज, ४)फेरबदल, ७)नैसर्गिक बर्फ, ८)वेचक,९) नाविक, १०) टिंगल, १२) हद्दपार, १३) निरर्थक, १४) गुंडीचे घर, १६) सुकोमल, १८) पूर्वचिन्ह, २०) मिश्रण, २१) काल ; वेळ, २२) अनुचित; असभ्य; असमान, २५) आयुर्मान, २८) आकर्षक,२९) प्रत्येक.

**उभे शब्द**:- १) वैद्यकीय मोटारगाडी; ॲम्ब्युलन्स, २) वाळीत टाकलेला, ३) किंमत; दोरी, ४) कपर्दिका, ५) कोडकौतुक, ६) दारावर केलेला आवाज, ८) प्रतिबंधक, ९) नापसंत; अनुत्तीर्ण, ११) खिन्न, १३) विजेचा दाब; वजन, १५) सर्वत्र पाणीच पाणी, १७) सालिना, १९) झीज, २०) चकणा, २१) फुरसत, २३) निषेध, २४) धडाडी; आवेश, २६) चांगला, २७) कुबड.

**(उत्तर: पुढील अंकात)**

# नव शक्ति

सुख व्यक्तीचा अहंकार आणि दु:ख धैर्याची परीक्षा घेते

## सीमेवर स्पष्टता हवी

चीन आणि भारत यांच्यातील संघर्ष केवळ सीमावादापुरता मर्यादित नाही. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर लष्करी हालचाली, सीमावर्ती भागातील पायाभूत सुविधांची उभारणी, अरुणाचल प्रदेशावरील दावा, पाकिस्तानला दिलेले सामरिक बळ आणि हिंद महासागरातील वाढता प्रभाव अशा अनेक मार्गांनी या दोन्ही देशांमधील तणाव अधूनमधून उफाळून येत असतो. या पार्श्वभूमीवर गेल्या चार महिन्यांपासून अरुणाचल प्रदेशात भारतीय आणि चिनी जवान आमनेसामने येण्याच्या घटना सुरू असून काही कुरबुरी अद्याप सुरू असल्याचा इंडो-तिबेट सीमा दलाचे महासंचालक शत्रुजीत सिंह कपूर यांचा गौप्यस्फोट भारताची चिंता वाढवणारा आहे. अरुणाचलमध्ये नेमके काय घडते आहे आणि सरकार जनतेला कितपत माहिती देण्यास तयार आहे, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. उपलब्ध वृत्तांनुसार, जुलैच्या उत्तरार्धात अप्पर सुबनसिरी जिल्ह्यातील ताक्सिंग परिसरात नियमित गस्तीवेळी दोन्ही बाजूंचे जवान समोरासमोर आले. याच भागात चिनी जवानांनी भारताच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या भारतीय बाजूला असलेल्या उंच जागी तंबू ठोकल्याचे म्हटले आहे. परराष्ट्र मंत्रालयानेही चिनी सैन्याने प्रस्थापित गस्त बदलल्यास नियंत्रण रेषेवरील परिस्थिती वेळोवेळी बिघडत असल्याचे नमूद करत संवाद यंत्रणा सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र ताक्सिंगमध्ये नेमके कोणते मतभेद आहेत, किती ठिकाणी तणाव आहे, गस्त आणि तैनातीची स्थिती काय आहे, याविषयी स्पष्ट माहिती अद्याप मर्यादितच आहे. सीमेवरील शांततेचा दावा त्या टापूतील वस्तुस्थितीने पटला पाहिजे. या सगळ्या तणावाचे मूळ आजच्या गस्तीपुरते मर्यादित नाही. ब्रिटिश काळातील सीमारेषांबाबत भारत आणि चीनच्या गोंधळामुळे पश्चिमेकडील लडाखपासून पूर्वेकडील अरुणाचलपर्यंत सीमावाद कायम टिकून आहे. १९६२च्या युद्धात हाच अरुणाचल हा महत्त्वाचा रणप्रदेश ठरला होता. मुख्य म्हणजे युद्धविरामानंतरही पूर्वेकडील प्रश्न सुटला नाही. १९८८मध्ये राजीव गांधी यांच्या बीजिंग भेटीनंतर सीमावाद बाजूला ठेवून संबंध पुढे नेण्याचे प्रयत्न झाले. १९९३च्या कराराने नियंत्रण रेषेलगत शांतता राखण्याची चौकट दिली तर २०१३च्या सीमा संरक्षण सहकार्य कराराने संवाद आणि घटनांचे व्यवस्थापन अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र नियंत्रण रेषेचे परस्पर मान्य संयुक्त सीमांकन झालेले नसल्याने एकाच डोंगररांगेला दोन देश वेगवेगळ्या नकाशातून पाहतात. २०१७ चा डोकलाम तणाव आणि जून २०२० मध्ये गलवानमध्ये प्राणघातक संघर्ष झाल्यानंतर सीमावरील विश्वासाला मोठा धक्का बसला. २०२४ मध्ये पूर्व लडाखमधील देपसांग आणि देमचोक येथे गस्तीची व्यवस्था पुन्हा सुरू करण्यासाठी करार झाला आणि विसंवाद कमी करण्याच्या उच्चस्तरीय प्रयत्नांना चालना मिळाली. तो विशिष्ट भागांपुरता होता. मात्र संबंध सुधारण्याची भाषा आणि सीमेवरील स्पर्धा एकाच वेळी चालतात. चीन अरुणाचल प्रदेशातील मोठ्या भूभागावर दावा करतो आणि त्याला 'झांगनान' म्हणजेच दक्षिण तिबेट म्हणतो. हा दावा नाकारत अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य भाग असल्याचे भारताचे ठाम अधिकृत म्हणणे आहे. चीनकडून ठिकाणांना नवी नावे देणे किंवा नकाशांवर दावा अधोरेखित करण्याने सार्वभौमत्व बदलत नसले तरी दावा नियमितपणे जिवंत ठेवण्याचा वातावरणावर विपरीत परिणाम होतो. सीमावर्ती पायाभूत सुविधा उभारणेही सैन्याची हालचाल, पुरवठा आणि उपस्थितीला बळ देत असल्याने भारताने चीनच्या अशा कृतींकडे दुर्लक्ष करू नये. चीनशी व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि जागतिक राजकारणातील परस्परावलंबित्व भारताच्या निर्णयांना प्रभावित करू शकते; ते दुर्लक्षण्याजोगे नाही. तणावाची माहिती उशिरा का दिली, नेमक्या घटनांबद्दल अधिकृत स्पष्टीकरण का अपुरे आहे आणि गस्तीच्या ठिकाणांवरील भारतीय उपस्थितीची खात्री कशी केली जात आहे, हे प्रश्न मात्र रास्त आहेत. संसद आणि नागरिकांना प्रत्येक लष्करी तपशील सांगणे शक्य नसते; पण गोपनीयतेचा पडदा वस्तुस्थिती झाकण्यासाठी वापरला जाऊ नये. उत्तर युद्धखोरीत नाही तसेच ते एकतर्फी संयमातही नाही. भारताने सीमावर्ती रस्ते, पूल, बोगदे आणि रसद मजबूत करावी. लष्कर-आयटीबीपी समन्वय, गुप्तचर माहिती, उपग्रह निरीक्षण, ड्रोन तसेच प्रतिड्रोन क्षमता आणि प्रतिकूल हवामानातील तयारी वाढवणे अपेक्षित आहे. जवानांना योग्य उपकरणे, प्रशिक्षण आणि तातडीच्या प्रतिसादाची साधने मिळाली पाहिजेत. चीनशी लष्करी तसेच राजनैतिक संवाद चालू ठेवतानाच, गस्तीतील बदल आणि तणावाच्या घटनांबाबत नियमित, मोजकी पण विश्वासार्ह माहिती देण्याची पद्धत सरकारने ठरवावी. व्यापार आणि गुंतवणुकीचे निर्णयही राष्ट्रीय सुरक्षेच्या कसोटीवर तपासले गेले पाहिजेत. सीमावर्ती नागरिकांचा विश्वास, प्रशासनाची उपस्थिती आणि विकास हीच भारताच्या उपस्थितीची खरी पायाभरणी आहे. अरुणाचलमध्ये नेमके काय घडते आहे आणि दिल्लीचे उत्तर किती स्पष्ट आहे हे महत्त्वाचे आहे. सीमासुरक्षा ही जवानांच्या धैर्याची परीक्षा आहे तसेच ती देशाच्या धोरणात्मक स्पष्टतेचीही कसोटी आहे.

**अरुणाचलमध्ये नेमके काय घडते आहे आणि दिल्लीचे उत्तर किती स्पष्ट आहे हे महत्त्वाचे आहे. सीमासुरक्षा ही जवानांच्या धैर्याची परीक्षा आहे तसेच ती देशाच्या धोरणात्मक स्पष्टतेचीही कसोटी आहे.**

### मनन चिंतन

ह.भ.प. देवदत्त परुळेकर



## बाह्य झळाळी आणि अंतर्गत सत्य

**तुकाराम महाराज म्हणतात–**

**वरदळ तें नुतरे कसीं। आगीमध्यें तेंथें रसीं॥**

या अभंगात तुकाराम महाराजांनी हिणकस पदार्थाचे रूपक वापरले आहे. एखाद्या पदार्थातील हिणकसपणा केवळ त्याला अग्नीची झळ दिल्याने नाहीसा होत नाही; तो त्याच्या रसातही टिकून राहतो, असा या रूपकाचा आशय आहे. म्हणजेच, बाहेरून प्रक्रिया केली म्हणून आतला दोष नष्ट झाला, असे समजता येत नाही. माणसाच्या स्वभावाला हे रूपक लागू केले, तर त्याचा अर्थ अधिक स्पष्ट होतो. एखादी व्यक्ती वरवर गोड बोलू लागली, धार्मिक विधी करू लागली किंवा सज्जन असल्याचे दाखवू लागली, तरी तिच्या मनातील अहंकार, मत्सर, कपट किंवा स्वार्थ कायम असेल, तर ते तिच्या वागण्यातून कधीतरी प्रकट होतात. बाह्य आचारांनी मनातील दोष आपोआप दूर होत नाहीत. त्यासाठी अंतर्मनातील वृत्तीत बदल घडवावा लागतो. याचे एक उदाहरण अमेरिकन लेखक जेम्स फ्रे यांच्या जीवनातील घटनेतून पाहता येते. त्यांच्या A Million Little Pieces या पुस्तकाला मोठी लोकप्रियता मिळाली. व्यसनाधीनतेतून बाहेर पडण्याची सत्यकथा म्हणून ते वाचकांसमोर आले; मात्र २००६ मध्ये तपासणीत पुस्तकातील काही घटना अतिशयोक्तीने मांडल्याचे आणि काही प्रसंग बनवलेले असल्याचे उघड झाले. फ्रे यांनीही पुस्तकातील काही भाग बदललेले असल्याचे मान्य केले. या घटनेचा अभंगाशी नेमका संबंध असा आहे की, पुस्तकाची मांडणी प्रभावी होती आणि त्याला सत्यकथेची प्रतिष्ठाही मिळाली होती; पण त्या बाह्य रूपामुळे मजकुरातील असत्य नाहीसे झाले नाही. जसे अग्नीची प्रक्रिया करूनही हिणकस पदार्थातील दोष टिकून राहतो, तसेच आकर्षक मांडणीने असत्याचे सत्यात रूपांतर होत नाही. आपल्या आयुष्यातही आपण कधी कधी प्रतिमा टिकवण्यासाठी सत्य लपवतो. चूक झाली तरी ती मान्य करण्याऐवजी कारणे सांगतो. लोकांनी आपल्याला चांगले समजावे म्हणून बाह्य वर्तन बदलतो; पण स्वतःच्या वृत्तीतील दोषांकडे दुर्लक्ष करतो. मात्र या अभंगाचा अर्थ माणसाचा स्वभाव बदलू शकत नाही, असा नाही. स्वतःतील दोष ओळखून त्यावर प्रामाणिकपणे काम केले, तर परिवर्तन घडू शकते. अहंकाराच्या जागी नम्रता, स्वार्थाच्या जागी सहवेदना आणि कपटाच्या जागी सत्यनिष्ठा आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. केवळ बाह्य आवरण बदलून हे साध्य होत नाही. बदलाकरिता अंतर्मनातील दोषांच्या मुळाशी जावे लागते.



### सह्याद्रीचे वारे



अरविंद भानुशाली

## रोहित पवार, मफलरवाले गेले कुठे ?

**महाराष्ट्रात आता मित्रपक्षांमध्येच चढाओढ लागली आहे. सत्तेत राहायचे, सत्तेचा उपभोग घ्यायचा आणि त्याच सत्तेवर टीका करायची, असा प्रयत्न मित्रपक्षांकडून केला जात असल्याचे दिसते. याचे जनक आमदार रोहित पवार आहेत, असा आरोप केला जातो.**

राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यू होऊन नऊ महिने उलटून गेले. बारामती विमानतळावर विमान कोसळून हा अपघात झाला होता. परंतु, या अपघाताचे अनेकांनी राजकारण केले. हा अपघात नव्हता, तर अजितदादांना मारण्यासाठी कटकारस्थान रचण्यात आले होते, असा आरोप अजित पवार यांचे चुलतभाऊ आणि आमदार रोहित पवार हे सतत करत होते.

आता तर त्यांनी एक मफलरवाला शोधून काढला होता. त्याबाबत ते ११ ऑक्टोबरला पत्रकार परिषद घेऊन त्या मफलरवाल्याचे नाव आणि कटकारस्थान जाहीर करणार होते. परंतु, ११ ऑक्टोबर उलटून १५ दिवस झाले, तरी तो मफलरवाला पुढे आला नाही. याबाबत रोहित पवार हे सतत लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करत होते. या मफलरवाल्याचे आणि विमान कंपनीच्या अधिकाऱ्यांचे साटेलोटे होते, असे रोहित पवार म्हणत होते.

हा मफलरवाला केंद्रात नाही, तर दुसऱ्या दिवशी हा मफलरवाला महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातही नाही, असा खुलासा रोहित पवार यांनी केला होता. मात्र, आता या प्रकरणाला पूर्णविराम मिळाल्याचे दिसून येते. रोहित पवार हे प्रसिद्धीच्या माध्यमातून पुढे येत आहेत. कुस्ती, मोर्चा असो, निदर्शने असोत अथवा रास्ता रोको असो, तेथे दुसऱ्याच मिनिटाला रोहित पवार हजर झालेले दिसतात. महाराष्ट्रातील विरोधी पक्षांचा सर्व भार सध्या रोहित पवार यांच्यावर असल्याचे दिसते. ते सर्वसाधारणपणे राहुल गांधी यांची नक्कल करू लागले आहेत.

अजितदादांच्या मृत्यूनंतर रोहित पवार यांनी अनेक वेळा संशय व्यक्त केला. केंद्र सरकारच्या विमान वाहतूक यंत्रणेने या अपघाताची दखल घेऊन चौकशी केली, तर महाराष्ट्र सरकारच्या सीआयडीनेही चौकशी करून हा अपघात असल्याचा अहवाल दिला आहे. परंतु, हे मान्य करण्यास रोहित पवार तयार नाहीत. या विमान अपघाताबरोबरच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा आणि विद्यार्थ्यांचे मोर्चे या विषयांवरही ते सक्रिय आहेत. विद्यार्थी आंदोलन काँग्रेसने करू द्या अथवा भाजपने करू द्या, तेथे रोहित पवार प्रथम हजर असतात.

एमपीएससीच्या अध्यक्षांना रजेवर पाठवून तेथे तात्पुरता नवीन अध्यक्ष नेमण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नाबाबत रोहित पवार यांची हवाच काढून घेतली. सध्या ते राहुल गांधी यांच्याप्रमाणे स्टंट करू लागले आहेत. मी फार मोठा अभ्यासक आहे, हे दाखवून देण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे दिसून येत आहे. अजितदादांच्या मृत्यूनंतर ते सतत या प्रकरणावर भाष्य करत आहेत. प्रत्यक्षात एकही पुरावा पुढे आला नव्हता. मफलरवाल्याच्या नावाने पुन्हा एकदा संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु, ते प्रयत्न फुस्स झाले.

विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जुन्या नेत्यांना डावलून रोहित पवार पुढे आले आहेत. ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांचे तर ते प्रतिस्पर्धी असल्याचे दिसून येते. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याऐवजी धोरणात्मक निर्णय स्वतः जाहीर करत आहेत. राज्यातील अनेक निर्णयांबाबत ज्येष्ठ नेते शरद पवार भाष्य करत नसले, तरी त्यांची गादी रोहित पवार चालवतात, यात शंका नाही. खरे पाहता, त्यांच्या विधानसभा मतदारसंघात अनेक जटिल प्रश्न उभे आहेत. त्याकडे लक्ष देण्यासाठी त्यांना वेळ नाही.

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसपेक्षा देशाच्या राजकारणातच भाजपविरोधात प्रभावी ठरण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. यासाठी ते प्रसिद्धीच्या झोतात सतत राहण्याचा प्रयत्न करत आहेत. अजित पवार यांच्या अपघाताचा सूत्रधार मफलरवाला होता, असा संशय व्यक्त करण्यात आला; परंतु तो सिद्ध करता आला नाही. मोठमोठी विधाने करायची आणि प्रसिद्धीच्या झोतात राहायचे, एवढेच काम रोहित पवार यांना आहे, असे दिसते.

रोहित पवार यांच्या पाठोपाठ उद्धव ठाकरेही पुढे आले आहेत. सन २०१४ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्रिपदाची शपथ घेऊन भाजपचे ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे बीडला येत असताना झालेल्या अपघाताबाबत त्यांनी संशय व्यक्त केला आहे. उद्धव ठाकरे यांना बारा वर्षांनंतर ही आठवण झाली. स्व. गोपीनाथ मुंडे यांचा अपघाती मृत्यू होऊन एवढी वर्षे लोटली असताना आता शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे यांनी केला आहे. गोपीनाथ मुंडे यांना केंद्रातील सत्ताधाऱ्यांकडून कशी वागणूक दिली जात होती, हे जगजाहीर आहे.

मात्र, त्याबाबत काही सत्य असेल, तर ते पुराव्यानिशी मांडणे आवश्यक आहे. पुरावे सादर न करता निव्वळ हवेत बाण सोडणे योग्य नाही. विरोधी पक्षांकडून अशा प्रकारची विधाने होत असताना त्यांची सत्यता तपासणे आवश्यक आहे. सध्या महाराष्ट्रातील राजकारण हिंदोळ्यावर उभे आहे. महाराष्ट्रात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात असल्याचा आरोप केला जातो. जेव्हा मतपेटीद्वारे सरकार पाडता येत नाही, तेव्हा अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो, असे म्हटले जाते. महाराष्ट्राबरोबरच देशातही असे प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जाते.

महाराष्ट्रात आता मित्रपक्षांमध्येच चढाओढ लागली आहे. विधान परिषदेच्या पाच जागांसाठी मतदान होत असल्यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची झाली आहे. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंमध्ये मतभेद आणि वाद सुरू आहेत. निवडणुकीचे निकाल काय लागतात, यावर राज्यातील राजकारणाचे चित्र स्पष्ट होईल. सत्तेत राहायचे, सत्तेचा उपभोग घ्यायचा आणि त्याच सत्तेवर टीका करायची, असा प्रयत्न मित्रपक्षांकडून केला जात असल्याचे दिसते. याचे जनक आमदार रोहित पवार आहेत, असा आरोप केला जातो.

उद्धव ठाकरे यांनी हे सरकार पाच महिन्यांत पाडणार, अशी घोषणा केली आहे, तर त्यांचे बंधू राज ठाकरे यांनी सहा महिन्यांचे भाकीत केले आहे. इतर देशांतील घटनांचा दाखला देऊन राजकारण केले जात आहे. नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तान आणि फ्रान्स येथील उदाहरणे देऊन काही राजकीय नेते एकत्र आले आहेत. त्यात प्रामुख्याने राहुल गांधी, ठाकरे बंधू आणि रोहित पवार हे पुढे दिसत आहेत. सीजेपीला पुढे करून देशभरात अराजकता निर्माण करण्याची चाल खेळली जात आहे. एवढेच कशाला, आता लष्करालाही पाचारण करण्याचे षडयंत्र सुरू असल्याचा आरोप केला जात आहे.

भारतात संविधानानुसार राज्यकारभार चालतो. परंतु, विरोधकांना हे मान्य नसल्याचा आरोप केला जातो. त्यांच्या लक्षात आले आहे की, आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका २०२९ पर्यंत होऊ शकणार नाहीत. त्यामुळे अशा पद्धतीने सरकार उलथवण्याचे प्रयत्न केले जात असल्याचे म्हटले जाते. हे लोकशाहीच्या दृष्टीने गंभीर आहे. घटनात्मक संस्थांना आव्हान दिले जात आहे. यावरून संविधानाबाबत विरोधकांची भूमिका काय आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. संविधानाने निर्माण केलेल्या घटनात्मक पदांवरच टीका करून त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला जात आहे.

प्रारंभी राज्यपाल, विधानभवन आणि निवडणूक आयोग यांना लक्ष्य करण्यात आले होते. परंतु, त्यात यश न मिळाल्याने आता हे लोण देशपातळीवर पोहोचले आहे. प्रारंभी मतचोरीचे आरोप करण्यात आले, त्यानंतर ईव्हीएमवर आरोप झाले आणि आता निवडणूक आयोगावरच हल्ला केला जात असल्याचे म्हटले जाते. हे सर्व लोकशाहीविरोधी तंत्र असल्याचा आरोप केला जात आहे. केंद्र सरकारने याबाबत खंबीर पावले उचलण्याची गरज आहे. महाराष्ट्रात या घडामोडींचे सूत्रधार ठाकरे बंधू आणि रोहित पवार असल्याचा आरोप केला जात आहे.

## ये बॉम्बे शहर हादसों का शहर है...

**मुंबईच्या सुरक्षेशी खेळणाऱ्या समाजकंटकांना आणि दहशतवाद्यांना कठोर कृतीतून प्रत्युत्तर देणे गरजेचे आहे, जेणेकरून गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा व खाकीचा वचक कायम राहील.**

मुंबई म्हटली की 'कधीही न झोपणारे शहर' अशी तिची जगभर ओळख आहे, मात्र त्याचवेळी हे शहर दहशतवाद्यांच्या, देशविघातक शक्तींच्या आणि समाजकंटकांच्या नेहमीच हिटलिस्टवर राहिले आहे. नुकताच मुंबईच्या महापौर कार्यालयासह बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांचे जुहू येथील 'जलसा' निवासस्थान, प्रसिद्ध गायक दलजीत दोसांझची महालक्ष्मी रेसकोर्स येथील आगामी संगीत मैफील आणि शहरातील काही प्रमुख शैक्षणिक संस्थांना बॉम्बस्फोटाची धमकी देणारा एक अत्यंत गंभीर ई-मेल समोर आला आहे. या धमकीमुळे सुरक्षा यंत्रणा आणि मुंबई पोलिसांनी तत्काळ चक्रे फिरवत संपूर्ण शहरात सुरक्षेत मोठी वाढ केली आहे. विशेष म्हणजे, या मेलमध्ये 'खलिस्तान'चा उल्लेख करत आगामी ३१ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर दरम्यान महत्त्वाच्या ठिकाणी हल्ले करण्याचे व एका शाळेवर ग्रेनेड हल्ला करण्याची धमकी देण्यात आली आहे. महापौरांच्या कार्यालयाची व इतर परिसरांची कसून तपासणी केल्यानंतर जरी सध्यातरी कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नसली, तरी या प्रकारामुळे संपूर्ण शहरात पुन्हा एकदा खळबळ उडाली असून सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



कालप्रवाह

मुंबई आणि दहशतवाद यांचा इतिहास अतिशय वेदनादायी आणि काळाकुट्ट आहे. भूतकाळात मुंबईत १९९२-९३ मध्ये भीषण दंगे झाले, उपनगरीय रेल्वे गाड्यांना आणि सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणांना दहशतवाद्यांनी लक्ष्य केले. १९९३ चे साखळी बॉम्बस्फोट असोत किंवा मुंबईला हादरवून टाकणारा २६/११ चा अत्यंत भीषण दहशतवादी हल्ला- ज्यामध्ये पाकिस्तानातून आलेले १० दहशतवादी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, ताजमहाल पॅलेस आणि ट्रायडंट हॉटेलसारख्या प्रमुख ठिकाणी प्रत्यक्ष घुसून अंदाधुंद गोळीबार करत शेकडो निरपराध नागरिकांचे बळी घेतले होते- हे मुंबईकर कधीही विसरू शकत नाहीत. या महाविनाशकारी संकटांनंतर मुंबईने प्रत्येक वेळी अफाट साहसाने स्वतःला सावरले आणि सुदैवाने मागील काही वर्षांत शहरात कोणतीही मोठी घातपाताची घटना घडली नाही. मात्र, या शांततेचा अर्थ असा नव्हे की मुंबई पूर्णपणे धोक्यापासून मुक्त झाली आहे.

सध्याच्या काळात दहशतवादाच्या पारंपरिक धोक्यांसोबतच संघटित गुन्हेगारीचे मोठे आणि नवे आव्हान मुंबईसमोर उभे ठाकले आहे. गेल्या काही दिवसांत कुख्यात लॉरेन्स बिष्णोई टोळीकडून झालेली गोळीबार प्रकरणे, प्रसिद्ध व्यक्तींच्या घरांवर झालेली हल्लेखोरी आणि या गँगस्टर टोळीची दिवसेंदिवस वाढती दहशत यामुळे मुंबईकरांच्या मनात पुन्हा एकदा भीतीचे सावट पसरले आहे. एकीकडे देशविघातक शक्ती डिजिटल माध्यमातून धमकीचे सत्र चालवून दहशत पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत, तर दुसरीकडे गँगस्टर संस्कृती खुलेआम डोके वर काढत आहे. उत्तर प्रदेशबरोबर पंजाबमध्ये निवडणुका असून तेथील निवडणुकीत खलिस्तानवादी चळवळीचा मुद्दा जोर पकडण्याची चिन्हे दिसत आहे. कुठल्याही दहशतवादी टोळ्यांकडून देशाच्या आर्थिक राजधानीलाच लक्ष्य केले जाते.

अशा अत्यंत गंभीर स्थितीत, केवळ धमकीचे ई-मेल आल्यावर यंत्रणांनी तात्पुरती सुरक्षा वाढवणे पुरेसे नाही. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे ती कायमच हाय अलर्टवर राहणे अपेक्षित आहे. गुप्तचर यंत्रणांनी अधिक तत्पर होऊन अशा प्रकारच्या धमक्यांचा सायबर सेलच्या मदतीने उगम शोधून मूळ सूत्रधारांपर्यंत कठोरपणे पोहोचणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. केवळ व्हीआयपींच्या सुरक्षेपुरते मर्यादित न राहता सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेलाही सर्वोच्च प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक मुंबईकरानेही आजूबाजूला डोळसपणे पाहिले पाहिजे.

## धक्के-बुक्के

**■ मुदतबाह्य वस्तू विकणाऱ्या ब्लिंकिटसह अनेकांवर एफडीएचा बडगा**




दिवाळीच्या काळात भेसळयुक्त पदार्थ विक्रीला ऊत येतो. अशावेळी तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखालील एफडीएला डोळ्यात तेल घालून राहावे लागणार हे उघड आहे.



**■ उद्योग विभाग, एमआयडीसीची दादागिरी खपवून घेणार नसल्याचा गणेश नाईकांचा इशारा**

मंत्री गणेश नाईक विरुद्ध उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हा संघर्ष शमण्याचे नाव घेत नाही. त्यात कथित आरोपांचा ऑडिओ बाहेर आल्याने तर संघर्ष तीव्र होणार.

**■ देवीच्या विसर्जनाच्या वेळी हयगय करणारे ठाणे पालिकेचे तीन अधिकारी निलंबित**



ठाण्यासारख्या गर्दीच्या शहरात विसर्जन मिरवणुकीचे नियोजन जर नीट केले नसेल तर मोठी दुर्घटना घडू शकते. खाबूगिरी करायची व जनतेला सेवा देण्याबाबत दुर्लक्ष केल्याचे परिणाम.



**■ सुनेत्रा पवार यांच्या कार्यालयातील दोन ओएसडींना मुंढवा जमीन घोटाळ्यात नोटिसा**

महायुती सरकारमधील नेते, मंत्री यांच्या पाठीशी चौकशा, तपास यंत्रणांचे शुल्ककाष्ठ लावून ठेवले आहे. जेणेकरून सरकारमधून कुणी बाहेर पडू नये. महायुतीचा हा पिंजरा म्हणायचा की काय?

**■ एसटीच्या दैनंदिन उत्पन्नात पाच कोटींची घसरण**



सणासुदीच्या काळात तरी एसटीला बरकत यायला हवी. मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासमोरच आव्हान मोठे आहे. ते त्याला कसे तोंड देतात हेच पाहायचे.

## जनमनाचा कानोसा

### शाळांनी शाळांना मार्गदर्शन ही स्तुत्य संकल्पना!

**शाळांनी** एकमेकांना मार्गदर्शन करणे ही निश्चितच स्वागतार्ह आणि स्तुत्य संकल्पना आहे. शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांचे आणि तेथील शिक्षकांचे प्रत्यक्ष अनुभव इतर शाळांपर्यंत पोहोचल्यास शिक्षकांना नवनवीन शैक्षणिक उपक्रम राबविण्यास प्रोत्साहन मिळेल तसेच एकमेकांचे अनुभव, संकल्पना आणि यशस्वी प्रयोग यांची देवाणघेवाण होऊन शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण होण्यास मदत होईल. 'शाळांनी शाळांना मार्गदर्शन' हा उपक्रम प्रभावीपणे राबविल्यास शैक्षणिक दर्जा उंचावण्यास निश्चितच हातभार लागेल. एका शाळेने राबविलेला यशस्वी शैक्षणिक प्रयोग दुसऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी आणि लाभदायक ठरू शकतो. यामुळे शिक्षकांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लागेल आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. मात्र, हा उपक्रम केवळ निवडक शाळांपुरता मर्यादित न राहता ग्रामीण, दुर्गम आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास भागांतील शाळांपर्यंतही पोहोचणे नितांत आवश्यक आहे. अशा शाळांनाही मार्गदर्शनाची आणि अनुभवांच्या देवाणघेवाणीची समान संधी मिळाल्यास शैक्षणिक गुणवत्तेतील तफावत कमी होण्यास मदत होईल.

– **विश्वनाथ पंडित**, ठाणे

### वायुप्रदूषणावर नियंत्रण ठेवणे गरजेचे!

**देशात** झपाट्याने वाढत चाललेली वायुप्रदूषणाची समस्या गंभीर बनत आहे. देशभरात १.४ अब्ज लोकांना विषारी हवेत श्वास घ्यावा लागत असून आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यासाठी हवेचा दर्जा सुधारणे गरजेचे आहे. नुकतेच मुंबईतील वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने संबंधित यंत्रणांना सक्रिय होण्याचे निर्देश दिले आहेत. दिल्लीपेक्षाही मुंबईची स्थिती गंभीर झाल्याने चिंता व्यक्त केली आहे. IQAir च्या अहवालानुसार मुंबई जगातील तिसऱ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर असून AQI १६६ वर पोहोचला आहे. त्यामुळे नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मुंबईला समुद्राकडून येणारे वारे, मोकळ्या जागा व विस्तीर्ण समुद्रकिनारा असा नैसर्गिक फायदा लाभला आहे, तरीही प्रदूषणाची स्थिती गंभीर आहे. प्रदूषणामुळे दृष्यमानता ५०० मीटरपेक्षा कमी झाल्याची बाब न्यायालयाने अधोरेखित केली. त्यावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

–**संतोष दत्तू शिंदे**, अहिल्यानगर

### सत्ता संघर्षामुळे मुंबई असुरक्षित

**मागील** एका तपापासून केंद्रात आणि राज्यात भाजप मित्रपक्षांची सत्ता आहे. लोकशाही मूल्यांची पायमल्ली करून सत्तेसाठी वाटेल ते करण्याची तयारी. याचाच परिणाम मुंबई-महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्थेवर झाला आहे. गृह मंत्रालयाचे प्रमुख आहेत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री. परंतु कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे. तीन पक्षांचे संयुक्त सरकार आहे. प्रत्येक पक्षांची चढाओढ सुरू आहे. त्यामुळे सगळेच व्यस्त आहेत. गुन्हेगार आपला कार्यभाग साधून घेत आहेत. ठाण्यात एका पदाधिकाऱ्यांची निर्घृण हत्या झाली, काही दिवसांपूर्वी टायगर श्रॉफवर गोळीबार झाला. १९९० च्या दशकात टोळी युद्धाचा भडका उडाला होता. १९९५ साली शिवसेना-भाजप युती सत्तेवर आली. त्यानंतर टोळ्यांचे मुंबई पोलिसांनी कंबरडे मोडले. एकापेक्षा एक नामांकित गुंडांची दहशत तत्कालीन सरकारने संपवली होती. लॉरेन्स बिश्नोई सद्धा चर्चेत आहे. मुंबई पोलिसांचा देशात नावलौकिक आहे. तो तसूभरही कमी होऊ देऊ नका. कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सरकारची आहे. सत्ता संघर्षाचा परिणाम मुंबईतील सुरक्षितेवर होऊ नये.

– **महादेव गोळवसकर**, मुंबई

'**जनमनाचा कानोसा**'साठी पत्र पाठवू इच्छिणाऱ्या वाचकांनी स्वतःचा फोटो आणि मोबाईल नंबरसह आपली पत्रे navshakti.news@gmail.com या ई मेलवर युनिकोडमध्ये मराठीत टाईप करून पाठवावीत. तसेच आपल्या मित्र -मैत्रिणींना व नातेवाइकांनाही सांगावे.

## निवडक

### पाणी बचतीचा संदेश देत साहसी मोहीम

**कल्याण :** पाणी बचत आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी कल्याण-डोंबिवली परिसरातील १९ सायकलस्वार कल्याण ते कर्नाटकातील दांडेली अशा ९०० किलोमीटरच्या साहसी मोहिमेवर रवाना झाले. दुर्गाडी चौकात आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनपटू दिलीप घाडगे आणि रोटरी क्लब ऑफ कल्याणचे कैलास देशपांडे यांच्या उपस्थितीत मोहिमेचा प्रारंभ झाला.या पथकात डॉक्टर, वकील, पोलीस, आयटी व्यावसायिक, रेल्वे अधिकारी, भारतीय नौदल अधिकारी आणि उद्योजकांचा समावेश आहे.

### 'लाकडाची देवी' या कथासंग्रहाचे प्रकाशन

**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण स्त्रियांचे संघर्षमय जीवन, पुरुषसत्ता आणि सामाजिक विषमता यांचे वास्तववादी चित्रण करणाऱ्या सारिका यांच्या 'लाकडाची देवी' या कथासंग्रहाचे नुकतेच प्रकाशन झाले. समर्थनगर येथील गांधी भवनात शब्दालय प्रकाशन आणि प्रगतिशील लेखक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशन सोहळा व परिसंवाद पार पडला. कथासंग्रहात स्त्रियांच्या वेदना, विद्रोही वृत्ती आणि स्वातंत्र्याची ओढ प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कथाकार ललिता गादगे होत्या. कथाकार बालाजी सुतार आणि समीक्षक रामचंद्र काळुंखे यांनी कथासंग्रहाचे विश्लेषण केले.अन्वर हुसेन यांनी कथासंग्रहाचे मुखपृष्ठ साकारले असून, १४२ पानी पुस्तकाचे प्रकाशन शब्दालय प्रकाशनाने केले आहे. प्रा. समाधान इंगळे यांनी प्रास्ताविक केले. शरयू परळकर यांनी सूत्रसंचालन, तर सुनील उबाळे यांनी आभार प्रदर्शन केले.

### पोलिओसाठी वॉकथॉन



**नवी मुंबई :** जागतिक पोलिओ दिनानिमित्त सनोफी आणि डॉ. रेड्डीज् यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबईतील मिनी सीशोर येथे वॉकथॉनचे आयोजन करण्यात आले. नवी मुंबई असोसिएशन ऑफ पेडियाट्रिक्स आणि आयएपी, रायगड शाखेच्या सहकार्याने झालेल्या या उपक्रमात सुमारे ३०० जण सहभागी झाले.भारताचा पोलिओमुक्त दर्जा कायम राखण्याबाबत जनजागृती करणे हा या वॉकथॉनचा उद्देश होता. यावेळी डॉ. जितेंद्र गव्हाणे, डॉ. सचिन मुराडे आणि डॉ. विजय येवाले यांच्यासह आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक व नागरिक उपस्थित होते.

# मीरा-भाईंदर महापालिकेच्या खरेदीवर आक्षेप

## प्रमाणपत्र ६०० रुपयांना, घड्याळ २ हजारांना; रोल-अप स्टँडीसाठी १० हजार रुपये!

**भाईंदर :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमांसाठी करण्यात आलेल्या वस्तूंच्या खरेदीच्या दरांवरून वाद निर्माण झाला आहे. ए-४ आकाराचे प्रमाणपत्र प्रत्येकी ६०० रुपये, बाजारात सुमारे ४०० रुपयांना मिळणारे भिंतीवरील घड्याळ २ हजार रुपये, तर सुमारे २ हजार रुपयांना मिळणारे रोल-अप स्टँडी १० हजार रुपयांना खरेदी केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते ॲड. कृष्ण गुप्ता यांनी केला आहे. या कथित अनियमिततेबाबत त्यांनी महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्यासह शासनाकडे लेखी तक्रार करून चौकशी, गुन्हा दाखल करण्याची आणि खर्चाची रक्कम वसूल करण्याची मागणी केली आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेने रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सुमारे पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे सांगण्यात येते. या कार्यक्रमांच्या नियोजनासाठी रौप्यमहोत्सव समिती स्थापन करण्यात आली असून, त्यात भाजपचे नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांचाही समावेश आहे.

या समितीमार्फत करण्यात आलेल्या निविदा आणि खर्चाची माहिती ॲड. कृष्ण गुप्ता यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत मिळवली आहे. या माहितीच्या आधारे त्यांनी यापूर्वीही कथित बोगस ठेकेदारांच्या प्रकरणाबाबत तक्रारी केल्या आहेत. आता रौप्यमहोत्सवी कार्यक्रमासाठी खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंच्या दरांवरून त्यांनी नव्याने आक्षेप घेतले आहेत. ॲड. गुप्ता यांच्या म्हणण्यानुसार, महापालिकेने खरेदी केलेल्या घड्याळासारखेच आणि त्याच कंपनीचे घड्याळ त्यांनी ऑनलाइन माध्यमातून केवळ ४०४ रुपयांना खरेदी केले. दोन्ही घड्याळे दाखवत त्यांनी त्यांच्या किमतीतील मोठ्या फरकाकडे लक्ष वेधले. दोन्ही घड्याळांमध्ये केवळ महापालिकेचे स्टिकर लावण्याचा फरक असल्याचा दावा त्यांनी केला आहे.ए-४ आकाराच्या प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी ६०० रुपये आकारण्यात आल्याबद्दलही त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. बाजारात सुमारे २ हजार रुपयांना उपलब्ध होणारे रोल-अप स्टँडी महापालिकेने १० हजार रुपयांना खरेदी केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

### घड्याळाच्या किमतीत गडबड

२१ जून २०२६ रोजी आयोजित एका कार्यक्रमासाठी भाजपच्या एका पदाधिकाऱ्याशी संबंधित असल्याचा आरोप करण्यात येत असलेल्या 'इन्फिनिट इव्हेंट अँड मीडिया सोल्युशन्स' या संस्थेकडून महापालिकेने विविध वस्तू खरेदी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या खरेदीमध्ये भिंतीवरील ३० घड्याळांचा समावेश होता. प्रत्येक घड्याळासाठी २ हजार रुपये याप्रमाणे एकूण ६० हजार रुपये खर्च दाखविण्यात आल्याचे सांगण्यात येते. तसेच ए-४ आकाराच्या प्रत्येक प्रशस्तीपत्रकासाठी ६०० रुपये आणि प्रत्येक रोल-अप स्टँडीसाठी १० हजार रुपये दर आकारण्यात आल्याचा दावा ॲड. गुप्ता यांनी केला आहे.




### सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न

या खरेदीप्रकरणी सार्वजनिक निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप ॲड. गुप्ता यांनी केला आहे. संबंधित ठेकेदाराला बाजारभावापेक्षा जास्त दराने वस्तूंचे कंत्राट देण्यात आल्याचा दावा करत त्यांनी या व्यवहारांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.महापालिका आयुक्त आणि शासनाकडे दिलेल्या लेखी तक्रारीत संबंधित खरेदीचे दर, निविदा प्रक्रिया, ठेकेदाराची पात्रता आणि प्रत्यक्ष खर्च यांची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अनियमितता आढळल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करावा आणि महापालिकेच्या निधीचे नुकसान झाले असल्यास ती रक्कम वसूल करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### चौकशीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार

या प्रकरणाबाबत रौप्यमहोत्सव समितीचे सदस्य आणि नगरसेवक मधुसूदन पुरोहित यांनी सावध भूमिका मांडली. अशा प्रकारच्या बाबींची चर्चा होत असली, तरी त्यामागील वस्तुस्थिती आणि सत्यता संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणून घेतल्यानंतरच त्यावर भाष्य करणे योग्य ठरेल, असे त्यांनी सांगितले.या प्रकरणातील आरोपांची अधिकृत चौकशी होऊन खरेदीचे दर, निविदा प्रक्रिया आणि संबंधित ठेकेदाराच्या व्यवहारांची वस्तुस्थिती स्पष्ट झाल्यानंतरच अंतिम निष्कर्ष निघू शकणार आहे. त्यामुळे महापालिका प्रशासन या तक्रारीची दखल घेऊन काय कारवाई करते, याकडे आता लक्ष लागले आहे.

# सक्तीच्या कर्जवसुलीला जिल्हाधिकाऱ्यांचा लगाम

## नियमबाह्य वसुली करणाऱ्या वित्तीय संस्थांवर फौजदारी कारवाई

**नांदेड :** जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि अन्य कर्जदारांना दिलासा देण्यासाठी कर्जवसुली करताना स्मॉल फायनान्स, मायक्रोफायनान्स तसेच इतर खासगी वित्तीय संस्थांनी कोणत्याही प्रकारची सक्ती, धमकी किंवा बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करू नये. तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. रविवारी आयोजित बैठकीत त्यांनी वित्तीय संस्थांना याबाबत कडक शब्दांत सूचना केल्या.

दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि कर्जदार आर्थिक अडचणींचा सामना करत असताना वित्तीय संस्थांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्याशी सौजन्यपूर्ण आणि संवेदनशील वर्तन करावे. कर्जवसुलीसाठी मानसिक त्रास देणे, अपमानास्पद वर्तन करणे, धमकावणे, हिंसाचार करणे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा वापर करणे तसेच सिबिल (CIBIL) स्कोअर खराब करण्याची भीती दाखवून दबाव आणणे, अशा बेकायदेशीर किंवा नियमबाह्य कृती कोणत्याही परिस्थितीत सहन केल्या जाणार नाहीत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक शाहूराज हिरे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक बी. जी. सोनकांबळे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



### संस्थांवर कठोर कारवाई

स्मॉल फायनान्स, मायक्रोफायनान्स आणि इतर वित्तीय संस्थांकडून कर्जवसुलीच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनामार्फत संबंधितांवर कायद्यानुसार कठोर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांना कोणत्याही प्रकारे पाठीशी घातले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी नियमित देखरेख ठेवावी

क्षेत्रीय स्तरावर तहसीलदार, सहाय्यक निबंधक तसेच संबंधित सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक पोलीस प्रशासनाच्या समन्वयाने स्मॉल फायनान्स, मायक्रोफायनान्स आणि इतर वित्तीय संस्थांच्या कर्जवसुलीच्या व्यवहारांवर बारकाईने लक्ष ठेवावे, असे निर्देश देण्यात आले.अनधिकृत वसुली, कर्जदारांना धमकावणे किंवा इतर संशयास्पद व्यवहार आढळल्यास त्यांची तातडीने पडताळणी करून संबंधित कायद्यांनुसार आवश्यक कारवाई करावी. अशा प्रकरणांचा नियमित आढावा घेऊन केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

### कायद्याचे पालन अनिवार्य

सर्व वित्तीय संस्थांनी कर्जवसुली करताना लागू नियमांचे पालन करणे, कर्जदारांच्या सन्मानाचे आणि कायदेशीर हक्कांचे संरक्षण करणे तसेच कोणत्याही प्रकारच्या दबावतंत्राचा वापर टाळणे बंधनकारक आहे. दुष्काळी परिस्थितीचा गैरफायदा घेऊन शेतकरी आणि सर्वसामान्य कर्जदारांना त्रास देणाऱ्या संस्थांविरुद्ध प्रशासन कठोर भूमिका घेणार आहे. नियमभंग करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिला.

# यावल तालुक्यात पथसंचलनाला विरोध

## किनगावमध्ये तणावाचे वातावरण



**जळगाव :** यावल तालुक्यातील किनगाव येथे रविवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पथसंचलनाला विरोध झाल्याने तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. पथसंचलनाला विरोध करणाऱ्या जमावाला हटवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. यावेळी दगडफेक झाल्याचेही वृत्त आहे. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली असून, गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

किनगाव येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संचलनासाठी पोलिसांची परवानगी घेण्यात आली होती. मात्र, पथसंचलनाला काही जणांनी विरोध केल्याने तणाव निर्माण झाला. संचलन सुरू असताना ते अडवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे सांगण्यात येते. याचदरम्यान दगडफेक झाल्याचे वृत्त समोर आले असून, काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक संदीप गावित यांच्यासह पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पथसंचलनासाठी परवानगी घेण्यात आली असल्याने त्याला अडथळा आणू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले.

संबंधित जमावाची समजूत काढण्यासाठी पोलिसांनी सुमारे अडीच तास प्रयत्न केले. मात्र, जमाव माघार घेण्यास तयार नसल्याने अखेर पोलिसांनी सौम्य लाठीमार करून जमावाला हटवले. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यात पोलिसांना यश आले. सध्या किनगावमधील परिस्थिती शांत असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

# मुंबई विद्यापीठात संस्कृत दिन उत्साहात

**मुंबई :** संस्कृत भाषा आता केवळ पाठ्यपुस्तकांपुरती मर्यादित राहिलेली नसून, सोशल मीडिया आणि व्यावसायिक क्षेत्रातही तिचा प्रभावीपणे वापर होत आहे. संस्कृत भाषेतील रील्स आणि पॉडकास्टला सोशल मीडियावर वाढती लोकप्रियता मिळत असून, आधुनिक माध्यमांमुळे या प्राचीन भाषेच्या प्रसारासाठी नवे मार्ग खुले होत आहेत, असे प्रतिपादन संस्कृत अभ्यासक डॉ. प्रसाद भिडे यांनी केले.

मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागातर्फे शनिवारी संस्कृत दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. प्रसाद भिडे यांचा संस्कृत विभागाच्या प्रमुख डॉ. सुचित्रा शरद ताजणे यांच्या हस्ते



सत्कार करण्यात आला.

डॉ. प्रसाद भिडे हे सोमय्या विद्याविहार विद्यापीठाच्या संगीत व कला सादरीकरण विद्याशाखेत सहाय्यक संचालक आणि सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना त्यांनी संस्कृत भाषेच्या बदलत्या स्वरूपावर प्रकाश टाकला. सोशल मीडियासारख्या आधुनिक माध्यमांमध्येही संस्कृतचा प्रभावी वापर होत असून, रील्स आणि पॉडकास्टच्या माध्यमातून ही भाषा नव्या पिढीपर्यंत पोहोचत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले महाराष्ट्र संस्कृत साहित्य अकादमीचे अध्यक्ष सौरभ शिंदे यांनी महाराष्ट्र सरकार संस्कृत भाषेच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. या प्राचीन आणि समृद्ध भाषेचे संवर्धन करण्यासाठी शासनाकडून आर्थिक सहाय्यही उपलब्ध करून दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# जयपूरजवळ भीषण अपघात; तिघांचा मृत्यू, २५ जखमी

**लासलगाव :** राजस्थानमध्ये देवदर्शनासाठी गेलेल्या नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील अजमेर सौंदाणे येथील भाविकांच्या टेम्पो ट्रॅव्हल्सचा जयपूर-अजमेर राष्ट्रीय महामार्गावर अपघात झाला. बगरू पुलाजवळ शनिवारी रात्री झालेल्या या दुर्घटनेत तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर २५ भाविक जखमी झाले. त्यापैकी सात जणांची प्रकृती चिंताजनक आहे.

मगर कुटुंबातील २८ भाविक १९ तारखेला धार्मिक यात्रेसाठी राजस्थानला रवाना झाले होते. खाटू श्याम बाबा मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर ते सावरियासेठ मंदिराकडे जात असताना रात्री पावणे दोनच्या सुमारास बगरू पुलाजवळ हा अपघात झाला. भरधाव टेम्पो ट्रॅव्हल्सने ट्रेलरला जोरदार धडक दिल्याने ही दुर्घटना घडली.

या अपघातात सेवानिवृत्त कृषी अधिकारी दीपक त्र्यंबकसिंग मगर (६५), संदीप रामसिंग मगर (५५) आणि महेश विजयसिंग मगर (४५) या तिघांचा मृत्यू झाला. तिघांचे मृतदेह रविवारी सकाळी अजमेर सौंदाणे येथे आणण्यात आले. सकाळी अकराच्या सुमारास त्यांच्यावर सामूहिक अंत्यसंस्कार करण्यात आले. किरकोळ जखमींना घरी पाठविण्यात आले असून, सात गंभीर जखमींवर जयपूर येथील मानसिंग रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# येवल्यात लग्नमंडपात राडा

**येवला :** प्रेमविवाहाचा राग मनात धरून नवरीच्या नातेवाइकांनी नवरदेव आणि त्याच्या नातेवाइकांच्या अंगावर डिझेल ओतून जाळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप येवला शहरात करण्यात आला आहे. पारंपरिक विवाह सोहळ्यादरम्यान दोन गटांत जोरदार हाणामारी झाली. या घटनेत सात ते आठ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, येवल्यातील ऋषभ दीपक भगुंडे याने निफाड तालुक्यातील रामपूर नैताळे येथील तरुणीसोबत सप्टेंबरमध्ये प्रेमविवाह केला होता. सुमारे दोन महिन्यांनंतर नवरदेवाच्या नातेवाइकांनी पारंपरिक पद्धतीने विवाह सोहळ्याचे आयोजन केले होते. शहरातील एका लॉन्समध्ये सुमारे १०० ते २०० नातेवाइकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम सुरू होता.

यावेळी नवरीच्या नातेवाइकांनी डिझेलचे कॅन आणून नवरदेव आणि त्याच्या नातेवाइकांच्या अंगावर डिझेल ओतल्याचा तसेच त्यांना जाळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. यावरून दोन्ही गटांत हाणामारी झाली.

# मीतची ICAI परीक्षेत देशात २२ वी रँक

**कराड :** जिद्द, शिस्त आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर पांचगणी येथील ॲस्टॉन हॉस्टेल व नचिकेतास हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी मीत जिग्नेश दुधात याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) च्या सप्टेंबर २०२६ मध्ये झालेल्या इंटरमिजिएट परीक्षेत ४६२ गुण मिळवत त्याने देशात २२ वा क्रमांक पटकावला.



मीत हा इयत्ता दहावीपासून या संस्थेत शिक्षण घेत आहे. अभ्यासाबरोबरच क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांतही त्याने सहभाग घेतला. नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन, संकल्पनांचे सखोल आकलन आणि ध्येयाप्रति असलेली निष्ठा यांमुळे त्याला हे यश मिळाले.

चार्टर्ड अकाऊंटन्सीसारख्या आव्हानात्मक अभ्यासक्रमाच्या परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर स्थान मिळवणे ही अभिमानास्पद कामगिरी आहे. मीतच्या यशामुळे पांचगणीच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

संस्थेचे संस्थापक नरेंद्र विजय बिरामणे आणि अध्यक्ष अमर विजय बिरामणे यांनी मीतचे अभिनंदन केले. शिक्षक, कर्मचारी, पालक आणि हितचिंतकांनीही त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. मीतचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

## ५१७ जणांच्या सामूहिक शंखनादाने नाशिकच्या नावे इतिहास

# शंखनादाच्या विश्वविक्रमाने दुमदुमला गोदाकाठ



**नाशिक :** "अभिनंदन! तुम्ही एक नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे!" गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी ऋषिकेश नाग यांनी ही घोषणा करताच गोदावरीचा पवित्र तीर 'भारत माता की जय'च्या जयघोषाने दुमदुमून गेला. एकाच वेळी ३०३ जणांनी शंखनाद करण्याचा अमेरिकेचा पूर्वीचा विक्रम मागे टाकत ५१७ जणांनी सामूहिक शंखनाद केल्याने नाशिकच्या नावे ऐतिहासिक कामगिरीची नोंद झाल्याचे आयोजकांनी सांगितले. भक्ती, श्रद्धा, सामूहिक शक्ती आणि भारतीय संस्कृतीचा गौरव अधोरेखित करणारा हा सोहळा आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या मंगल पर्वाची आध्यात्मिक नांदी ठरला.

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण आणि अनंत विजय शंखनाद पथक यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागरी पौर्णिमेच्या पावन पर्वावर गोदाकाठावरील यशवंत महाराज पटांगण येथे या सामूहिक शंखनादाचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.

एकाच वेळी ५१७ शंखवादकांनी केलेल्या शंखनादामुळे परिसरात चैतन्यपूर्ण आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले. गोदावरीच्या तीरावर घुमलेल्या शंखध्वनीने नाशिकच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविले. या उपक्रमामुळे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या स्वागतासाठी नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या वेळी महापौर हिमगौरी आडके आहेर, आमदार राहुल ढिकले, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता अरुंधती शर्मा, अधीक्षक अभियंता देवेंद्र पवार, नियोजन विभागाचे उपायुक्त योगेंद्र चौधरी, कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी ऋषिकेश नाग, समन्वयक मिलिंद बेर्लेकर, अनंत विजय शंखनाद पथकाच्या वृषाली घोलप आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांच्यासह साधू-महंत, शंखनाद वादक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गोदाकाठावर आध्यात्मिक वातावरणनिर्मिती

सामूहिक शंखनादाच्या माध्यमातून नाशिकच्या धार्मिक परंपरेचा गौरव करण्याबरोबरच सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर आध्यात्मिक वातावरणनिर्मिती करण्यात आली. सामूहिक सहभागातून साकारलेल्या या उपक्रमाने गोदाकाठावर भक्ती आणि सांस्कृतिक अभिमानाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.

# मुरबाडमधील अनधिकृत वीटभट्ट्यांचा प्रश्न ऐरणीवर

**नामदेव शेलार / मुरबाड**

मुरबाड तालुक्यातील वीटभट्ट्यांवर काम करणारे अनेक मजूर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहत असल्याची चर्चा कामगार वर्गात सुरू आहे. वीटभट्टी मालकांकडून आवश्यक अर्ज भरून घेऊन त्यावर सह्या आणि शिक्के घेतल्यानंतरही, रॉयल्टीसंदर्भातील कागदपत्रांची पडताळणी पूर्ण न झाल्याचे कारण देत काही कामगारांचे अर्ज नामंजूर झाल्याचे संदेश मोबाईलवर प्राप्त झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे वीटभट्ट्यांची अधिकृतता, रॉयल्टीचा भरणा आणि कामगारांच्या नोंदणी प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुरबाड तालुक्यातील वीटभट्ट्यांवर प्रत्यक्ष काम करणाऱ्या अनेक मजुरांनी बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेअंतर्गत नोंदणीसाठी अर्ज सादर केले होते. संबंधित अर्ज नियमानुसार वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आले. मात्र, साधारण एक ते दीड महिन्यानंतर काही कामगारांना रॉयल्टीसंदर्भातील कागदपत्रे पडताळणीसाठी प्राप्त न झाल्याने अर्ज नामंजूर करण्यात येत असल्याचे संदेश मिळाल्याचे सांगितले जाते. त्यामुळे प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांना नेमक्या कोणत्या कारणामुळे योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

मुरबाड तालुक्यासह ग्रामीण भागात यापूर्वी बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेअंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमधून कामगारांना भांडीवाटप, आर्थिक सहाय्य आणि इतर योजनांचे लाभ देण्यात आल्याचे दिसून आले आहे. अशा वेळी संबंधित वीटभट्ट्यांची रॉयल्टी आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी कोणत्या निकषांवर करण्यात आली होती, हा प्रश्न उपस्थित होत आहे. पूर्वी लाभ मिळालेल्या कामगारांच्या प्रकरणांचीही वस्तुस्थिती स्पष्ट करावी. पूर्वीच्या प्रक्रियेत काही त्रुटी राहिल्या असतील, तर त्यांची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. त्याचबरोबर सध्याच्या अर्जदारांना लागू असलेले निकष आणि अर्ज नामंजूर करण्याची कारणे पारदर्शकपणे जाहीर करावीत, अशी मागणी होत आहे.

काही वीटभट्ट्यांमध्ये वीट विक्रीच्या पावत्या दिल्या जात नसल्याचा तसेच जीएसटीसंदर्भातील नियमांचे पालन होत नसल्याचा आरोपही केला जात आहे. या बाबींची महसूल आणि संबंधित कर विभागांनी तपासणी करावी, अशी मागणी पुढे येत आहे.



## रॉयल्टीच्या कागदपत्रांवरून प्रश्नचिन्ह

बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत पात्र कामगारांना विविध शासकीय योजनांचा लाभ, आर्थिक सहाय्य आणि आवश्यक वस्तूंचे वाटप केले जाते. मात्र, वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्या मजुरांच्या अर्जांमध्ये रॉयल्टीच्या कागदपत्रांचा मुद्दा उपस्थित झाल्याने महसूल विभाग आणि बांधकाम कामगार विभागाच्या कार्यपद्धतीबाबत चर्चा सुरू झाली आहे. रॉयल्टीचा विषय महसूल विभागाशी संबंधित असताना, आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे कारण देऊन प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांचे अर्ज नामंजूर होत असतील, तर त्यासाठी लागू असलेले नियम आणि निकष स्पष्ट होणे आवश्यक आहे. संबंधित वीटभट्टीधारक अधिकृत असल्यास त्यांच्या रॉयल्टीच्या नोंदी आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

## दीडशेहून अधिक वीटभट्ट्यांच्या व्यवहारांची चौकशी करा!

मुरबाड तालुक्यात दीडशेहून अधिक वीटभट्टीधारक असल्याचे सांगितले जाते. या वीटभट्ट्यांसाठी रॉयल्टी भरण्याच्या प्रक्रियेत महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांकडून पैसे घेतले जात असल्याचेही आरोप केले जात आहेत. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे संबंधित व्यवहारांची निष्पक्ष चौकशी करण्याची गरज व्यक्त होत आहे. वीटभट्ट्यांवर मोठ्या प्रमाणात वीट उत्पादन आणि विक्री होत असताना शासनाला अपेक्षित महसूल मिळतो का, हा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. रॉयल्टी वसुलीचे वार्षिक नियोजन आणि प्रत्यक्ष वसुली यांचा तपशील सार्वजनिक करावा, अशी मागणी होत आहे.

# 'वोट बचाओ-देश बचाओ' अभियान ग्रामीण भागात पोहोचवा

### जिल्हा समन्वयक हिम्मतसिंह यांचे आवाहन; जळगाव येथे काँग्रेसची नियोजन बैठक




**जळगाव :** काँग्रेस पक्षाने सुरू केलेले 'वोट बचाओ-देश बचाओ' अभियान गावागावांत आणि ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्हा समन्वयक हिम्मतसिंह यांनी केले. शनिवारी जळगाव येथील काँग्रेस भवनात पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या आयोजित बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीत लोकशाहीचे संरक्षण, मतदारांच्या अधिकारांची जपणूक, मतदार यादीतील अनियमिततांबाबत जनजागृती आणि काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्याच्या दृष्टीने सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

हिम्मतसिंह म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा महत्त्वपूर्ण अधिकार आहे. या अधिकाराचे संरक्षण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. 'वोट बचाओ-देश बचाओ' अभियानाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे, मतदारांना जागरूक करणे आणि मतदान प्रक्रियेबाबत जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

या अभियानांतर्गत गावागावांत तसेच शहरातील विविध भागांत जनजागृतीपर उपक्रम राबविणे, पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे, तसेच बूथ स्तरापासून संघटना अधिक मजबूत करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. या बैठकीत लोकशाहीचे संरक्षण, मतदारांच्या अधिकारांची जपणूक, मतदार यादीतील अनियमिततांबाबत जनजागृती आणि काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्याच्या दृष्टीने सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.हिम्मतसिंह म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा महत्त्वपूर्ण अधिकार आहे. या अधिकाराचे संरक्षण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. 'वोट बचाओ - देश बचाओ' अभियानाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे, मतदारांना जागरूक करणे आणि मतदान प्रक्रियेबाबत जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

## जनजागृतीचे उपक्रम

बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना हिम्मतसिंह यांनी सांगितले की, 'वोट बचाओ– देश बचाओ' अभियान देशभर राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातही या अभियानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने जळगाव येथे नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. लोकशाही मूल्यांचे जतन, मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण आणि काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी आगामी काळात सातत्याने जनसंपर्क व जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जिल्हाध्यक्ष धनंजय चौधरी यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले, तर महानगराध्यक्ष जमील शेख यांनी आभार मानले.


**जाहीर नोटीस**

सार्वजनिक सूचना देण्यात येते की माझे अशील, **श्रीमती. भावना उगमराज चोपरा** या फ्लॅट क्र. एल-१५, नेन्सी कॉम्प्लेक्स को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि., संत ज्ञानेश्वर मार्ग, रतन नगर, बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०००६६ या फ्लॅटच्या १९९१ मध्ये निष्पादित नोंदणीकृत विक्री करारान्वये एकमेव व पूर्ण मालक आहेत. सदर इमारत पुर्नविकासित झाली असून राहण्यास सज्ज आहे, आणि बांधकाम व्यावसायिक व सोसायटी हे सदर फ्लॅटचा प्रत्यक्ष ताबा त्यांना देत आहेत. माझ्या आशीलचे असे म्हणणे आहे की, त्यांनी कोणत्याही व्यक्ती/व्यक्तीं, वित्तीय संस्था/संस्था, बँक/बँका किंवा अन्य कोणत्याही संस्थेच्या बाजूने कोणतेही हमीपत्र, गहाण, संमती किंवा सुरक्षा दस्तऐवज निष्पादित केलेले नाहीत आणि असे कोणतेही दस्तऐवज सदर फ्लॅटवर किंवा माझे आशीलवर बंधनकारक नाही.
कोणतीही व्यक्ती/व्यक्ती, संस्था/संस्था, बँक/बँका किंवा अन्य संस्था ज्यांचा सदर फ्लॅटवर कोणताही हक्क, मालकी, स्वारस्य, भार, गहाण, लीयन किंवा तारण असल्याचा दावा असेल, किंवा सदर फ्लॅटच्या लिलाव, विक्री किंवा हस्तांतरणाबाबत माहिती असेल, त्यांनी सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत खाली नमूद पत्त्यावर माझ्याकडे लिखित तपशील व सहाय्यक दस्तऐवजांसह सादर करावेत. ही सूचना अभिलेखांची पडताळणी व स्पष्टतेसाठी देण्यात येत आहे; माझ्या आशीलचे सव हक्क, उपाय व मुद्दे स्पष्टपणे राखीव आहेत; कोणतीही जबाबदारी मान्य केलेली नाही.
ठिकाण: मुंबई **हरी ओम मिश्रा**
दिनांक: २६/१०/२०२६ **(वकील उच्च न्यायालय)**
ऑफिस नं. जी/३, तळ मजला, ओम सीमा कॉम्प्लेक्स को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., नर्मदा नगर, केबिन क्रॉस रोड, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०११०५

**महाराष्ट्र शासन**
**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय**
पत्ता: श्रीप्रस्था, नालासोपारा-विरार, लिंक रोड, एच. पी. पेट्रोलपंपच्या पुढे, निळेमोरे, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर
Email ID- vasaisdo@gmail.com
क्र. व्हीडी/आरटीएस/अपिल/नं. १४७/२०२५
दिनांक २१/१०/२०२६

**जाहीर सूचना**

याद्वारे जाहीर अवाहन करण्यात येते की, हसन अली युनुस खान व इतर यांनी मौजे-कामण, ता. वसई येथील फेरफार क्रमांक ३९३९ च्या विरूध्द इकडील न्यायालयांत क्र. व्हीडी/आरटीएस/अपिल नं. १४७/२०२५ अन्वये अपिल दाखल केलेले आहे. दावा मिळकतीचा तपशिल खालील प्रमाणे.

**दावा मिळकतीचा तपशिल**

| गावांचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| मौजे- कामण, ता. वसई | १७५/२/१ | ०-५०-० |

प्रस्तुत प्रकरणी खालील सामनेवाले यांस खालील नमुद पत्त्यावर रजिस्टर ए.डी. ने नोटीस बजावणीकरिता पाठविण्यात आला असून, सदर खातेदार हे नमुद पत्त्यावर राहत नसल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. तरी सदर दाव्याची सुनावणी **दिनांक २६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.** उपविभागीय अधिकारी वसई यांचे कार्यालय, पत्ता श्रीप्रस्था, नालासोपारा-विरार, लिंक रोड, एच. पी. पेट्रोलपंपच्या पुढे, निळेमोरे, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर येथे ठेवण्यात आलेली आहे.
त्यामुळे प्रस्तुत अपिल प्रकरणात खालील नमुद सामनेवाले यांनी अगर त्यांचेतर्फे कायदेशीर वारस अगर हितसंबंधित अन्य कोणताही व्यक्ती यांनी सदर जाहीर नोटीसीच्या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी वसई यांच्या न्यायालयांत नमुन दिलेल्या तारखेस व वेळेस आवश्य त्या कागदपत्रासह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय घेणेत येईल यांची नोंद घ्यावी.
**सामनेवाले यांचे नावे-** १) मोहम्मद जमील खान (मयत तर्फे वारस), १/१) आमीर जमील खान
१/२) सिमन जमील खान, दोघे रा. शॉप नं. १, मिरा कस्टी, गुलाब नगर, कोकणी पाडा, मालाड (पु), मुंबई ४०००९७
२) आरीफ अब्दुल्लाह पावसकर, रा. ५५, डोंगरी, मु. पो. उत्तन, भाईंदर (प), ता. जि. ठाणे,
३) अन्वर हबीबुल्ला खान, रा. २५८, डी विंग, स्ट्रीट कंपाऊन्ड, बेलासिस रोड, मुंबई ४०० ००८
४) अब्दुल एच. खान, रा. नारपोली, ता. भिवंडी, जि. ठाणे. **....सामनेवाले**
**उपविभागीय अधिकारी वसई**

वादी तर्फे ॲड. यु. एस. शिरगोपीकर

**जाहिर समन्स**

रे. क. नं. ४८/२०२२
नि. नं.

**मे. दिवाणी न्यायाधिशसाो कनिष्ठ स्तर, गडहिंग्लज यांचे कोर्टात**

१. सौ. अनुसया अमर उर्फ अमृत उर्फ अमृतराव नाईक
वय वर्षे – ५६, धंदा – घरकाम,
रा. हेब्बाळ जलद्याळ, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर, सध्या रा. घर नं. ३४०/७,
शेटीवाडा धुळेर, म्हापसा बार्देस
गोवा – ४०३५०७ .....वादी

//विरुद्ध//

२. श्री. अमर उर्फ अमृत उर्फ अमृतराव भिमा उर्फ भिमराव नाईक,
वय वर्षे –६१,
धंदा–सेवानिवृत्त,
रा. हेब्बाळ–जलद्याळ,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर .....प्रतिवादी

यातील वादी यांनी प्रस्तूतचा दावा प्रतिवादी नं. १ व २ यांचे विरुद्ध मौजे हेब्बाळ–जलद्याळ, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथील गावठाण हद्दीलगतचे गट नंबर १३३२ एकूण क्षेत्र हे. ०.१७.०० आर पैकी हे. ०.०६.३८ आरचे क्षेत्र व त्यामधील दगड विटा मातीचे कौलारू घर त्याचा ग्रामपंचायत मिळकत नंबर ४७० (अ. नं. ४७१) चे घर व परसू या मिळकतीबाबत कायम मनाईसाठी मे. कोर्टात दाखल केलेला आहे. परंतु सदर कामी यातील प्रतिवादी नं. २ श्री. अमर उर्फ अमृतराव भिमा उर्फ भिमराव नाईक हे मौजे हेब्बाळ–जलद्याळ, ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर येथील मूळ रहिवाशी असून प्रतिवादी नं. २ हे सध्या रा. बी.डी.डी. चाळ, नं. २/७५, पोलीस क्वार्टर्स डिलाईल रोड ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल मुंबई ४०००१३ येथे रहाणेस आहे. परंतु सदर प्रतिवादी नं. २ यांनी सदर दाव्याची समन्स बजावणी करून घेत नाहीत. त्यामुळे प्रतिवादी नं. २ हे या जाहिर समन्सने कळविणेत येते की, सदर जाहिर समन्स प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत अथवा दिनांक ०४/१२/२०२६ इ. रोजी सदर दाव्यामध्ये स्वतः अगर त्यांचे विधिज्ञामार्फत हजर व्हावे व सदरकामी आपले लेखी म्हणणे सादर करावे. जर आपण मुदतीत सदर दाव्याचे कामी हजर झाले नाहीत तर आपणाविरुद्ध मे. कोर्ट एकतर्फी आदेश करतील, तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/–
कनिष्ठ लिपिक

हुकूमावरून
सही/–
सहाय्यक अधीक्षक
सह दिवाणी न्यायालय,
क स्तर, गडहिंग्लज

**PUBLIC NOTICE**

This notice is hereby given to the general public that Shri K.R. Warade and others are the owners of flat No. B-2 at Gladhurst CHS Ltd., PherozeShah Mehta Road,Santacruz West, Mumbai-400054, bearing Share Certificate No. 41 and bearing distinctive Share No. 11 to 15 (five shares) and they want to sell this flat. Any person/s having any claim, rights, charge, lien in respect of this flat should submit their objections in writing together with documentary proof of such claim/s within period of 15 ( fifteen ) days from the date of publication of this notice at the address given below. If no objections with documentary evidence are received by the prescribed period, it will be taken for granted that no one have any right, title, interest, claim and whatever in respect of this flat and the present owners will be at liberty to proceed with the transaction of sale of this flat and thereafter no claim, rights, interest objections will be entertained thereafter.

Sd/-
K. R. Warade and Others
B-22, Troika Apt. CHS Ltd,
Lokhandwala Complex,
Andheri West, Mumbai – 400 053.
Mob. : 9870029386.
Place:Mumbai Date:26.10.2026

**LOSS OF SHARE CERTIFICATE**

Please take notice that Mr. Uday Balram Berde is the member of Saidham Co. Op. Housing Society Limited, Shop No.7A, Nanabhai Laxman Paralkar Marg, Parel village, Mumbai - 400012. The above named member has informed that he has Misplaced/Lost their original Share Certificate No. 77 consisting of total 5 share numbering 386 to 390, issued by the society with respect to Shop No. A/07A. Therefore to obtain duplicate share certificate the member has applied and has submitted copy of Police complaint No. 96488-2026 dated 16/07/26 also in this subject matter the directive dated 22/09/16 from Asst. Registrar co-op. societies F/S ward. In view of the said submitted documents the society has initiated the process for issuance of duplicate share certificate No. 77 of the 5 said shares to the member. Any person may be aggrieved and / or object to the supply of Duplicate Share Certificate to aforesaid member/s for any reason shall forward their written objections along with affidavit to the Society within 15 days from publication of this notice. Failing which the Society shall issue duplicate Share Certificate to the above named members as per law, which please note.
By Order of the Managing Committee,
Sd/- Hon. Secretary

**PUBLIC NOTICE**

THIS NOTICE IS HEREBY given that my client have agreed to purchase the Agricultural land more particularly mentioned in the schedule written hereunder from **Mr. SUNIL KANHAYALAL DOSHI.**

All persons having any share, right, title, benefit, interest, claim, objections & demands in respect of the property or any part thereof by way of sale, exchange, assignment, mortgage, charge, gift, trust, inheritance, occupation, possession, tenancy, sub-tenancy, leave and licenses, care-taker basis, lease, sub-lease, lien, maintenance, easement, release through any agreement, conveyance deed, writing devise, contracts/agreements or encumbrance or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing along with documentary proof /sufficient evidence within 14 days from the date of publication hereof, failing which or as otherwise the sale of the said property shall be completed without any reference or regard to any such claim or interest which shall be deemed to have been waived.

**SCHEDULE OF PROPERTY**

**Agricultural land bearing:-**

| Survey No./ Hissa No. | Area H - R - P | Akar (Rupees = Pai) |
|---|---|---|
| 105/5 | 0-32-30<br>Pot Kharaba 0-00-80<br>0-33-10 | 0=78 |
| 129/2/B | 0-38-00<br>Pot Kharaba 0-12-90<br>0-50-90 | 5=08 |
| 129/2/C | 0-18-90<br>Pot Kharaba 0-05-60<br>0-24-50 | 3=00 |

Situated at village Khalapur, Tal. Khalapur & Dist.Raigad
Sd/-
Place : Navi Mumbai **Mrs. Minal B. Khona,**
Date : 26/10/2026 **Advocate High Court & Notary,**
108, J. K. Chambers, Plot No.76,
Sector-17, Vashi, Navi Mumbai.

**एयु स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**
AU SMALL FINANCE BANK
A SCHEDULED COMMERCIAL BANK
**शेड्युल्ड कमर्शियल बँक**
**नोंदणी. कार्यालय : १९-ए, धुलेश्वर गार्डन, अजमेर रोड, जयपूर-३०२००१, (सीआयएन: एल३६९११आरजे१९९६पीएलसी०११३८१)**

**सिक्युरिटायझेन ॲक्ट २००२ च्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना**

कर्ज खाते एनपीए बनल्यामुळे प्राधिकृत अधिकाऱ्यांनी "सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२" च्या कलम १३(२) अन्वये कोष्टकात दिल्यानुसार कर्जदार/सह-कर्जदार/गहाणवटदार/हमीदार (एकत्रित "कर्जदार" असा उल्लेख) यांना ६० दिवसांची मागणी सूचना जारी केलेली आहे. सदर सूचनेनुसार जर कर्जदारांनी ६० दिवसात संपूर्ण रक्कम जमा केली नाही तर खाली दिल्यानुसार गहाण मिळकती/तारण मत्तेचा लिलाव करून रक्कम वसुल करण्यात येईल, त्यामुळे तुम्ही कर्जदार यांना मागणी सूचना तारखेपासून ६० दिवसांत पुढील व्याज आणि खर्चासह संपूर्ण कर्ज रक्कम जमा करण्यासाठी कळविण्यात येत आहे, अन्यथा प्राधिकृत अधिकारी सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) आणि १४ च्या तरतुदीन्वये खाली दिल्यानुसार गहाण मिळकत/तारण मत्तेचा विक्रीकरीता कब्जा घेण्यास मुक्त राहतील.
कर्जदारांनी नोंद घ्यावी की, सदर सूचनेच्या प्राप्तीनंतर सदरहू ॲक्ट, २००२ च्या कलम १३(१३) नुसार तुम्हाला तारण धनकोच्या लेखी पूर्ण सहमतीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यथा तारण मत्तेचे हस्तांतर करण्यापासून प्रतिबंध आणि मनाई करण्यात येत आहे.
कर्जदारांचे लक्ष सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२, अधिनियमाच्या कलम १३(८) सहवाचता नियम ३(५) च्या तरतुदीकडे वेधण्यात येत आहे की, कर्जदार लिलाव सूचनेच्या प्रकाशनापूर्वी संपूर्ण थकबाकीचा भरणा करून त्यांची तारण मत्ता विमोचित करण्यासाठी हक्कदार आहेत, जी त्यानंतर संपुष्टात येईल.

| कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार/ हमीदारांचे नाव/कर्ज खाते क्र. | कलम १३(२) अन्वये मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम | गहाण मिळकतीचे वर्णन |
|---|---|---|
| **(कर्ज खाते क्र.) एल९००१०६०८३७०९४१७६ आणि एल९००१०६०१३०७९३२३९,** मे. पारस लॉज, द्वारे श्रीम. मिनू तीर्थराज बोपचे आणि त्यांच्या प्रोप्रायटरचे कायदेशीर वारसदार दिवंगत श्री. तीर्थराज शैलेंद्र बोपचे (कर्जदार), श्रीम. मिनू तीर्थराज बोपच (सह-कर्जदार आणि दिवंगत श्री. तीर्थराज शैलेंद्र बोपचे - सह-कर्जदार यांच्या कायदेशीर वारसदार), मे. पलक स्टील हार्डवेअर अँड बिल्डिंग मटेरियल सप्लायर (सह-कर्जदार) | २६-जून-२६ रु. ८,३६,४३७/- रु. आठ लाख छत्तीस हजार चारशे सदतीस मात्र आणि रु. २०,२०,८५५/- रु. वीस लाख वीस हजार आठशे पंचावन्न मात्र २६-जून-२६ रोजीसप्रमाणे | मिळकत स्थित येथे - प्लॉट क्र - ३०७/२-बी आणि ३०७/३-बी, शीट क्र. ६५-ए, ठाक क्र. ७६, मिळकत क्र - ५/४७५, मौजा - बुज, ता. आणि जि.- गोंदिया, महाराष्ट्र, **मोजमापित १९९.३६ चौ. मी.** |
| **(कर्ज खाते क्र.) एल९००१०६०७२९८०५३८१,** मे. एनआरके एंटरप्रायझेस (कर्जदार), मंदा काजळकर (सह-कर्जदार), नंदकुमार रमाजी काजळकर (सह-कर्जदार), नितेश नंदकुमार काजळकर (सह-कर्जदार) | १४-जुलै-२६ रु. १४,६२,४३४/- रु. चौदा लाख बासष्ट हजार चारशे चौतीस मात्र १४-जुलै-२६ रोजीप्रमाणे | मिळकत स्थित येथे - स. क्र. १४८-४ किंवा १४८-५, गाळा क्र. ०७, साईनाथ इस्टेट, भिवंडी, जि.-ठाणे, महाराष्ट्र, ४२१३०५ **क्षेत्र मोजमापित १९.५१ चौ. मी.** |
| **(कर्ज खाते क्र.) एल९००१०६०१३१६६६०१,** मे. ईगल एंटरप्रायझेस (कर्जदार), सौ. वर्षा अतुल चव्हाण (सह-कर्जदार), अतुल अरुण चव्हाण (सह-कर्जदार) | १४-जुलै-२६ रु. १२,७७,६३०/- रु. बारा लाख सत्यात्तर हजार सहाशे तीस मात्र १४-जुलै-२६ रोजीप्रमाणे | मिळकत स्थित येथे - सर्व्हे क्र. १७०/३१, फ्लॅट क्र. २०५, महादेव दृष्टी कॉम्प्लेक्स, गाव कोन, ई विंग, रिलायन्स पेट्रोल पंपच्या जवळ, तालुका भिवंडी, जि.- ठाणे, महाराष्ट्र, ४२१३११ **क्षेत्र मोजमापित ५७५ चौफूट** |

दिनांक : २३/१०/२०२६ **प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाण: मुंबई, महाराष्ट्र **एयु स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

**वसली अधिकारी कार्यालय**
**मुंबई कर्ज वसुली प्राधिकरण नं. ३**
परिशिष्ट- १३
फॉर्म नं. २२
(पहा नियम ३७ (१))
सर्व परवानगी योग्य मोडव्दारे
**पहिला मजला, एम.टी.एन.एल. टेलिफोन एक्सचेंज इमारत, सेक्टर - ३० ए, वाशी, नवी मुंबई - ४००७०३.**
**आर.पी.नं.१९/२०२४** **लिलाव विक्रीची दि. ३०/१०/२०२६**

**विक्रीची घोषणा : स्थावर मालमत्ता**

**आयकर कायदा १९६१ च्या दुसऱ्या अनुसूची च्या नियम ३७, ३८ व ५२ (१) (२) अंतर्गत विक्री घोषणा निकाली काढण्यासाठी सूचना, कर्ज आणि कर्जवसुली कायद्यासह दिवाळखोरी कायदा, १९९३ वाचा**
**बँक ऑफ इंडिया**
**विरुध्द**
**मेसर्स राज इंडस्ट्रीज आणि इतर**

**प्रति,**
**(सीडी-१) मेसर्स राज इंडस्ट्रीज**
**(प्रोपा. नीलम दिलीप करणलाल यांच्या माध्यमातून)**
प्लॉट क्रमांक ४, गट क्रमांक १८५, गाव जळके, तालुका दिंडोरी, जिल्हा-नाशिक-४२२००७.
आणि
फ्लॅट नं.६, रामदेव कृपा को-ऑप एचएसजी. सोसायटी, तांबट लेन, नाशिक-४२२००१.
**(सीडी-२) श्री.दिलीप खंडू करनकाळ.**
फ्लॅट क्रमांक ६, रामदेव कृपा को-ऑप एचएसजी. समाज. तांबट लेन, नाशिक-४२२००१.
**(सीडी-३) श्री. दिलीप कासार**
फ्लॅट क्र. 5 कौशल्या सी इंद्र नगरी कामत वाडा लिंक रोड, नेरा मेटलेमंगल कार्यालय नाशिक-४२२००१.
**(सीडी-४) श्री सतीश व्ही. मालपाठक**
१६. आहेर अपार्टमेंट, अशोक स्तंभाजवळ, नाशिक-४२२००१.

१) तुम्हाला **कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (DRT 3)** च्या पीठासीन अधिकाऱ्याने काढलेल्या **O.A./ ०२/२००६** मधील पुनर्प्राप्ती प्रमाणपत्र **क्र.२६४/२०१६** वसुलीसाठी **रक्कम रु.३२,३५,१४८.००/- (रुपये बत्तीस लाख, पस्तीस हजार, एकशे अठ्ठेचाळीस रुपये मात्र)** व्याजासह आणि खर्च सोबत (CD) कडून संयुक्तपणे व स्वतंत्रपणे व तुम्ही प्रमाणपत्र धारक बँक / वित्तीय संस्थेला परतफेड करण्यात अयशस्वी झाले. आणि खालील स्वाक्षरीने कर्जदाराकडून वसुली प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी खाली दिलेल्या शेड्यूलमध्ये नमूद केल्यानुसार कर्जदाराच्या गहाण / जोडलेल्या मालमत्तेची विक्री करण्यासाठी आदेश दिले आहेत.
२) याव्दारे नोटीस दिली जाते की, स्थगितीचा कोणताही आदेश नसतांना, सदर मालमत्तेची विक्री **दि. २७/११/२०२६ रोजी दुपारी ०१.०० ते ०२.००** दरम्यान लिलावाव्दारे केली जाईल आणि ऑनलाईन ऑफलाईन व्दारे बोली लावली जाईल. वेबसाईट व्दारे https://www.bankeauctions.com लिलाव सेवा प्रदात्यासाठी अधिकृत संपर्क व्यक्तीचे तपशील आहे, नांव **C1 INDIA करिता श्री. भाविक पांड्या मोबाईल नं. ८८६६६८२९३७ ईमेल maharashtra@clindia.com Helpline Nos.91-124-4302020/21/22/23/24. email -support@bankeauctions.com.**
३) लिलाव सेवा प्रदात्यासाठी अधिकृत बँक अधिकाऱ्याचा तपशील असा आहे. **श्री. कासीम एम. वर्सी मोबाईल ९९०१४१९८६७** ईमेलः- **PimpalgaonB.pune@bankofindia.in** बँक ऑफ इंडिया अधिकाऱ्याची विक्री ही प्रतिवादी / सीडी वरील नावाच्या मालमत्तेची असेल.
४) खाली दिलेल्या वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे आणि या मालमत्तेशी संलग्न दायित्वे आणि दावे, यांनी खात्री केली गेली आहे. त्या प्रत्येक लॉटच्या विरुध्द शेड्यूलमध्ये निर्दिष्ट केल्या आहेत.
५) मालमत्ता **'जसे आहे तसे'** आणि **'जो आहे त्याप्रमाणे'** आधारावर विक्री केली जात आहे.
६) शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या लॉटमध्ये मालमत्ता विक्रीसाठी ठेवली जाईल, जर वसूल करावयाची रक्कम मालमत्तेच्या भागाच्या विक्रीद्वारे समाधानी असेल तर उर्वरीत भागाच्या संदर्भात विक्री ताबडतोब थांबविली जाईल. या प्रमाणपत्रात नमूद केलेली थकबाकी+व्याज+खर्च (विक्रीच्या खर्चासह) कोणत्याही बजवण्यापूर्वी विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याला सादर केल्यास किंवा त्याच्या समाधानासाठी पुरावा दिल्यास, विक्री देखील थांबविली जाईल. असे प्रमाणपत्र, व्याज आणि खर्च अधोस्वाक्षरीदारांना अदा करण्यात आला आहे.
७) विक्रीच्या वेळी सामान्यतः लोकांना वैयक्तीकरित्या किंवा योग्य अधिकृत एजेंटव्दारे बोली लावण्यासाठी आमंत्रित केले जाते. या विक्रीच्या संदर्भात कोणतेही कर्तव्य बजावणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा अन्य व्यक्तीने तथापि, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विक्री केलेल्या मालमत्तेसाठी बोली लावणे, संपादन करणे किंवा त्यामध्ये कोणतेही स्वारस्य मिळविण्याचा प्रयत्न करणे, विक्री दुसऱ्यामध्ये विहित केलेल्या अटींच्या अधीन असेल.
८) विक्रय आय कर अधिनियम, १९६१ च्या द्वितीय सूचीतील निर्दिष्ट परिस्थितीशी अधीन असेल आणि तेथे तयार केलेल्या नियमांशी आणि पुढील अटींशी असेल.
९) संलग्न शेड्यूलमध्ये नमूद केलेले तपशील खाली स्वाक्षरी केलेल्यांच्या सर्वोत्तम माहितीसाठी सांगितले गेले आहेत, परंतु घोषणेमधील कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान वगळल्यास अधोस्वाक्षरीदार जबाबदार राहणार नाही.
१०) शेड्यूलमध्ये नमूद केल्याप्रमाणे मालमत्ता विकली जाणार नाही. अशी राखीव किंमत आहे.
११) ज्या रकमेने बोली वाढवायची आहे, बोलीच्या रकमेबद्दल किंवा बोली लावणाऱ्याबद्दल कोणताही वाद उद्भवल्यास, लॉट पुन्हा लिलावासाठी ठेवला जाईल किंवा रद्द केला जाईल.
१२) सर्वोच्च बोली लावणाऱ्याला कोणत्याही लॉटचा खरेदीदार म्हणून घोषित केला जाईल. जर तो/ती/ते कायदेशीररित्या बोली लावण्यासाठी पात्र असतील, आणि पुढे त्याला/तिने/त्याच्याकडून बोलीची रक्कम राखीव किंमतीपेक्षा कमी नसेल तर ती प्रदान केली जाईल. जेव्हा देऊ केलेली किंमत इतकी स्पष्टपणे अपुरी दिसते की, असे करणे अयोग्य होईल तेव्हा सर्वोच्च बोलीची स्वीकृती नाकारणे हे अधोस्वाक्षरीच्या विवेकबुध्दीनुसार असेल.
१३) प्रत्येक इच्छुक बोलीदाराने खात्यात डिमांड ड्राफ्ट/ बँकर चेक/पेऑर्डरद्वारे **रिकवरी ऑफीसर, कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (DRT3) आर.ओ./ कोर्ट ऑक्शनरकडे जमा करणे आवश्यक आहे.** किंवा **RTGS/NEFT व्दारे थेट यूनियन बँक ऑफ इंडिया खाते क्र. ०६२७११०१०००००१९५ मध्ये IFSC कोड क्र. UBIN ०८०६२७७ असलेले बँक ऑफ इंडिया** नाव आणि पॅन कार्ड पत्त्याचा पुरावा आणि ओळखीचा पुरावा, इ. प्रतिसह मालमत्तेचा तपशील, मेल आयडी, मोबाईल क्र. आणि कंपनीच्या बाबतीत किंवा इतर कोणत्याही दस्तऐवजाच्या बाबतीत, कंपनीचे प्रतिनिधित्व / मुखत्यार आणि अशा ठेवीची पावती / काऊंटर फॉईल ची पुष्टी करणे. त्यानंतर जमा केलेला EMD लिलावात सहभागी होण्यासाठी पात्र मानला जाणार नाही.
१४) म्हटलेल्या DD/pay आदेश किंवा RTGS/NEFT द्वारे मूळ पेमेंट पुरावा, स्वतःच्या प्रमाणपत्र सह ओळख (मतदान कार्ड, I-card/ ड्रायव्हिंग परवाना/पासपोर्ट) ज्यामध्ये पत्ता असणे आवश्यक आहे भविष्यातील संप्रेषणासाठी, आणि PAN कार्डची स्वतःच्या प्रमाणित प्रत **पुनर्प्राप्ती अधिकारी, DRT-III, मुंबईच्या** कार्यालयात पोचले पाहिजे. **२५/११/२०२६ पूर्वी ४:३० PM पर्यंत.** EMD किंवा प्रमाणित EMD प्राप्त केलेली तत्पश्चात विचार केला जाणार नाही.
१५) इच्छुक बोलीदारांना असा सल्ला दिला जातो की त्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी आणि मालमत्तेवरील मालकी हक्क व त्यावरील काही बोजा असल्यास, त्याबद्दल स्वतःची खात्री करून घ्यावी.

| अ. क्र. | मिळकतीचे वर्णन | EMD Amount (In Rs.) | Reserve Price (In Rs.) | Bid Increase in the multiple of (in Rs.) |
|---|---|---|---|---|
| | **रक्कम जमा EMD, राखीव किंमत आणि बोली वाढ, खालीलप्रमाणे** | | | |
| 1 | **मौजे जऊळके, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक – ४२२२०७ येथे, मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गालगत, अनुसया वेअरहाऊसजवळ स्थित, प्लॉट क्रमांक ४, गट क्रमांक १८५ मधील एकूण २२५ चौ. मीटर क्षेत्रफळाची संपूर्ण जमीन, त्यावरील १६० चौ. मीटर बांधकाम क्षेत्रफळाची इमारत (बिल्ट-अप एरिया) तसेच त्यामध्ये समाविष्ट असलेल्या यंत्रसामग्रीसह.** | 1,65,800/- | 16,58,000/- | 25,000/- |

१६) देय तारखेनंतर आणि वेळे नंतर मिळालेला EMD नाकारला जाईल आणि EMD साठी भरलेली रक्कम त्यांना ई-लिलाव फॉर्ममध्ये दिलेल्या पर्यायाव्दारे परत केली जाईल. बोली प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे समक्ष अधिकाऱ्याने जारी केलेले वैध डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. बिडींगमध्ये सहभागी होण्यासाठी तो / तिला डिजिटल स्वाक्षरीचे प्रमाणपत्र, सक्रिय ईमेल आयडी आणि इंटरनेट कनेक्शनसह संगणक टर्मिनल / सिस्टम मिळवणे ही बोलीदाराची एकमात्र जबाबदारी आहे. ऑनलाईन बिडींग दरम्यान डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र आणि कनेक्टीविटीशी संबंधित कोणतीही समस्या ही केवळ बोलीदाराची जबाबदारी असेल आणि या संदर्भात कोणत्याही दाव्याची दखल घेतली जाणार नाही.
१७) लिलावाच्या दिलेल्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांच्या आत बोली वाढवल्यास, लिलावाची वेळ आणखी ५ मिनिटांच्या अतिरिक्त वेळेने वाढविली जाते जेणेकरुन इतर बोलीदारांना त्यांच्या बीडमध्ये वाढ करता येईल आणि आणखी वाढ न झाल्यास लिलाव प्रक्रिया समाप्त होईल. ५ मिनिटांच्या विस्तारित वेळेत केले जातात. जंगम मालमत्तेच्या बाबतीत, प्रत्येक लॉटची किंमत विक्रीच्या वेळी किंवा विक्री धारण करणाऱ्या अधिकाऱ्याने निर्देश दिल्यानंतर लगेचच अदा केली जाईल आणि पैसे न भरल्यास, मालमत्ता पुन्हा विक्रीसाठी पुन्हा लिलावासाठी ठेवली जाईल.
१८) वर नमूद केलेल्या तपशीलानुसार यशस्वी बोलीदाराला EMD चे समायोजन दुसऱ्या दिवशी नॉकडाउन झाल्यानंतर विक्रीच्या रकमेपैकी २५% रक्कम या खात्यात/डिमांड ड्राफ्ट/बँकर चेक/पे ऑर्डर मध्ये भरावी लागेल. जर दुसऱ्या दिवशी सुट्टी किंवा रविवार असेल तर ऑफीसच्या पहिल्या दिवशी.
१९) खरेदीदाराने मालमत्तेच्या विक्रीच्या तारखेपासून १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी शिल्लक ७५% रक्कम जमा करावी, अशा दिवसाशिवाय किंवा १५ दिवस किंवा रविवार किंवा इतर सुट्टीचा असेल तर, नंतर पहिल्या कार्यालयीन दिवशी. १५ व्या दिवशी वर सांगितल्याप्रमाणे विहित पध्दतीने. वरील व्यतिरिक्त खरेदीदाराने **रिकवरी ऑफीसर कर्ज वसूली न्यायाधिकरण मुंबई (DRT3) यांच्याकडे पाउंडेज फी देखील जमा करावी लागेल @२% पर्यंत आणि रु. १०००/- च्या जास्त रकमेच्या @१% डीडीव्दारे रजिस्ट्रार, कर्ज वसूली न्यायाधिकरण मुंबई (DRT3) यांच्या नांवे.**
२०) विहित कालावधीत देय न दिल्यास, ठेव, विक्रीच्या खर्चाची चुकती केल्यानंतर, खाली स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीला योग्य वाटल्यास, सरकारकडे जप्त केली जाईल आणि चूक करणाऱ्या खरेदीदाराने मालमत्तेवरील किंवा कोणत्याही वरील सर्व दावे जप्त केले जातील. ज्या रकमेसाठी ती नंतर विकली जाऊ शकते त्याचा काही भाग मालमत्तेची विक्री नव्याने जाहीर झाल्यानंतर पुन्हा केली जाईल.
२१) जोपर्यंत **वसूली अधिकारी, कर्ज वसूली न्यायाधिकरण मुंबई (DRT3)** व्दारे विक्रीची पुष्टी होत नाही तोपर्यंत सर्वोच्च बोली लावणाऱ्याचा मालमत्तेवर कोणताही अधिकार / हक्क असणार नाही.
२२) अयशस्वी बोलीदारानी जमा केलेली EMD ची रक्कम ऑनलाईन पध्दतीने जमा केल्यास ऑनलाईन पध्दतीने परत केली जाईल. जर EMD खात्यात / डिमांड ड्राफ्ट / बँक चेक / पे ऑर्डर च्या स्वरुपात जमा केला असेल तर तो हाताने परत केला जाईल. ई-ऑक्शन EMD फॉर्म सोबत पाठवलेल्या फोटोकॉपीचा मुळ आयडी पुरावा आणावा लागेल. EMD रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
२३) ई-लिलाव EMD फॉर्ममध्ये नमूद केलेल्या नावाव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीच्या (चे) नावाच्या विक्री प्रमाणपत्रामध्ये समावेश/ बदलण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.
२४) विक्रीसाठी आणलेल्या मालमत्तेच्या एकापेक्षा जास्त वस्तूंच्या बाबतीत, अशा मालमत्तेची विक्री सोयीनुसार केली जाईल आणि विक्री नोटीसमध्ये नमूद केल्याप्रमाणे क्रमाणे जाणे बंधनकारक नाही.
२५) NRI बोलीदाराने त्यांच्या पासपोर्टच्या फोटो पृष्ठाची एक प्रत जोडणे आवश्यक आहे आणि भारतीय मिशन (दूतावास) व्दारे त्यांच्या बोलीला रितसर मान्यता दिली पाहिजे. जंगम मालमत्ता 'जशी कुठे आहे आणि कशाच्या आधारावर आहे' यावर विकली जात आहे आणि नियमानुसार प्रकाशन शुल्क, महसूल आणि इतर बोजा यांच्या अधीन आहे. अवाजवी आढळल्यास कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा कोणतेही कारण न देता लिलाव कधीही पुढे ढकलण्याचा अधिकार अधोस्वाक्षरीने राखुन ठेवला आहे. या विक्रीच्या घोषणेचा तपशील **www.drt.gov.in** या वेबसाईटवर पाहता येईल.

**मिळकतीचे वर्णन**

| लॉट नं. | मिळकतीचे वर्णन | महसूल लॉट विकल्या जाणाऱ्या मालमत्तेचे वर्णन | मालमत्ता किंवा तिचा भाग ज्यावर मालमत्ता देय आहे अशा दायित्वाचे तपशील | मालमत्तेवर मांडण्यात आलेले दावे आणि त्याच्या स्वरूपावर आणि मूल्यावर इतर कोणतेही ज्ञात परिणाम |
|---|---|---|---|---|
| 1 | **मौजे जऊळके, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक – ४२२२०७ येथे, मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गालगत, अनुसया वेअरहाऊस जवळ स्थित, प्लॉट क्रमांक ४, गट क्रमांक १८५ मधील एकूण २२५ चौ. मीटर क्षेत्रफळाची संपूर्ण जमीन, त्यावरील १६० चौ. मीटर बांधकाम क्षेत्रफळाची इमारत (बिल्ट-अप एरिया) तसेच त्यामध्ये समाविष्ट असलेल्या यंत्रसामग्रीसह.** | माहित नाही | माहित नाही | माहित नाही |

**टिप- लिलाव दिनांक २७/११/२०२६, थकबाकी रक्कम रु.२,८८,४४,०८५.०८/- (अंदाजे)** वरील नमुद केलेल्या मिळकती प्रमाणे **तपासणी दिनांक २३/११/२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० पर्यंत. बीडस मिळाल्याची शेवटची दिनांक २५/११/२०२६ दुपारी ४.३० पर्यंत.**
**दिनांक २३/१०/२०२६ रोजी शिक्क्यानिशी मी माझ्या हाती दिले.**

**(सही/- (मुकेश चंद मीना)**
**वसुली अधिकारी-I,**
**कर्ज वसुली प्राधिकरण, मुंबई (DRT3)**

(टिप : स्वैर भाषांतर तफावत असल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य.)

# सरकारी रोख्यांच्या उत्पन्नात वाढ होणार

**मुंबई :** रिझर्व्ह बँकेच्या ऑक्टोबर महिन्यातील पतधोरण पुनरावलोकनानंतर सरकारी रोख्यांच्या उत्पन्नात झालेल्या तीव्र वाढीमुळे सरकारच्या कर्जाचा खर्च वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे व्याजाच्या खर्चावर ताण पडून देशाच्या आर्थिक लवचिकतेला कात्री बसू शकते, अशी भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

पीटीआयने संकलित केलेल्या आकडेवारीनुसार, १० वर्षांच्या बेंचमार्क सरकारी रोख्यांचे उत्पन्न ६ ऑक्टोबर रोजी ७.१९ टक्के होते. ते २३ ऑक्टोबर रोजी वाढून ७.४७ टक्क्यांवर पोहोचले.

वाढलेले कच्च्या तेलाचे दर, जागतिक रोख्यांच्या उत्पन्नातील उसळी, भारतीय बँकिंग व्यवस्थेतील रोख्यांची घट्ट स्थिती आणि आरबीआयद्वारे आणखी व्याजदर वाढवण्याच्या शक्यतेमुळे हे उत्पन्न वाढल्याचे बाजारतज्ज्ञांनी सांगितले.

आरबीआयचा मोजक्याच नियंत्रणाकडे झालेला बदल, डिसेंबरमध्ये आणखी मोठी व्याजदर वाढ होण्याची शक्यता, सतत उच्च पातळीवर असलेले कच्च्या तेलाचे दर आणि जागतिक रोख्यांच्या उत्पन्नातील तीव्र उसळी यांमुळे ही वाढ झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रॉकफोर्ट फिनकॅप एलएलपी या वित्तसंस्थेचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय भागीदार वेंकटकृष्णन श्रीनिवासन यांनी सांगितले की, रोख्यांच्या उत्पन्नातील ही वाढ घट्ट तरलता, जागतिक उत्पन्नाचा ताण आणि वाढलेले ब्रेंट क्रूडचे दर दर्शवते.

डिसेंबरच्या एमपीसी बैठकीत शक्य असलेल्या व्याजदर वाढीचा अंदाज कदाचित आताच बाँड बाजाराने गृहीत धरला असावा, असे सांगत त्यांनी रोख्यांच्या उत्पन्नाची पुढील दिशा कच्च्या तेलाचे दर, महागाई, आरबीआयच्या पुढील पावलांवर अवलंबून असेल, असे नमूद केले.



## सरकारच्या व्याजाचा भार वाढणार; आर्थिक लवचिकतेला कात्री बसणार

### आर्थिक परिणाम आणि आव्हाने

**वाढता कर्जाचा भार :** सरकारी रोख्यांचे उच्च उत्पन्न म्हणजे नवीन कर्जांसाठी अधिक व्याजदर. यामुळे रोख्यांचे हे उच्च स्तर कायम राहिल्यास सरकारचा व्याजापोटी जाणारा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढू शकतो.

**आर्थिक लवचिकता कमी होणे :** जेव्हा सरकार बाजारातून कर्ज घेऊन वित्तीय तूट भागवत असते, अशा वेळी व्याजापोटी जास्त पैसे खर्च झाल्यामुळे इतर विकासकामांच्या खर्चासाठी सरकारकडे असणारा निधी मर्यादित होतो.

**महागाई आणि रुपयावर ताण :** भारत आपल्या तेल गरजेच्या जवळपास ९०% भागासाठी आयातीवर अवलंबून असल्याने जागतिक स्तरावर कच्च्या तेलाचे दर वाढल्यास देशांतर्गत महागाई भडकणे, रुपयावर दबाव येणे आणि सरकारी तिजोरीवर ताण पडणे अपरिहार्य ठरते.

> रोख्यांचे उत्पन्न उच्च पातळीवरच राहिले, तर वित्तीय तूट भरून काढण्याचा खर्च वाढेल, ज्यामुळे व्याजाचा खर्च आणि आर्थिक लवचिकतेवर अतिरिक्त ताण येईल. ऑक्टोबरच्या धोरणानंतर सरकारी रोख्यांच्या उत्पन्नात झालेली ३० बेसिस पॉइंट्सची वाढ ही मागील वर्षाच्या तुलनेत या आर्थिक वर्षात सरकारच्या अतिरिक्त कर्जाच्या खर्चात लक्षणीय भर पाडत आहे.
>
> **- व्ही. रामचंद्र रेड्डी,**
> **ट्रेझरी हेड, करूर वैश्य बँक**

## निवडक

### स्विगीचे मल्टी रेस्टॉरंट ऑर्डरिंग फिचर

**मुंबई :** स्विगीने त्यांच्या ॲपवर मल्टी रेस्टॉरंट ऑर्डरिंग फिचर सुरू करण्याची घोषणा केली. युझर्सना कोणत्याही तडजोडीशिवाय त्यांना जे खायला आवडते ते ऑर्डर करता यावे हे सुनिश्चित करण्यासाठी मल्टी रेस्टॉरंट ऑर्डरिंग डिझाइन केले आहे. फीचर ५ रेस्टॉरंटमधून पदार्थ, डिशेस, आवडीचे अन्नपदार्थ एकाच वेळी ऑर्डर देण्याची सुविधा देते.

### बिर्ला इस्टेट्सचा पुण्यातील पोर्टफोलिओचा विस्तार

**मुंबई :** आदित्य बिर्ला ग्रुपचा भाग आणि आदित्य बिर्ला रिअल इस्टेटच्या पूर्ण मालकीच्या बिर्ला इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेड या उपकंपनीने हिंजवडी येथे जॉइंट डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट (जेडीए)च्या माध्यमातून हाती घेतलेल्या नवीन प्रकल्पाची घोषणा केली. या प्रकल्पातून अंदाजे १,६५० कोटी रुपयांची एकूण महसूल क्षमता आहे.

### वी-ट्रान्सचा गुजरातमध्ये वेगवान विस्तार

**मुंबई :** वी-ट्रान्स ग्रुप गुजरातमध्ये उपस्थिती नेटवर्क विस्तार, इन्फ्रास्ट्रक्चर आणि टेक्नॉलॉजीमध्ये धोरणात्मक गुंतवणुकीद्वारे मजबूत करत आहे. नेटवर्क विस्तार, इन्फ्रास्ट्रक्चर, टेक्नॉलॉजीमध्ये धोरणात्मक गुंतवणुकीद्वारे केले जात आहे. राज्यभरातील ९६.४% पिन कोड कव्हरेजसह ग्रुप ही योजना आखत आहे.

### इंडियन बँकेच्या व्याजदरात वाढ

**मुंबई :** इंडियन बँकेने विशेष ठेवीं योजना 'इंड ग्रो' (५५५ दिवस) आणि 'इंड प्रॉस्पर' (७७७ दिवस) च्या व्याजदरात वाढ केली आहे. सुधारित दर २३ ऑक्टोबरपासून लागू होत आहेत. 'इंड ग्रो' योजनेचा व्याजदर १५ बेसिस पॉइंट वाढवून ६.६५% वरून ६.८०% प्रति वर्ष केला गेला आहे.

### ॲमेझॉन बिझनेसवर भेटवस्तूंच्या डील्समध्ये वाढ

**मुंबई :** ॲमेझॉन बिजनेसने ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल दरम्यान पात्र खरेदीवर १४% पर्यंतच्या अतिरिक्त बल्क सवलतीसह १० हजारांहून अधिक भेटवस्तूंचे पर्याय आणि एमआरपीवर ७५% पर्यंत सूट असणाऱ्या डील्स तयार केल्या आहेत. या दरम्यान श्रेणींमधील डील्स व्यवसायांना कार्यस्थळ अपग्रेड करण्याची संधीदेखील देतात.

### फोनपेवर परवडणारा फायरक्रॅकर इन्शुरन्स

**मुंबई :** फोनपे ने प्लॅटफॉर्मवर सर्वसमावेशक फायरक्रॅकर इन्शुरन्स पुन्हा उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. दिवाळीच्या सणादरम्यान फटाक्यांमुळे होणाऱ्या अपघातांपासून पूर्ण संरक्षण देण्यासाठी, हा विमा ₹११ पासून सुरू होणाऱ्या परवडणाऱ्या निश्चित प्रीमियमवर ₹२५,००० पर्यंतचे व्यापक वैद्यकीय कव्हर प्रदान करतो.

### एअरटेलची यूट्यूबसोबत भागीदारी

**मुंबई :** एअरटेलने प्रीपेड ग्राहकांसाठी यूट्यूब प्रीमियम उपलब्ध करून देण्याकरिता यूट्यूबसोबत भागीदारी केली आहे. या भागीदारीमुळे ग्राहकांना यूट्यूब शॉर्ट्ससह जाहिरातमुक्त यूट्यूबचा अनुभव घेता येणार आहे. त्यासोबत बॅकग्राऊंड प्ले, ऑफलाइन डाउनलोड आणि यूट्यूब म्युझिक प्रीमियमचाही लाभ मिळणार आहे.

### बीपीसीएलतर्फे मुंबईत कार्यशाळा

**मुंबई :** भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने (बीपीसीएल) महाराष्ट्रातील कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) प्रकल्पांना गती देण्यासाठी मुंबईत 'वेस्ट टू वेल्थ – स्केलिंग गोबरधन' कार्यशाळेचे आयोजन केले. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि महाराष्ट्र सरकार यांच्या सहकार्याने आयोजित कार्यशाळेत सीबीजी प्रकल्पांच्या विस्तारासाठी आवश्यक असलेली धोरणात्मक, संस्थात्मक आणि अंमलबजावणीची यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला.

# महागाईत भर

## कच्च्या तेलाच्या दराचा भडका उडणार?

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे पुरवठ्याविषयीची भीती कायम असून, अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेच्या (फेडरल रिझर्व्ह) आगामी धोरणात्मक निर्णयामुळे बाजाराची दिशा ठरण्याची शक्यता आहे. यामुळे कच्च्या तेलाच्या किमती आणखी एक आठवडा अस्थिर राहण्याची शक्यता विश्लेषकांनी वर्तवली आहे.

ब्रेंट क्रूडची किंमत आधीच प्रति बॅरल ११७ डॉलर पार करवून पुढे गेली असल्याने, पुढील वाटचालीचा अंदाज घेण्यासाठी गुंतवणूकदारांचे 'होर्मुझची खाडी' परिसरातील घडामोडी, ऊर्जा पायाभूत सुविधांवरील धोके आणि अमेरिकेच्या साप्ताहिक साठा डेटावर लक्ष असेल.

अमेरिकन पेट्रोलियम इन्स्टिट्यूट आणि यूएस एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशनचे साप्ताहिक साठा अंदाज जाहीर केले जातील. तर कुशिंगमधील कच्च्या तेलाचा साठा आणि फेडरल ओपन मार्केट कमिटीची २७-२८ ऑक्टोबरची बैठक विशेष केंद्रस्थानी असेल, असे त्यांनी सांगितले.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंजवर नोव्हेंबर डिलिव्हरीचे कच्च्या तेलाचे फ्युचर्स, सुट्ट्यांमुळे कमी राहिलेल्या या आठवड्यात ४.३२ टक्क्यांनी वाढून ९,८०० रुपये प्रति बॅरलवर बंद झाले.

### भारतावरील परिणाम

**रुपयावर दबाव :** कच्च्या तेलाच्या आयातीसाठी जास्त किंमत मोजावी लागल्याने भारतीय रुपयावर ताण येऊ शकतो.

**महागाई आणि कॉर्पोरेट मार्जिन :** देशांतर्गत महागाई वाढू शकते आणि कंपन्यांच्या नफ्यावर परिणाम होऊ शकतो.

भारत तेल गरजेच्या जवळपास ९० टक्के भाग आयातीद्वारे पूर्ण करत असल्याने जागतिक स्तरावर क्रूडचे दर वाढणे देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आव्हानात्मक ठरू शकतो.



- **ब्रेंट क्रूडची झेप :** ब्रेंट क्रूड वायदा प्रति बॅरल ११७.३८ डॉलरवर स्थिरावला.
- **डब्ल्यूटीआय क्रूड :** डब्ल्यूटीआय वायदा प्रति बॅरल १०३.२७ डॉलरवर पोहोचला.
- **एमसीएक्समधील वाढ :** नोव्हेंबर डिलिव्हरीसाठी क्रूड ऑइलचे भविष्यकालीन दर ४.३२ टक्क्यांनी वाढून ९,८०० रुपये प्रति बॅरलवर बंद झाले.
- **मुख्य कारणे :** अमेरिका-इराण तणाव, सौदी अरेबियाच्या पायाभूत सुविधांवर हुती हल्ले आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील धोके आहेत.

## आरबीआयचे डेटा सेंटर



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भुवनेश्वर येथील भारतीय रिझर्व्ह बँकेच्या १६९ कोटी रुपयांच्या डेटा सेंटर आणि सायबर सुरक्षा प्रशिक्षण संस्थेचे उद्घाटन रविवारी केले. अर्थमंत्री निर्मला सीतारामन, ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा आदी यावेळी उपस्थित होते.

## ...तर विमान प्रवाशांना जीएसटी परतावा मिळणार

**नवी दिल्ली :** विमान कंपनीने प्रवाशांना विमानभाडे आणि जीएसटी या दोन्ही गोष्टी परत केल्या असतील आणि ते सिद्ध करण्यासाठी त्यांच्याकडे पुरेशी कागदपत्रे असतील, तर विमान तिकीट रद्द केल्यावर भरलेला जीएसटी परतावा म्हणून मिळू शकतो, असा निर्णय जीएसटी अपील न्यायाधिकरणाने दिला आहे.

सिंगापूर एअरलाइन्स लिमिटेड विरुद्ध कोचीचे सी जीएसटी आणि सीई आयुक्त यांच्या प्रकरणावर निर्णय देताना जीएसटी अपील न्यायाधिकरणाच्या एर्नाकुलम खंडपीठाने असे स्पष्ट केले आहे की, तिकीट रद्द केल्याचा परतावा संबंधित प्रवाशांपर्यंत थेट पोहोचल्याची 'पुरेशी कागदपत्रे' उपलब्ध आहेत आणि कराचा भार दुसऱ्या कोणाकडेही ढकलला गेलेला नाही.

## एलपीजी डिस्ट्रीब्युटर संघटनांचा संपाला विरोध

**नवी दिल्ली :** एलपीजी डिस्ट्रीब्युटरच्या दोन प्रमुख महासंघांनी दिल्लीतील प्रस्तावित निदर्शने आणि बेमुदत संपाच्या हाकेला विरोध दर्शवला आहे. कमिशन वाढवणे आणि व्यावसायिक व कार्यप्रणालीतील अडचणी दूर करणे या मागण्यांसाठी संप करण्याऐवजी सरकारी तेल विपणन कंपन्या आणि पेट्रोलियम मंत्रालयाशी चर्चेचा मार्ग पत्करावयास हवा, अशी भूमिका या संघटनांनी घेतली आहे.

## या आठवड्यात बाजारात येणार ५ आयपीओ

### कंपन्यांचा २,६०० कोटी रुपये उभारण्याचा मानस

**मुंबई :** पुढील आठवड्यात ईएएए इंडिया अल्टरनेटिव्ह्ज, एसएफसी एन्व्हायरनमेंटल टेक्नॉलॉजीज आणि एम. के. सन्स फाईन ज्वेल्ससह ५ कंपन्या प्रारंभिक समभाग विक्री सादर करणार आहेत. प्राथमिक बाजारातून २,६०० कोटी रुपये उभारण्याचा या कंपन्यांचा प्रयत्न आहे.

या आठवड्यात बीएलएस पॉलिमर्स आणि बॉम्बे कोटेड अँड स्पेशल स्टील्स हे दोन आयपीओ देखील दाखल होणार आहेत. याशिवाय, मर्चंट बँकरच्या माहितीनुसार, गुजरात व्हिक्ट्री फोर्जिंग, माईलस्टोन गिअर्स, आवाडा इलेक्ट्रो, स्वरा बेबी प्रॉडक्ट्स, इंटेरिस मेडटेक आणि एजीएस हेल्थ यांसारख्या इतर काही कंपन्यांचे आयपीओदेखील




आहेत. आगामी ५ आयपीओ २६ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर दरम्यान सबस्क्रिप्शनसाठी खुले होणार असून यामुळे गुंतवणूकदारांना पर्यायी गुंतवणूक, पॉलिमर्स, स्टील प्रक्रिया, सांडपाणी प्रक्रिया आणि दागिने किरकोळ विक्री यांसारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्याची संधी मिळेल. व्यवसायाचा विस्तार, खेळते भांडवल गरजा आणि कर्जफेडीसाठी निधी उभारण्याच्या उद्देशाने कंपन्या गुंतवणूकदारांच्या मागणीला प्रतिसाद देत आहेत.

## जिओ प्लॅटफॉर्म्सचे शेअर बाजारात पदार्पण होणार

**मुंबई :** त्रैमासिक निकाल, अमेरिकेच्या फेडरल बँकेचा व्याजदर निर्णय, कच्च्या तेलाच्या किमतीतील हालचाली आणि पश्चिम आशियातील (मध्य पूर्व) वाढता तणाव हे या आठवड्यात शेअर बाजाराला चालना देणारे मुख्य घटक असतील, असे विश्लेषकांनी म्हटले आहे.

याशिवाय, जिओ प्लॅटफॉर्म्सचे बाजारातील पदार्पण, परदेशी गुंतवणूकदारांच्या व्यवहारांचे प्रमाण आणि जागतिक संकेत देखील गुंतवणूकदारांची भावना ठरवतील, असे त्यांनी म्हटले आहे.

जिओ प्लॅटफॉर्म्सचे शेअर्स २८ ऑक्टोबर रोजी स्टॉक एक्स्चेंजवर पदार्पण करणार आहेत आणि प्राथमिक बाजारासाठी हा एक महत्त्वाचा भावनिक टप्पा ठरेल.

## कंपन्यांच्या विवरणपत्राला मुदतवाढ

**नवी दिल्ली :** कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने कंपन्यांसाठी आर्थिक वर्ष २०२५-२६ चे वार्षिक वित्तीय विवरणे दाखल करण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत वाढवली आहे. विवरणपत्रे ३१ जानेवारी २०२७ पर्यंत सादर करता येणार आहेत, असे एका परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. एमसीए २१ पोर्टलवर कागदपत्रे सादर करताना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत होता.

## तेल कंपन्यांची पेट्रोल पंपांवर ग्राहक विश्वासाची चाचणी

**नवी दिल्ली :** पेट्रोल पंपांवरील स्वच्छ शौचालये ही केवळ एक सामान्य सुविधा वाटू शकते, परंतु सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्या या सुविधेला ग्राहक सेवेचा एक महत्त्वाचा निकष बनवत आहेत. यासाठी वरिष्ठ अधिकारी स्वतः देशातील वेगवेगळ्या पेट्रोल पंपांवरील शौचालयांची पाहणी करत असून, प्रवाशांना त्यांच्या अनुभवाविषयी अभिप्राय देण्यासाठी 'क्यूआर कोड'ची व्यवस्था करण्यात आली आहे.

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयाच्या 'स्वच्छता अभियानांतर्गत', सरकारी तेल कंपन्या किरकोळ इंधन केंद्रांवरील शौचालयांची स्वच्छता आणि देखभालीची मोहीम तीव्र करत आहेत.

## सोने-चांदीच्या दरांचे आव्हान

**मुंबई :** वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींमुळे महागाईची चिंता बळावली असून, अमेरिकेच्या फेडरल बँकेच्या धोरणात्मक निर्णयामुळे सोने, चांदीच्या किमती स्थिर राहणार की त्यांची घसरण विस्तारणार हे ठरेल. पुढील आठवड्यात या दोन्ही मौल्यवान धातूंना नवीन आव्हानांचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे, असे विश्लेषकांनी म्हटले आहे.



उच्च बाँड यील्ड आणि मजबूत डॉलरमुळे दबावाखाली असलेल्या या मौल्यवान धातूंना, फेडरल रिझर्व्हच्या २७-२८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या बैठकीतून व्याजदर दीर्घकाळ उच्च पातळीवर राहणार का, याचे संकेत मिळण्याची प्रतीक्षा आहे.

याशिवाय, युरोपियन सेंट्रल बँक आणि जपानच्या मध्यवर्ती बँकेचे धोरणात्मक निर्णय, अमेरिकेच्या ड्युरेबल गुड्स ऑर्डर्स (दीडटिकाऊ वस्तूंच्या ऑर्डर्स), ग्राहक आत्मविश्वास, वैयक्तिक उपभोग खर्च महागाई आणि तिसऱ्या तिमाहीच्या जीडीपी आकडेवारीवरही लक्ष असेल. युरोझोनमधील महागाईचे आकडे, अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकांशी संबंधित घडामोडी, रशिया-युक्रेन शांतता चर्चा आणि पश्चिम आशियातील (मध्य पूर्व) संघर्ष देखील रडारवर राहतील.

**वाढती जागतिक मागणी, प्रतिस्पर्ध्यांपेक्षा कमी दर**

# भारतीय तांदळाच्या निर्यातीत मोठी वाढ होणार - आयआरईएफ

**नवी दिल्ली :** चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत भारताच्या तांदळाच्या निर्यातीत मूल्यानुसार १३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच वाढत्या जागतिक मागणीची पूर्तता करण्यासाठी देशात अतिरिक्त साठा उपलब्ध असल्यामुळे तांदळाच्या निर्यातीचे भविष्य उज्ज्वल असल्याचे उद्योग संघटना 'आयआरईएफ'ने म्हटले आहे.

'पीटीआय'ला दिलेल्या मुलाखतीत, इंडियन राईस एक्सपोर्टर्स फेडरेशनचे (आयआरईएफ) उपाध्यक्ष देव गर्ग यांनी सांगितले की, भारतीय तांदळाची किंमत प्रतिस्पर्धी देशांच्या तुलनेत किमान १० टक्क्यांनी कमी आहे.

सरकारी आकडेवारीनुसार, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत भारताची तांदूळ निर्यात १३ टक्क्यांनी वाढून ५४,९३७.७१ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. जूनमध्ये संपलेल्या २०२५-२६ च्या पीक वर्षात भारताने १५४ दशलक्ष मेट्रिक टनांहून अधिक तांदळाचे उत्पादन घेतले आहे.

सर्वात कमी दर आणि वाढती जागतिक मागणी यामुळे भारताची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढण्यासाठी अनुकूल स्थिती आहे. त्यामुळे या वर्षी व्यवसायाचे फंडामेंटल्स अधिक मजबूत आहेत आणि साहजिकच निर्यातीचे प्रमाण वाढेल, असे ते 'आयआरईएफ'तर्फे २३-२५ ऑक्टोबर दरम्यान आयोजित 'भारत आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषद २०२६' प्रसंगी ते म्हणाले.

गर्ग म्हणाले, गेल्या वर्षी आमची निर्यात सुमारे २२ दशलक्ष टन होती आणि युएसडीएने यावर्षी ती २४ दशलक्ष टन राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. मला पूर्ण खात्री आहे की आपण २४ दशलक्ष टनांच्या या टप्प्यालाही मागे टाकू.

मागील आर्थिक वर्षात देशाने १,१२,००० कोटी रुपयांच्या तांदळाची निर्यात केली होती, ज्यामध्ये बासमती आणि बिगर-बासमती तांदळाचे योगदान जवळपास सारखेच होते, असे त्यांनी नमूद केले.

**समोरील आव्हाने आणि उद्योग क्षेत्राची मागणी**

उद्योग क्षेत्रापुढील आव्हानांबद्दल विचारले असता, गर्ग म्हणाले, इराणमधील संकट हे एक मोठे आव्हान आहे, कारण आपण आपल्या एकूण बासमती निर्यातीपैकी ७४ टक्क्यांहून अधिक निर्यात मध्यपूर्वेकडे करतो.

युद्ध होते तेव्हा तांदूळची मागणी वाढते. त्यामुळे मागणी वाढली आणि लोक जास्त पैसे द्यायला तयार होते. परंतु, जर हे युद्ध दीर्घकाळ चालले. तर खरेदीदार किती काळ इतक्या मोठ्या किंमती मोजून ही खरेदी पातळी कायम ठेवू शकतील, याबद्दल शंका आहे. त्यामुळे हा एक मोठा धोका उद्योग क्षेत्रासमोर आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, तांदळाशी संबंधित धोरणांमध्ये होणारा कोणताही बदल धोक्याची घंटा ठरू शक्य असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

सध्या तांदळावर कोणतेही निर्बंध नाहीत. कोणतीही निर्यात शुल्क नाही, किमान निर्यात मूल्य नाही आणि निर्यातीवर कोणतीही बंदी नाही. सरकारने आपले सध्याचे हे धोरण सुरूच ठेवावे, अशी मागणी त्यांनी फेडरेशनतर्फे केली.

> भारतीय तांदळाचे दर सध्या नीचांकी पातळीवर आहेत. आमचे निर्यातीचे दर बाजारात उपलब्ध असलेल्या इतर पर्यायांच्या (उदा. थायलंड किंवा म्यानमार) तुलनेत जवळपास १० टक्क्यांनी सस्ते आहेत. 'एल निनो'च्या धोक्यामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता असल्याने जागतिक मागणी देखील वाढेल.
>
> **- देव गर्ग, उपाध्यक्ष,**
> **आयआरईएफ**




### भारत आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषद २०२६

'भारत आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषद' या तीन दिवसीय कार्यक्रमात १५० हून अधिक देशांमधील सहभागींनी हजेरी लावली आहे.

आयआरईएफ परिषदेत जगभरातील २०० हून अधिक तांदळाच्या जातींचे प्रदर्शन करत आहे. तसेच विविध मूल्यवर्धित धान उत्पादनांचे प्रदर्शनदेखील यामध्ये मांडण्यात आले आहे.

परिषदेमुळे भारतीय निर्यातदारांना मोठ्या प्रमाणावर नवीन निर्यात ऑर्डर्स मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.




# दरोडेखोर एआय

**आपण मोठ्या विश्वासाने बँकेत पैसे ठेवतो. आपले पैसे तेथे सुरक्षित राहतील, असा समज सर्वसामान्य माणसाचा असतो. पण, अमेरिकेत 'अवैध एआय एजंट'नी बँकांमध्ये घातलेला धुमाकूळ पाहता आपले पैसे सुरक्षित आहेत का? असा प्रश्न बँक खातेदारांना पडल्याशिवाय राहणार नाही. कारण जे अमेरिकेत घडते, ते पुढे जगात घडते. भारतीय वित्तसंस्था या 'एआय'चे आव्हान पेलायला सक्षम नसल्यास बँकांवर 'एआय'चे दरोडे पडू लागतील.**

संतोष तळाशीलकर
अर्थविश्व

सध्याचे युग सातत्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे. २० व्या शतकाच्या शेवटाला आणि २१ व्या शतकाची पहिली २० वर्षे ही माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राची राहिली. या काळात मोठ्या प्रमाणावर माहिती-तंत्रज्ञानाचा विस्तार झाला. त्यातून सायबर गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर फोफावली. हजारो किमीवरून तुमचे आमचे बँक खाते रिकामे होऊ लागले आहे. तुम्हाला गिफ्ट लागले आहे? तुमच्या मोबाईलवर आलेला ओटीपी सांगा? तुम्ही वीज बील भरले नाही? तुम्ही गॅस बिल भरले नाही? मी जी फाईल पाठवतो, ती क्लिक करून माहिती भरा. यातून हजारो जणांना गंडवले जाते. चोर अदृश्य असल्याने त्याचा माग काढणे, त्याला जेरबंद करणे अतिशय कठीण बनते. या सायबर गुन्हेगारीला आळा घालणे आपल्याला अद्यापि शक्य झालेले नसतानाच आता 'एआय'चे मोठे आव्हान आपल्यासमोर उभे ठाकले आहे.

तंत्रज्ञानात सातत्याने सुधारणा होत असतात. त्यातूनच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) जन्माला आली. आता 'एआय'ने प्रत्येक क्षेत्र पादाक्रांत करायला सुरुवात केली आहे. आता या क्षेत्राचा धसका प्रत्येक क्षेत्राने घ्यायला सुरुवात केली आहे. कारण 'एआय'च्या मदतीने अनेक कठीण कामे सहजसोपी झाली आहेत. पण, बँकिंग क्षेत्रातील 'एआय'चा वापर हा सर्वसामान्य खातेदारांचा थरकाप उडवणारा आहे. कारण अमेरिकेतील 'एआय' एजंटनी मोठमोठ्या बँकांमध्ये घुसून खातेदारांच्या खासगी माहितीला मोठे भगदाड पाडले आहे.

चेक भरणे, पासबुक अपटेड करणे, एफडी करणे, चेक तयार करणे, स्टेटमेंट काढणे, निधी हस्तांतरण आदी विविध कामांसाठी बँकेत जावे लागते किंवा तुम्ही बँकेच्या ॲप व वेबसाइटवरून कामे ही कामे करू शकता. आता तंत्रज्ञान प्रगत झाल्याने बँकेच्या वतीने प्रतिनिधी म्हणून 'एआय एजंट' ही कामे करतो. अमेरिकेतील बँकांमध्ये ही दैनंदिन कामे करायला अधिकृतपणे 'एआय एजंट'ना परवानगी दिली आहे. हे 'एआय एजंट' आपल्या खातेदाराच्या वतीने बँकेत व्यवहार करतात. यात खातेदाराचे दैनंदिन व्यवहार, खातेदाराचे आर्थिक तपशील आदींचा समावेश असतो. पण, जगातील बड्या बँक खात्यात अवैध 'एआय एजंट'नी घुसखोरी केली आहे. यामुळे मात्र, अधिकृत आणि ग्राहकाने निर्देशित केलेल्या व्यवहारांमध्ये आणि संभाव्य अनधिकृत एजंटांकडून केल्या जाणाऱ्या व्यवहारांमध्ये फरक ओळखताना बँकांना अडचणी येत आहेत. ग्राहकांच्या पैशांच्या सुरक्षिततेबाबत चिंता निर्माण होत आहे. ही चिंता केवळ आर्थिक माहितीच्या उपलब्धतेपुरती मर्यादित नाही. खरेदी करण्याची किंवा पैशांचे हस्तांतरण करण्याची परवानगी असलेल्या एआय एजंट्सकडून अशी कृती घडू शकते, ज्याचे ग्राहकांवर थेट आर्थिक परिणाम होऊ शकतात, अशी भीती बँकिंग क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटत आहे. कारण खातेदाराच्या विनंत्या पूर्ण करण्यासाठी किंवा कामे पार पाडण्यासाठी प्रोग्राम केलेले एआय एजंट्स ग्राहक सेवा केंद्रांशी संपर्क साधतात किंवा खातेदाराच्या सूचनांपासून स्वतंत्रपणे कृती करत असल्याचे दिसून येते, अशा घटनाही बँकांनी नोंदवल्याचे दिसून आले. अमेरिकेत ही परिस्थिती असेल तर भारतात भविष्यात काय होईल याची चिंता वाटण्यासारखीच परिस्थिती आहे.

जगातील सर्वात मोठ्या बँकांमध्ये मॉर्गन स्टॅनले, बँक ऑफ अमेरिका, जे पी मॉर्गन चेस, वेल्स फार्गो, सिटी बँक आदींचा समावेश होतो. या सर्व बँकांना 'अवैध एआय एजंट'मुळे धडकी भरली आहे. त्यामुळेच या बँकांनी आता 'अवैध एआय एजंट'ना बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

मानवी ग्राहक व 'एआय एजंट' यांच्या व्यवहारामुळे होणाऱ्या गोंधळाचा फटका भविष्यात बँकांना बसू शकतो, त्यामुळे त्या सावध झाल्या आहेत. कारण एखाद्या ग्राहकाचे 'एआय'मुळे नुकसान झाल्यास त्याने न्यायालयाचा दरवाजा ठोठावल्यास बँकांना मोठी नुकसानभरपाई द्यावी लागू शकते.

**बँकांची भक्कम तटबंदी**

भविष्यातील अडचणी लक्षात घेऊन बँकांनी अवैध 'एआय एजंट'ना बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या बँकांनी आपली सुरक्षा तटबंदी अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न चालवला आहे. भविष्यातील जोखीम लक्षात घेऊन बँकांनी त्यांच्या सेवेच्या अटी-शर्तींमध्ये सुधारणा केल्या आहेत. बँकांनी आता 'एआय एजंट'कडून होणाऱ्या सर्व व्यवहारांवर बारीक लक्ष ठेवायला सुरुवात केली आहे. मॉर्गन स्टॅनलेसारख्या बड्या बँकेने 'अवैध एआय एजंट'ना आपली वेबसाइट वापरायला बंदी घातली आहे. सध्याची परिस्थिती पूर्णपणे चिंताजनक आहे. कारण हे 'एआय एजंट' ग्राहकांच्या खात्यातील पैशाला धोका पोहचवू शकतात, अशी भीती मॉर्गन स्टॅनलेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

तर 'जे पी मॉर्गन चेस' या बँकेने आपल्या खातेदारांना आपला 'यूजरनेम व पासवर्ड' कोणाला देऊ नये, असे आवाहन केले आहे.

वाढत्या 'एआय' तंत्रज्ञानाचे मोठे आव्हान आता बँकिंग क्षेत्राला जाणवू लागले आहे. 'एआय'कडून रिअल टाइम घोटाळ्याला पायबंद घालणे हे वित्तसंस्थांसमोरील मोठे अडचणीचे बनले आहे. एखादा 'एआय एजंट' गैरव्यवहार करताना आढळल्यास ते बँक खाते तत्काळ सुरक्षित कसे करता येईल, अशी यंत्रणा उभारण्याचे काम बँका करत आहेत.

## भारतातही 'एआय एजंट' यंत्रणा लवकरच

अमेरिकेत 'एआय एजंट' यंत्रणा विकसित झाली असून भारतातही 'एआय एजंट' युग लवकरच सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत. 'एआय'मार्फत पैसे हाताळण्यास सुरुवात भारत व अमेरिकेत सुरुवात झाली आहे. भारतात 'एनपीसीआय'च्या मदतीने रेझोरेपेने 'एजेंटिक यूपीआय कॉमर्स' हे ओपन एआय चॅटजीपीटी अँथ्रोपिक क्लाऊडच्या सहाय्याने तयार केले. वापरकर्ते आता 'एआय'च्या मदतीने आपली ऑर्डर देऊ शकतात. झोमॅटो, स्वीगी, झेप्टो या ऑनलाइन व्यासपीठावरून केवळ यूपीआय पिन टाकून व्यवहार पूर्ण करता येणार आहे. यामुळे भविष्यात आता भारतातही 'एआय एजंट'चे युग अवतरेल. पण, भारताला सुरक्षेचे भानही ठेवावे लागणार आहे.

---

डॉ. विनायक म. गोविलकर
(सी.ए.)
विशेष

**कृषिप्रधान भारताने गेल्या दीड दशकात औद्योगिक क्षेत्रात भरारी घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी विविध योजना आणल्या, निधी उपलब्ध करून दिला, देशांतर्गत उत्पादन वाढावे म्हणून बरेच काही केले. मेक इन इंडिया ही त्यातील ठळक बाब होय. त्या चळवळीला आता १२ वर्षे झाली. भारताने असेंब्ली आणि मॅन्युफॅक्चरिंगच्या पुढे जाऊन इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी, आर अँड डी आणि कोअर टेक्नॉलॉजीमध्ये आपली ताकद निर्माण करणे आवश्यक आहे. मेक इन इंडियाचा पुढील दशकाचा हाच मंत्र असायला हवा.**







# 'मेक इन इंडिया'कडून आता 'डेव्हलप इन इंडिया'

मेक इन इंडिया ही योजना २५ सप्टेंबर २०१४ रोजी सुरू झाली. मेक इन इंडियाचा मूळ उद्देश भारताला केवळ मोठी बाजारपेठ न ठेवता जागतिक उत्पादन केंद्र (Global Manufacturing Hub) बनवणे हा होता. गेल्या दहा-बारा वर्षांत त्याने काही प्रगतीही साधली.

भारतात विविध वस्तूंचे उत्पादन आणि उत्पादन क्षमता वाढली. परदेशी कंपन्यांना भारतात उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स, फार्मास्युटिकल्स आणि इंजिनिअरिंग गुडस यांच्या निर्यातीला चालना मिळाली. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न झाला. रोजगाराच्या संधी वाढल्या.

एमएसएमई इकोसिस्टीमला चालना मिळाली. मोठ्या मॅन्युफॅक्चरिंग कंपन्यांभोवती पुरवठादार आणि पुरक युनिट विकसित होण्यास मदत झाली.

पायाभूत सुविधा आणि इंडस्ट्रियल कॉरिडॉरला गती मिळाली. संरक्षण उत्पादनाचे स्वदेशीकरण सुरू झाले. EV आणि रिन्युव्हेबल पॉवर मॅनिफॅक्चरिंगला चालना मिळाली.

पूर्वी वस्तूंची आयात होत होती. आता कच्चा माल, कॉम्पोनंट्सची आयात होऊ लागली आणि भारतात त्याची असेंब्ली तसेच वस्तूचे उत्पादन सुरू झाले. हे खचितच यश आहे. पण हा पहिला टप्पा मानला पाहिजे. मेक इन इंडियाचे यश मोजताना 'हे उत्पादन भारतात तयार होते का?' हा प्रश्न विचारणे पुरेसे नाही. त्याबरोबर आणखी पुढील सहा प्रश्न विचारले पाहिजेत : कॉम्पोनंट्स भारतात बनतात का?, डिझाईन भारतात होते का?, आर अँड डी भारतात होते का? पेटंट भारताकडे आहेत का? कोअर टेक्नॉलॉजी भारताची आहे का? आपण तंत्रज्ञान निर्यात करू शकतो का?

याच सहा टप्प्यात खऱ्या अर्थाने 'मेक इन इंडिया'चे रूपांतर 'डेव्हलप इन इंडिया'मध्ये होऊ शकते. भारतासाठी आयात कमी करणे हे महत्त्वाचे आहे; पण ते अंतिम ध्येय नसावे. कारण आज आपण एका वस्तूची आयात बंद करून तिची असेंब्ली भारतात सुरू केली, पण उद्या त्या वस्तूसाठी लागणारे दुसरे क्रिटिकल कॉम्पोनंट्स आयात करावे लागले, तर अवलंबित्वाचे फक्त स्वरूप बदलले, अवलंबित्व पूर्णपणे संपले असे नाही. म्हणून भारताचा पुढील औद्योगिक मंत्र असा असू शकतो: 'मेक इन इंडिया' ही केवळ सुरुवात आहे; 'डिझाईन, डेव्हलपमेंट आणि इनोव्हेट इन इंडिया' हेच पुढील लक्ष्य आहे.

आपण मोबाईल उत्पादनाचे उदाहरण घेऊ. मोबाईल फोन निर्यात ₹१,५०० कोटींवरून सुमारे ₹दोन लाख कोटी झाले आणि भारतात मोबाईल मॅन्युफॅक्चरिंग युनिट्सची संख्या दोन वरून सुमारे ३०० झाली.

पण येथे एक महत्त्वाचा प्रश्न आहे- एखाद्या परदेशी कंपनीचा स्मार्टफोन भारतात तयार होतो. पण त्याचे डिझाईन, प्रोसेसर/चीप, डिस्प्ले टेक्नॉलॉजी, कॅमेरा टेक्नॉलॉजी आणि अनेक कॉम्पोनंट्स परदेशातून येत असतील तर भारतात मेक इन इंडियानुसार काय होते तर केवळ वेगवेगळे भाग जोडणे, टेस्टिंग आणि पॅकेजिंग इतकेच.

दुसरे उदाहरण घेऊ ईव्ही उत्पादनाचे. भारतात मोटारी, कमर्शियल व्हेईकल, दुचाकी आणि ट्रॅक्टर्स मोठ्या प्रमाणावर तयार होतात. परंतु इलेक्ट्रिक व्हेईकलमुळे वाहन उद्योगातील खेळाचे स्वरूप बदलत आहे. भारतात जरी ईव्ही असेंब्ली सुरू झाली तरी बॅटरी सेल्स, क्रिटिकल इलेक्ट्रॉनिक्स आणि सॉफ्टवेअर मोठ्या प्रमाणावर आयात केले जात आहे. त्यामुळे फॉसिल-फ्युएल व्हेईकलमधील आयातीवरील अवलंबित्व कमी करून आपण नवीन प्रकारचे आयात अवलंबित्व निर्माण करत आहोत. म्हणून ईव्ही असेंब्ली म्हणजे ईव्ही तंत्रज्ञान असे नाही. पुढच्या टप्प्यात बॅटरी केमिस्ट्री + सेल टेक्नॉलॉजी + मोटर + पॉवर इलेक्ट्रॉनिक्स + सॉफ्टवेअर + व्हेईकल डिझाईन यामध्ये भारतीय आर अँड डी आणि इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी वाढवणे गरजेचे आहे.

तिसरे उदाहरण सेमीकंटक्टरचे पाहू. आज जवळजवळ प्रत्येक आधुनिक उद्योग सेमीकंटक्टरवर अवलंबून आहे: मोबाईल, मोटार, एआय, संरक्षण, टेलिकॉम, बँकिंग, वैद्यकीय उपकरणे सगळ्यात सेमी कंडक्टर गरजेचे आहे. म्हणून भारताने केवळ चीप फॅब्रिकेशन प्लान्ट उभारणे पुरेसे नाही, तर चीप आर्किटेक्चर, चीप डिझाईन, वेफर फॅब्रिकेशन, पॅकेजिंग, टेस्टिंग या संपूर्ण व्हॅल्यू चेनमध्ये आपली क्षमता निर्माण करणे आवश्यक आहे.

तीच गोष्ट संरक्षण क्षेत्राची. भारतात फायटर एअरक्राफ्टची असेंब्ली झाली पण इंजिन टेक्नॉलॉजी, रडार टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर सिस्टीम, क्रिटिकल सेन्सर्स, फ्लाईट कंट्रोल सॉफ्टवेअर परदेशी असेल तर हे सर्व स्वदेशी करणे हा पुढचा टप्पा निश्चितच महत्त्वाचा ठरतो.

सौरऊर्जेमध्ये भारताने मोठी क्षमता निर्माण केली आहे. आपण सोलार मॉड्युल मॅन्युफॅक्चरिंग करतो. पण त्यासाठी इम्पोर्टेड इनपूट वापरतो. आता पुढच्या टप्प्यामध्ये सेल केमिस्ट्री आणि एनर्जी स्टोअरेज टेक्नॉलॉजी महत्त्वाची आहे.

तीच गोष्ट फार्मास्युटिकल्स बाबतीत आहे. भारत फार्मास्युटिकल्स मॅन्युफॅक्चरिंगमध्ये जागतिक स्तरावर महत्त्वाचा देश आहे. विशेषतः जेनरिक मेडिसीनमध्ये भारताची मोठी भूमिका आहे. भारताला 'फार्मसी ऑफ दी वर्ल्ड'सोबतच 'ड्रग्ज डिस्कव्हरी अँड बायोटेक्नॉलॉजी हब' होण्याची क्षमता निर्माण करावी लागेल.

टेलिकम्युनिकेशन क्षेत्रात उपकरणे बनवण्यापासून 5G/6G टेक्नॉलॉजीपर्यंत, डेटा सेंटरपासून एआय मॉडेलपर्यंत, ट्रेन बनवण्यापासून रेल्वे टेक्नॉलॉजीपर्यंत, ट्रॅक्टरपासून कृषी क्षेत्रातील अचूकतेपर्यंत प्रगती करणे हा मेक इन इंडियाचा पुढचा टप्पा आहे.

थोडक्यात कृषिप्रधान भारताने गेल्या दीड दशकात औद्योगिक क्षेत्रात भरारी घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी विविध योजना आणल्या, निधी उपलब्ध करून दिला, देशांतर्गत उत्पादन वाढावे म्हणून बरेच काही केले. मेक इन इंडिया ही त्यातील ठळक बाब होय. त्या चळवळीला आता १२ वर्षे झाली. भारताने असेंब्ली आणि मॅन्युफॅक्चरिंगच्या पुढे जाऊन इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी, आर अँड डी आणि कोअर टेक्नॉलॉजीमध्ये आपली ताकद निर्माण करणे आवश्यक आहे. मेक इन इंडियाचा पुढील दशकाचा हाच मंत्र असायला हवा.

vgovilkar@rediffmail.com

---

स्नेहल नाडकर्णी
ग्राहक मंच



# तुमच्या सौंदर्य प्रसाधनात आहे काय...

**सौंदर्य प्रसाधनांच्या फसव्या जाहिरातींना बळी पडून ग्राहक केवळ आपले कष्टाचे पैसेच गमावत नाहीत, तर त्यांच्या आरोग्यालाही मोठा धोका निर्माण होतो. झटपट रिझल्ट देण्याच्या नादात उत्पादनांमध्ये घातक रसायने, स्टिरॉइड्स किंवा पारा (Mercury) वापरला जातो. घटकांची संपूर्ण यादी समोर नसल्यास ग्राहकाला आपण शरीरावर काय लावत आहोत, याची कल्पनाच येत नाही. रासायनिक विरहित असल्याचा खोटा दावा केल्यामुळे हे उत्पादन वापरणाऱ्या ग्राहकांच्या त्वचेचे कायमचे नुकसान होऊ शकते.**

पूर्वी केवळ सण-समारंभ किंवा विशेष प्रसंगी वापरली जाणारी सौंदर्य प्रसाधने आता दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहेत. आता केवळ महिलाच नव्हे, तर पुरुषांसाठीही विशेष 'मेन्स ग्रूमिंग' उत्पादने बाजारात उपलब्ध आहेत. इन्स्टाग्राम, फेसबुक आणि यूट्यूब यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्समुळे 'परफेक्ट लुक'ची क्रेझ वाढली आहे. रील आणि फोटो फिल्टरच्या युगात प्रत्येकाला सुंदर दिसायचे असते. जाहिरातींमधील ग्लॅमरस दुनियेला भुलून सामान्य लोकही या उत्पादनांकडे आकर्षित होतात. त्यामुळे सौंदर्य प्रसाधनांची बाजारपेठ झपाट्याने वाढत आहे. प्रत्येक जण आज कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सौंदर्य प्रसाधनांचा वापर करत आहे. बदलती जीवनशैली आणि स्वतःला आकर्षक दाखवण्याची तीव्र इच्छा यामुळे या उद्योगाने आज जागतिक बाजारपेठेत आपले पाय घट्ट रोवले आहेत. सोशल मीडिया, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि डायरेक्ट-टू-कंझ्युमर (D2C) ब्रँड्सच्या माध्यमातून दररोज हजारो उत्पादने ग्राहकांसमोर सादर केली जातात. मात्र, या स्पर्धात्मक युगात ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अनेक कंपन्या अवास्तव, दिशाभूल करणाऱ्या आणि असत्य दाव्यांचा आधार घेत आहेत. या गंभीर समस्येची दखल घेत भारताच्या केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने (CCPA) सौंदर्य प्रसाधने क्षेत्रातील फसव्या आणि असुरक्षित पद्धतींविरुद्ध कठोर कायदेशीर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अंतर्गत स्थापन झालेली CCPA ही संस्था ग्राहकांच्या हक्कांना चालना देणे, ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि अंमलबजावणी करणे यासाठी कटिबद्ध आहे. बाजारपेठेत चालणाऱ्या अनुचित व्यापारी प्रथा आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना आळा घालणे हे या प्राधिकरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

सौंदर्य प्रसाधने क्षेत्रात ग्राहकांच्या आरोग्याशी आणि पैशांशी थेट संबंध येत असल्याने, CCPAने या क्षेत्रातील खोट्या दाव्यांवर आणि नियमांच्या उल्लंघनावर आपले लक्ष केंद्रित केले आहे.

अनेक ब्रँड्स आपल्या जाहिरातींमध्ये 'रातोरात पिगमेंटेशन दूर करा' किंवा 'काही दिवसांत त्वचा गोरी करा' असे दावे करतात. या दाव्यांमागे कोणताही वैज्ञानिक आधार, प्रयोगशाळेतील चाचण्या किंवा क्लिनिकल डेटा नसतो. तसेच, जाहिरातींमध्ये दाखवल्या जाणाऱ्या 'बिफोर अँड आफ्टर' फोटोंमध्ये मोठ्या प्रमाणावर डिजिटल एडिटिंग आणि फिल्टर्सचा वापर करून ग्राहकांना मूर्ख बनवले जाते. मिशो, फ्लिपकार्ट यांसारख्या प्लॅटफॉर्मवरील अनेक विक्रेते, तसेच सुएर्टे कॉस्मेटिक सायन्स, फॉक्सी ब्युटी आणि मार्स नाईट यांसारख्या स्वतंत्र D2C वेबसाइट्सवर या संदर्भात कारवाई झाली आहे.

कारवाईचा दुसरा मोठा फटका ऑनलाइन विक्री करणाऱ्या 'व्हाइट-लेबल' विक्रेत्यांना आणि ब्युटी ब्रँड्सना बसला आहे. हे विक्रेते उत्पादनांचे मार्केटिंग '१००% सेंद्रिय' किंवा 'रासायनिक विरहित' म्हणून करतात. मात्र, प्रत्यक्षात या उत्पादनांमध्ये प्रतिबंधित किंवा अघोषित कृत्रिम सक्रिय घटक आणि मानवी शरीराला घातक असणारे धातू आढळून आले आहेत.

याशिवाय, ई-कॉमर्स वेबसाइट्सवर वस्तूची माहिती देताना 'वैध वजनमापन' कायद्यातील नियमांचे उल्लंघन केले जात आहे. उत्पादनातील घटकांची अचूक यादी, बॅच नंबर किंवा उत्पादन कोणत्या देशात झाले आहे (Country of Origin), ही अनिवार्य माहिती ग्राहकांपासून लपवून ठेवली जात असल्याचे समोर आले आहे.

अनेक ब्रँड्स त्वचेवर लावण्याच्या क्रिम्स किंवा इंजेक्टेबल उत्पादनांची जाहिरात करताना 'क्लिनिकल अलोपेशिया (टक्कल पडणे) पूर्णपणे बरा करा', 'पिंपल्सचे डाग कायमचे घालवा' किंवा 'इंजेक्टेबल स्कीन बूस्टर्स' यांसारखे दावे करतात. नियमांनुसार, सौंदर्य प्रसाधने ही केवळ बाह्य सौंदर्यासाठी असतात, ती औषधांसारखे काम करू शकत नाहीत. 'वैद्यकीय उपचारांचे' दावे करणाऱ्या कॉस्मेटिक जाहिरातींना ग्राहक संरक्षण कायदा, २०१९च्या कलम २१ अंतर्गत थेट 'दिशाभूल करणाऱ्या जाहिराती' मानून कारवाई केली जात आहे.

ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या या कंपन्यांना चाप लावण्यासाठी CCPAने कायदेशीर मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ब्रँड्सवर ₹१० लाखांपर्यंतचा मोठा दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच सर्व दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि डिजिटल मोहिमा त्वरित हटवून उत्पादनांबद्दल सत्य परिस्थिती ग्राहकांसमोर मांडणे आणि जाहिरातींमधील खोटेपणा मान्य करून सुधारात्मक घोषणा करणे कंपन्यांना बंधनकारक केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ज्या थर्ड पार्टी सौंदर्य प्रसाधने विक्रेत्यांकडे पूर्ण कायदेशीर लेबलिंग किंवा घटकांची माहिती नाही, त्यांना त्वरित नोटीस पाठवून त्यांची उत्पादने वेबसाइटवरून काढून टाकावीत असा स्पष्ट निर्देश CCPAने सर्व ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सना दिले आहेत.

सौंदर्य प्रसाधनांच्या फसव्या जाहिरातींना बळी पडून ग्राहक केवळ आपले कष्टाचे पैसेच गमावत नाहीत, तर त्यांच्या आरोग्यालाही मोठा धोका निर्माण होतो. झटपट रिझल्ट देण्याच्या नादात उत्पादनांमध्ये घातक रसायने, स्टिरॉइड्स किंवा पारा (Mercury) वापरला जातो. घटकांची संपूर्ण यादी समोर नसल्यास ग्राहकाला आपण शरीरावर काय लावत आहोत, याची कल्पनाच येत नाही. रासायनिक विरहित असल्याचा खोटा दावा केल्यामुळे हे उत्पादन वापरणाऱ्या ग्राहकांच्या त्वचेचे कायमचे नुकसान होऊ शकते.

CCPAच्या या आक्रमक भूमिकेमुळे सौंदर्य प्रसाधने उद्योगातील ब्रँड्सना आता त्यांच्या जाहिरातींमध्ये आणि पॅकेजिंगवर कमालीची पारदर्शकता ठेवावी लागेल. कोणत्याही दाव्याला प्रमाणित करण्यासाठी कंपन्यांकडे सक्षम वैज्ञानिक पुरावे असणे आणि नियमांनुसार घटकांची संपूर्ण माहिती जाहीर करणे आता बंधनकारक आहे. CCPAची ही मोहीम भारतीय बाजारपेठेत 'सत्य आणि पारदर्शक' जाहिरात संस्कृती निर्माण करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल. CCPAची ही कठोर पावले ग्राहकांना फसवणुकीपासून वाचवतील आणि प्रामाणिक ब्रँड्सना बाजारात टिकून राहण्यास मदत करतील.

सौंदर्य प्रसाधनांचा वापर करणे पूर्णपणे चुकीचे नाही, परंतु त्याचा अतिवापर आणि रासायनिक उत्पादनांवर विसंबून राहणे घातक आहे. जाहिरातींमधील चकचकाटाला न भुलता ग्राहकांनीही सजग राहणे गरजेचे आहे. ग्राहकांनी खरेदी करण्यापूर्वी नेहमी घटकांची यादी, एक्स्पायरी डेट आणि ब्रँडची विश्वासार्हता तपासणे महत्त्वाचे आहे.

mgpshikshan@gmail.com

# ११४ पदकांसह सायोनारा जपान

## पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेचे पाचवे पर्व उत्साहात संपन्न; भारत चौथ्या स्थानी

**नागोया :** जपानमधील नागोया येथे आयोजित पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पाचव्या पर्वाची मिजुहो पार्क ॲथलेटिक्स स्टेडियममध्ये समारोप समारंभाने सांगता झाली. आठवडाभर रंगलेल्या या स्पर्धेत ४५ देश आणि प्रदेशांतील सुमारे ४,००० खेळाडू व कर्मचारी सहभागी झाले होते. जपानमध्ये प्रथमच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

भारताने या स्पर्धेत विक्रमी ११४ पदकांची कमाई केली. यामध्ये ३० सुवर्ण, ३५ रौप्य आणि ४९ कांस्यपदकांचा समावेश आहे. चीनमधील हांगझोऊ येथे २०२३ मध्ये झालेल्या आशियाई पॅरा गेम्समध्ये भारताने १०८ पदके जिंकली होती. यंदा सहा पदकांची वाढ करत भारताने स्वतःचाच विक्रम मोडला. भारताच्या या यशामुळे पॅरा क्रीडा क्षेत्रातील देशाची ताकद पुन्हा अधोरेखित झाली. विविध क्रीडाप्रकारांमध्ये भारतीय खेळाडूंनी सातत्यपूर्ण कामगिरी करत पदकतालिकेत मोलाचे योगदान दिले. भारताने यंदा केवळ १६८ खेळाडूंचा संघ पाठवला होता. २०२३ मध्ये हांगझोऊ येथे झालेल्या स्पर्धेत भारताने १०८ पदके जिंकली होती. यंदा तुलनेने कमी खेळाडू असूनही भारतीय खेळाडूंनी अधिक पदकांची भर घातली.

समारोप समारंभात दुहेरी सुवर्णपदक विजेते निशाद कुमार आणि मोना अग्रवाल यांनी भारतीय पथकाचे ध्वजवाहक म्हणून नेतृत्व केले. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय खेळाडूंनी स्पर्धेतील यशस्वी मोहिमेचा समारोप केला. भारताच्या पदकविजयात पॅरा ॲथलेटिक्सने सर्वाधिक योगदान दिले. या प्रकारात भारताने २२ सुवर्ण, १९ रौप्य आणि २४ कांस्य अशी एकूण ६५ पदके जिंकली.

पॅरा बॅडमिंटनमध्ये भारतीय खेळाडूंनी तीन सुवर्ण, पाच रौप्य आणि आठ कांस्य अशी एकूण १६ पदके मिळवली. पॅरा जलतरणात ११, पॅरा टेबल टेनिसमध्ये सात, पॅरा तिरंदाजीत सहा आणि पॅरा नेमबाजीत पाच पदके भारताच्या खात्यात जमा झाली. पॅरा ज्युदो आणि पॅरा पॉवरलिफ्टिंगमध्ये प्रत्येकी दोन पदके मिळाली. भारतीय नेमबाज मोना अग्रवालने महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स एसएच१ प्रकारात ३५७.५ गुणांसह विश्वविक्रम नोंदवत सुवर्णपदक जिंकले.

आशियाई पॅरा स्पर्धेची सहावी आवृत्ती २०३० मध्ये दोहा येथे आयोजित केली जाणार आहे. नागोया येथील स्पर्धेत भारताने केलेली विक्रमी कामगिरी आगामी स्पर्धांसाठी खेळाडूंना प्रेरणा देणारी ठरणार आहे.








**११४**
भारताने ३० सुवर्ण, ३५ रौप्य, ४९ कांस्य अशी एकूण ११४ पदके जिंकली. पदकतालिकेत भारताने चौथे स्थान पटकावले. चीन तालिकेत अग्रस्थानी राहिला.

### बॅडमिंटन : नितेश, मानसीची चमक

बॅडमिंटनपटूंनी अखेरच्या दिवशी तीन सुवर्णपदके जिंकून भारताच्या यशात मोलाची भर घातली. पॅरिस पॅरालिम्पिक विजेता नितेश कुमार याने पुरुष एकेरीच्या एसएल३ गटात अंतिम सामन्यात प्रमोद भगतचा २१-१८, २१-१६ असा पराभव केला. त्याने मिश्र दुहेरीत थुलासीमथी मुरुगेसनसोबत रौप्यपदकही जिंकले. स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या नवीन शिवकुमारने पुरुष एकेरीच्या एसएल४ गटात इंडोनेशियाच्या फ्रेडी सेतियावानला २१-९, २१-१७ असे हरवून सुवर्णपदक पटकावले. २४ वर्षीय पॅरिस पॅरालिम्पिक रौप्यपदक विजेती थुलासिमथी मुरुगेसन हिने मानसी जोशीसह महिला दुहेरी एसएल३-एसयू५ प्रकाराचे सुवर्णपदक जिंकले, तर तिने महिला एकेरी एसयू५ मध्ये रौप्यही मिळवले.

### ॲथलेटिक्समध्ये विश्वविक्रम

ॲथलेटिक्समध्ये भारताने सर्वाधिक ६५ पदके जिंकली. संदीपने पुरुषांच्या ४०० मीटर टी६४ शर्यतीत ५२.२८ सेकंदांची विश्वविक्रमी वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले. हनेयने भालाफेक एफ३७/३८ प्रकारात ६०.४९ मीटरची विश्वविक्रमी फेक केली. पॅरालिम्पिक आणि जागतिक विजेता सुमित अंतिलने पुरुषांच्या भालाफेक एफ४२-४४/६१-६४ संयुक्त प्रकारात ७२.४६ मीटरची सर्वोत्तम फेक करत सुवर्णपदक मिळवले. या प्रकारात भारताने तिन्ही पदके जिंकून वर्चस्व गाजवले. महेंद्र गुर्जर आणि संजय संदीप सरगर यांनी अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक मिळवले. प्रणव सोर्माने पुरुषांच्या क्लब थ्रो प्रकारात ३२.८७ मीटरची स्पर्धा विक्रमी कामगिरी करत भारताला दिवसातील आणखी एक सुवर्णपदक मिळवून दिले. एकूणच ही कामगिरी कौतुकास्पद ठरली. यामुळे भविष्य ही उज्ज्वल असल्याची खात्री पटली. आता २०३०च्या पॅरा आशियाई स्पर्धेतही अशीच कामगिरी अपेक्षित आहे.

# संघर्षानंतर सिंधू उपविजेती

## अग्रमानांकित ॲन से यंगची तीन सेटमध्ये जेतेपदाला गवसणी

**पॅरिस :** भारताची तारांकित बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने फ्रेंच ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम फेरीत दक्षिण कोरियाच्या जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानी असलेल्या ऑलिम्पिक विजेत्या ॲन से यंगला कडवी झुंज दिली. मात्र या अटीतटीच्या लढतीत सिंधूला २१-१६, ११-२१, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे सिंधूला उपविजेतेपदवर समाधान मानावे लागले व कारकीर्दीत प्रथमच ही स्पर्धा जिंकण्याचे तिचे स्वप्न धुळीस मिळाले.

फ्रेंच ओपन बॅडमिंटन स्पर्धा



नऊ लाख ५० हजार डॉलर रकमेच्या या स्पर्धेत कोरियाच्या २४ वर्षीय यंगने तिचे चौथे फ्रेंच ओपन जेतेपद आणि यंदाच्या मोसमातील ११वे जेतेपद पटकावले. एकूण ११ लढतींमध्ये कोरियाच्या खेळाडूविरुद्ध कधीही विजय मिळवू शकलेल्या ३१ वर्षीय सिंधूने पहिल्या गेममध्ये आपल्या उंचीचा आणि आक्रमक फटक्यांचा उत्तम वापर करत अवघ्या २० मिनिटांत हा गेम नावावर केला. दोन्ही खेळाडूंमध्ये जालाजवळ रोमांचक चुरस पाहायला मिळाली. अशाच एका रॅलीदरम्यान यंगने परत पाठवलेला शटल कॉक थेट सिंधूच्या चेहऱ्यावर लागला. सिंधूने सुंदर ओव्हरहेड क्रॉस-कोर्ट स्मॅश आणि मागे अचूक ताळमेळ राखत पहिल्या गेममध्ये पकड मजबूत केली आणि अखेर हा गेम जिंकला.

**२**
सिंधूने २०२६ या वर्षात दोन स्पर्धांची अंतिम फेरी गाठली. यांपैकी जुलैमध्ये जपान ओपनचे तिने जेतेपद पटकावले. २०२४नंतर प्रथमच तिने एखादी स्पर्धा जिंकली होती. तर यंदा फ्रेंच ओपनमध्ये तिला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

सामन्याच्या दुसऱ्या गेममध्ये बाजू बदलल्यानंतर यंगने जोरदार कमबॅक करत ३-० अशी आघाडी घेतली. सिंधूने क्रॉस-कोर्ट स्मॅश आणि बॉडी स्मॅशच्या साहाय्याने पिछाडी भरून काढण्याचा प्रयत्न केला, परंतु कोर्टवरील वाऱ्याच्या दिशेमुळे त्रासलेल्या यंगने जालाजवळ अप्रतिम खेळ करत गेमवर पकड बसवली आणि सामना बरोबरीत आणला. निर्णायक तिसऱ्या गेममध्येही दोन्ही खेळाडूंमध्ये अत्यंत चुरशीच्या रॅलीज पाहायला मिळाल्या. सिंधूने सुरुवातीला ८-५ अशी तीन गुणांची आघाडी घेतली होती, मात्र यंगने जोरदार पुनरागमन करत सामन्यावर पूर्ण नियंत्रण मिळवले आणि सहज विजय मिळवून विजेतेपद आपल्या नावावर केले.

सामन्यानंतर प्रतिक्रिया देताना सिंधू म्हणाली की, "मी प्रत्येक गुणासाठी झुंजले आणि पहिला गेम जिंकल्यामुळे मला आनंद झाला होता. मात्र, दुसऱ्या गेममध्ये पाच गुणांपर्यंत धावसंख्या बरोबरीवर असताना तिने आघाडी घेतली आणि ती कायम राखली. तिसऱ्या सेटमध्येही मी आठ-पाच अशी आघाडी कायम राखायला हवी होती. मात्र मला ते जमले नाही." सिंधूने या लढतीतून बऱ्याच सकारात्मक गोष्टी शिकायला मिळाल्या असून भविष्यात त्यावर काम करणार असल्याचे आवर्जून स्पष्ट केले.

## मुंबईची आजपासून बीकेसी येथे हरयाणाशी रणजी लढत

**मुंबई :** रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईची तिसऱ्या साखळी सामन्यात सोमवारपासून हरयाणाशी गाठ पडणार आहे. बीकेसी येथील शरद पवार क्रिकेट अकादमीच्या मैदानात ही लढत होईल.

सिद्धेश लाडच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबईने ड-गटात आतापर्यंत दोन्ही लढती बोनस गुणांसह जिंकल्या आहेत. आयुष म्हात्रेला झालेली दुखापत, शार्दूल ठाकूर, सूर्यकुमार यादव यांसारख्या अनुभवी खेळाडूंची अनुपस्थिती यानंतरही मुंबईने चमक दाखवली आहे. सर्फराझ खान, मुशीर खान, आकाश आनंद यांनी फलंदाजीत, तर तुषार देशपांडेने गोलंदाजीत छाप पाडली आहे.

# यशस्वी, राहुल पुन्हा अपयशी; पडिक्कलचे अर्धशतक

**ख्राईस्टचर्च :** भारत-अ संघातील अनुभवी सलामीवीर के. एल. राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांना न्यूझीलंड-अ संघाविरुद्ध सुरू असलेल्या चार दिवसीय अनधिकृत कसोटी सामन्यातील दुसऱ्या डावातही अपयश आले. देवदत्त पडिक्कल (नाबाद ५६) आणि साई सुदर्शन (नाबाद ३९) यांनी मात्र भारत-अ संघाला सावरले.

भारत-अ संघाचा न्यूझीलंड दौरा

लिंकन येथे सुरू असलेल्या या लढतीत भारत-अ संघाने दुसऱ्या दिवसअखेर दुसऱ्या डावात ३६ षटकांत २ बाद १०६ धावा केल्या आहेत. पहिल्या डावात अनुक्रमे १७ व ० धावा केल्यावर यशस्वी व राहुलकडून अपेक्षा होत्या. मात्र दुसऱ्या डावात यशस्वी ५, तर राहुल ४ धावांवर बाद झाला. भारत-अ संघ अद्याप ९८ धावांनी पिछाडीवर आहे.

भारत-अ संघाने पहिल्या डावात ११३ धावा केल्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंड-अ संघाने ३१७ धावा करून २०४ धावांची आघाडी घेतली होती.

## निवडक

### शालेय बुद्धिबळ स्पर्धेत अर्जुन, अहान गटविजेते



**मुंबई :** आयडियल स्पोर्ट्स अकादमी व आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे आयोजित मुंबई महापौर चषक शालेय बुद्धिबळ स्पर्धेमधील ७ वर्षाखालील गटात अर्जुन कुलकर्णीने (५ गुण), तर ११ वर्षाखालील गटात अहान काटरुकाने (४.५ गुण) गटविजेतेपद पटकाविले. निर्णायक पाचव्या फेरीत अपराजित अर्जुन कुलकर्णीने राजवीर विचारेच्या राजाला २१व्या चालीला शह देत गटविजेतेपदाला गवसणी घातली. विजेत्या अर्जुनला आकर्षक चषक व भेटवस्तू देऊन माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ यांनी गौरवले. याप्रसंगी प्रशिक्षक राजाबाबू गजेंगी, क्रीडापटू प्रमोद पार्टे, अशोक नवले, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी उपस्थित होते. मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना, सिबीइयुएम व आरएमएमएस सहकार्याने सुरू झालेल्या स्पर्धेमधील ११ वर्षाखालील गटातील पहिल्या पटावर प्रारंभी तुंबळ युध्द झाले. फिडे गुणांकित अहान काटरुकाच्या आक्रमक चालींना कैवल्य परबने तोडीस तोड प्रत्युत्तर देत अखेर बलाढ्य प्रतिस्पर्ध्यास बरोबरी करण्यास भाग पाडले. अहान काटरुकाने (४.५ गुण) प्रथम, कैवल्य परबने (४ गुण) द्वितीय, मृण्मयी डावरेने (४ गुण) तृतीय, सुजय सावंतने (३.५ गुण) चतुर्थ, आरव कदमने (३.५ गुण) पाचवा क्रमांक पटकावला.

# तिलक वर्माकडे भारताच्या तिन्ही संघात खेळण्याची क्षमता - पठाण

**ख्राईस्टचर्च :** भारताचा माजी क्रिकेटपटू इरफान पठाणने प्रतिभावान तिलक वर्माच्या कौशल्याचे कौतुक करतानाच त्याच्याकडे तिन्ही प्रकारांत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी असल्याचे सांगितले.

न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरलेला फलंदाज तिलकने सामन्यानंतर मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि फलंदाजी प्रशिक्षक सितांशू कोटक यांनी सामन्यापूर्वी दिलेल्या पाठिंब्याची आठवण काढली. संपूर्ण देशाला आपल्यावर विश्वास आहे आणि शेवटपर्यंत टिकून राहिल्यास आपण विजय मिळवू शकतो, असे या दोन्ही प्रशिक्षकांनी आपल्याला सांगितल्याचे तिलक वर्माने स्पष्ट केले.

"मी फक्त शेवटपर्यंत फलंदाजी करण्याचा विचार करत होतो. या सामन्यापूर्वी गौतम सर आणि कोटक सर यांच्याशी माझे बोलणे झाले होते. संपूर्ण भारताचा तुझ्यावर




विश्वास आहे आणि तू शेवटपर्यंत खेळलास, तर आपण जिंकू शकतो, असे त्यांनी मला सांगितले. स्वतःच्या कामगिरीचा मला खूप अभिमान आहे," असे तिलक म्हणाला.

भारताने पाच लढतींच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली असून तिसरा सामना मंगळवारी खेळवण्यात येणार आहे.

### फर्ग्युसन, हेन्री तिसऱ्या लढतीला मुकणार

भारताविरुद्ध सुरू असलेल्या टी-२० मालिकेतील उर्वरित सामन्यांसाठी न्यूझीलंड संघात अनेक बदल करण्यात आले आहेत. कार्यभार व्यवस्थापनाचा (वर्कलोड मॅनेजमेंट) एक भाग म्हणून वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसन आणि मॅट हेन्री हे दोघे तिसऱ्या सामन्याला मुकणार आहेत. फर्ग्युसन रविवारी ऑकलंडला रवाना होऊन अनुक्रमे ईडन पार्क आणि सेडन पार्क येथे होणाऱ्या चौथ्या आणि पाचव्या टी-२० सामन्यांसाठी पुन्हा संघात सामील होणार आहेत, तर हेन्री ख्राईस्टचर्चमध्येच राहणार असून २ नोव्हेंबर रोजी ऑकलंडमध्ये एकदिवसीय संघात सामील होईल. दुसऱ्या बाजूला, काइल जेमिसन मंगळवारी तिसऱ्या टी-२० सामन्यानंतर वेलिंग्टनमध्येच थांबणार असून, ३१ ऑक्टोबर रोजी सेलो बेसिन रिझर्व्ह येथे होणाऱ्या फोर्ड ट्रॉफीच्या दुसऱ्या फेरीत कँटरबरीकडून खेळणार आहे.

# मुंबईचा प्रशांत, ठाण्याची समृद्धी यांना जेतेपद

**मुंबई :** एमआयजी क्रिकेट क्लब, वांद्रे येथे झालेल्या चौथ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत मुंबईचा प्रशांत मोरे आणि ठाण्याची समृद्धी घाडिगावकर यांनी अनुक्रमे पुरुष व महिला एकेरी गटाचे जेतेपद काबिज केले.




एमआयजी क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित या स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम लढतीत समृद्धीने मुंबईच्या ऐशा साजिदला तीन सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत ४-२५, २३-१८, २५-८ असे पराभूत केले. पहिला सेट ४-२५ असा गमावल्यानंतरही दुसऱ्या व तिसऱ्या सेटमध्ये तिने झोकात पुनरागमन केले. अंतिम फेरीत प्रवेश करण्यापूर्वी समृद्धीने मुंबईच्या सोनाली कुमारीवर २५-१७, ४-२४, २४-८ असा, तर ऐशाने रत्नागिरीच्या आकांक्षा कदमवर २५-१६, २२-९ असा विजय मिळवला होता. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत सोनालीने आकांक्षावर २५-१, ११-२५, १८-७ अशी मात केली.

राज्य मानांकन कॅरम स्पर्धा

पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात प्रशांतने पुण्याच्या अभिजीत त्रिपनकरला २२-१९, २५-२२ असे सरळ दोन सेटमध्ये नामोहरम केले. प्रशांतने उपांत्य लढतीत मुंबईच्या सिद्धांत वाडवलकरला २५-१३, ११-२५, २५-२ अशी, तर अभिजीतने मुंबईच्या प्रफुल्ल मोरेला २५-२१, १८-१७ अशी धूळ चारली होती. तिसऱ्या क्रमांकाच्या लढतीत सिद्धांतने प्रफुल्लवर २५-०, २१-२३, २४-७ अशी सरशी साधली.

विजेत्यांना एमआयजी क्लबच्या क्रिकेट विभागाचे सचिव अमित दाणी, इनडोअर गेम सचिव निनाद बोरकर, ट्रस्टी केदार कलबाग यांच्या शुभहस्ते रोख पारितोषिके, चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष यतिन ठाकूर, खजिनदार अजित सावंत, सहसचिव केतन चिखले व स्पर्धेचे सहाय्यक प्रमुख पंच योगेश सावंत उपस्थित होते.

एकंदर या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद लाभला. गेल्या काही वर्षांपासून कॅरममुळे अनेक उदयोन्मुख खेळाडूंची कारकीर्द बहरली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांची कामगिरी उंचावली आहे.

### विलिंग्डन जिमखाना येथे प्रथमच स्पर्धा

**मुंबई :** विलिंग्डन कॅथलिक जिमखान्याच्या वतीने १४ ते १६ नोव्हेंबर दरम्यान विलिंग्डन कॅथलिक जिमखाना, खार सबवे जवळ, सांताक्रूझ (पश्चिम) येथे पहिल्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेच्या मान्यतेने पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन गटात ही स्पर्धा रंगणार असून विजेत्यांना तब्बल १ लाख १० हजारांची रोख पारितोषिके व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. ४० वर्षांपूर्वी जिमखान्याने निमंत्रितांच्या कॅरम स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यानंतर पुन्हा ऑलिम्पियन हॉकीपटू जोकीम कार्व्हालो आणि मर्विन फर्नांडिस यांच्या पुढाकाराने जिमखान्याच्या कार्यकारिणीने राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून नावनोंदणीसाठी सोमवार, २६ ऑक्टोबरपर्यंतची मुदत आहे. अधिक माहितीसाठी ९९८७०४५४२९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## शिवनेरी मंडळाच्या कबड्डी स्पर्धेत कुमार गटात गुड मॉर्निंग स्पोर्ट्स क्लबची जेतेपदाला गवसणी

# व्यावसायिक गटात मुंबई पोस्टल, महिलांमध्ये विवेक संघाची बाजी

**मुंबई :** शिवनेरी कबड्डी मंडळातर्फे आयोजित कबड्डी महोत्सवातील व्यावसायिक गटाच्या अंतिम सामन्यात मुंबई पोस्टल संघाने वेस्टर्न रेल्वे संघाचा ३०-२७ असा पराभव करत तीन गुणांनी विजेतेपद पटकावले. दोन्ही संघांमध्ये झालेल्या या अटीतटीच्या लढतीत चढाया आणि पकडींचा सुरेख खेळ पाहायला मिळाला. वेस्टर्न रेल्वेने मुंबई पोस्टलला कडवी झुंज दिली; मात्र निर्णायक क्षणी सरस खेळ करत मुंबई पोस्टलने विजयावर शिक्कामोर्तब केले.

मुंबई पोस्टलच्या अक्षय तावडेने चढाईत आक्रमक खेळ करत संघाच्या गुणसंख्येत भर घातली. त्याला पकडीत अक्षय बर्डेने मोलाची साथ दिली. प्रतिस्पर्धी संघाच्या चढाया रोखताना मुंबई पोस्टलच्या बचावफळीने महत्त्वाची भूमिका बजावली. दुसरीकडे, वेस्टर्न रेल्वेकडून प्रणय राणेने चढाईत गुण मिळवण्यासाठी प्रयत्न केले, तर विजयंतने पकडीत आपले कौशल्य दाखवले. वेस्टर्न रेल्वेने अखेरपर्यंत सामना जिंकण्यासाठी संघर्ष केला; मात्र मुंबई पोस्टलने आपली आघाडी



कायम राखत ३०-२७ अशा तीन गुणांच्या फरकाने विजय मिळवला. या विजयासह मुंबई पोस्टलने शिवनेरी कबड्डी महोत्सवाच्या व्यावसायिक गटाचे विजेतेपद आपल्या नावावर केले.

कुमार गटाच्या अंतिम सामन्यात गुड मॉर्निंग स्पोर्ट्स क्लबने विजय



क्लबवर सहा गुणांनी मात केली. गुड मॉर्निंग क्लबकडून चढाईत निलेश मोरे, तर पकडीत आदित्य धुमाळ यांनी छाप पाडली. विजय क्लबकडून चढाईत दिलीप गुप्ता आणि पकडीत विजेंद्र यादव यांनी विजयासाठी प्रयत्न केले. मात्र, गुड मॉर्निंग क्लबने सरस खेळाच्या जोरावर विजेतेपद पटकावले.

दुसरीकडे महिला गटाच्या अंतिम सामन्यात विवेक महिला संघाने शिवशक्ती महिला संघाचा २८-२४ असा पराभव करत चार गुणांनी विजय मिळवला. विवेक महिला संघाकडून चढाईत तनु, तर पकडीत हरजीत कौर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. शिवशक्ती महिला संघाकडून चढाईत अदिती शिंदे आणि पकडीत पौर्णिमा जेधे यांनी चांगली कामगिरी केली. मात्र, विवेक संघाने अखेरपर्यंत आघाडी कायम राखत विजेतेपदावर कब्जा केला.

हे पत्र संचालक इंडियन नॅशनल प्रेस (बॉम्बे) प्रा. लिमिटेड यांच्याकरिता जी. एल. लखोटिया यांनी जर्नल प्रेस, फ्री प्रेस हाऊस, २१५, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१ येथे छापून प्रसिद्ध केले. दिल्ली कार्यालय : १/१८ आय.एन.एस. बिल्डिंग, रफी मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१. कोलकाता कार्यालय : ८, मोइरा स्ट्रीट, कोलकाता - ७०० ०१७. RNI No. 1691/57 मुंबई दूरध्वनी क्रमांक संपादकीय ६९०२८००० (विस्तार -१३३), जाहिरात ६९०२८०२६ (विस्तार ०१२४ व १२५) AIR SURCHARGE 50 PAISE ONLY. E-Mail : navshakti.news@gmail.com/ mail@fpj.co.in **व्यवस्थापकीय संपादक : गिरधरलाल लखोटिया. संपादक : प्रकाश रामचंद्र सावंत.**